SWAMI RAMANAND TEERTH
MARATHWADA UNIVERSITY, NANDED

**SYLLABUS**

**Faculty of Humanities**

B.A. Second Year

Semester III & IV

# ECONOMICS

Semester Pattern

(Choice Based Credit System)

(With effect from 2020-21)

Dr. Shivaji Pate
Asso. Professor and Head Dept. Of Economics
Sant Tukaram College of Arts and Science,
Parbhani

## Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
## CBCS - Paper Pattern in the Subject of Economics
## Faculty of Humanities
## B.A. Second Year ( With Effect from 2020-21)
### Semester-III

| Paper No | Title of the Paper | Continuous Assessment (C.A.) | End of Semester Examination (E.S.E.) |
|---|---|---|---|
| V | Macro Economics – I (Comp.) | 25 | 50 |
| VI | Quantitative Techniques -I ( Opt.)<br>OR<br>Economics of Development of ( Opt.) | 25 | 50 |
| SEC-I | Cashless Transaction | 25 | 25 |

### Semester - IV

| Paper No | Title of the Paper | Continuous Assessment (C. A.) | End of Semester Examination (E.S.E.) |
|---|---|---|---|
| VII | Macro Economics – II (Comp.) | 25 | 50 |
| VIII | Quantitative Techniques –II ( Opt.)<br>OR<br>Economics of Development and Environment ( Opt.) | 25 | 50 |
| SEC-II | Data Collection | 25 | 25 |

***Core Course:**

1) **Continuous Assessment (C.A.) :** **25 Marks**
   - One Class Test for = 10 Marks
   - One Home Assignment for = 10 Marks
   - One Seminar for = 05 Marks
2) **End of Semester Examination (E.S.E.):** 50 Marks

***Skill Enhancement Course (SEC):** **50 Marks**

1) **Continuous Assessment (C. A.) :** **25 Marks**
   - One Class Test for = 10 Marks
   - One Home Assignment for = 10 Marks
   - One Seminar (Abstract must) for = 05 Marks
2) **End of Semester Examination (E.S.E.) :** **25 Marks**
   - Skill Development Activities (Project) for = 10 Marks
   - Theory Examination on Prescribed Syllabus by Using University Answer Book for = 10 Marks
   - Presentation of Project (Viva-Voce) for = 05 Marks

## End of Semester Examination (ESE)
## Question Paper Pattern
## With Effect from 2020-21

**A) Core Course:**

**Q. 1** Descriptive question — **10 Marks**

OR

Descriptive question

**Q. 2** Descriptive question — **10 Marks**

OR

Descriptive question

**Q. 3** Descriptive question — **10 Marks**

OR

Descriptive question

**Q. 4** Descriptive question — **10 Marks**

OR

Descriptive question

**Q . 5** Write short notes on (any two). — **10 Marks**

i)
ii)
iii)
iv)

**B) End of Semester Examination (E.S.E.) :** — **25 Marks**

- Skill Development Activities (Project) for = 10 Marks
- Theory Examination on Prescribed Syllabus by Using University Answer Book for = 10 Marks
- Presentation of Project (Viva-Voce) for = 05 Marks

**Swami Ramanand Teerth Marathwada University,Nanded**
**( With Effect from 2020-2021)**
**B.A. Second Year - Semester - III**
**Economics**
**Paper - VI - Economics of Development (Optional)**

| Credit -03 | Period -55 | Marks = 75 |
| --- | --- | --- |
| Theory ( ESE) 50 Marks + Interanal (CA) 25 Marks = 75 Marks | | |

**Course Outline :**

This paper deals with the concepts of Economic Development and Economic Growth explaining the differences between them. It also throws light on the indicators of Economic Growth and measurements of Economic Developments.

This paper enables students to acquaint not only with classical theories but also introduces them with other theories of Economic Development. Furthermore, it highlights the factors in Economic Development process such as, Natural Resources, Population etc.

**Course Objectives :**

1. To make students sentient with the changes in development concepts.
2. To furnish the students with recent development theories.
3. To highlight the classical, neoclassical and modern approach towards development.
4. To elucidate the role of government's scheme in economic development.

**Course Utility :**

1. Course will be useful in understanding the concept of development from many dimensions.
2. Learners will be aware of the different approaches towards development.
3. Course will be useful in understanding different government scheme in the process of economic development .
4. Course enables learners with the current scenario of development among different countries.

**Course Content :** **Periods**

**Unit I : Economic Development and Growth** **10**

1.1 Concept of Economic Development.

1.2 Concept of Economic Growth - Indicators of Economic Growth.

1.3 Difference between Economic Development and Economic Growth.

**Unit II : Theories of Economic Development - I** **10**

2.1 Adam Smith's Theory of Economic Development

2.2 David Ricardo's Theory of Economic Development

2.3 Malthusian Theory of Economic Development

**Unit III : Theories of Economic Development – II** **15**

3.1 Karl Marx's Theory of Economic Development.

3.2 Rostow's Stages of Economic Growth.

3.3 Lewis Theory of Unlimited Supply of Labour

**Unit IV : Factors in the Economic Development Process** **10**

4.1 Natural Resources - Renewable and Non-renewable

4.2 Population - Theory of Optimum Population

4.3 Saving - The Role of Savings in Economic Development

**Unit V : Government Policies and Economic Development.** **10**

5.1 Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee scheme- Features, importance and scope.

5.2 Pradhan Mantri Gram Sadak Yojana – Features, importance and scope.

5.3 Pradhan Mantri Awas Yojana - Features, importance and scope

## प्रकरण १

# आर्थिक विकास : एक दृष्टिक्षेप

## (Economic Development : An Overview)

---

व्यापारवादी विचारधारा आणि त्यानंतर अॅडम स्मिथ, कार्ल मार्क्स व जे. एम. केन्स आदी अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाच्या प्रश्नांचे चिंतन व लिखाण केले आहे. परंतु त्यांनी स्थैतिक स्वरूपाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यावर प्रामुख्याने भर दिला. तसेच त्यांनी आर्थिक विकासाच्या प्रश्नांची चर्चा पश्चिम युरोपमधील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील संस्थात्मक रचनेचा आधार घेऊन केली, असे एच. एफ. विलीयमसन आणि सी. ए. बुट्रिक यांनी त्यांच्या "इकॉनॉमिक डेव्हलपमेंट प्रिन्सिपल्स अॅण्ड पॅटर्नस्" या ग्रंथात म्हटले आहे.

विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकामध्ये विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर अर्थशास्त्रज्ञांनी अल्पविकसित राष्ट्रांच्या विकासविषयक प्रश्नांचे विवेचन करण्यास प्रारंभ केला. १९२९ साली झालेली जागतिक महामंदी व १९३९ ते १९४४ या दरम्यान झालेले दुसरे जागतिक महायुद्ध या दोन घटनांमुळे अनेक विकसित व अल्पविकसित राष्ट्रांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले. यातून स्वत:ला सावरण्यासाठी आर्थिक विकास जलद गतीने करणे आवश्यक आहे याची या राष्ट्रांना जाणीव झाली शिवाय आफ्रिका, आशिया व दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रे ही पश्चिम युरोपमधील राष्ट्रांच्या वसाहती म्हणून गणल्या जात होत्या. युद्धानंतर या खंडातील देशांना स्वातंत्र्य मिळाले. स्वाभाविकच या नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमधून आर्थिक विकासाचे जोरदार प्रयत्न मोठ्या उमेदीने सुरू झाले. अशा प्रकारे अल्पविकसित राष्ट्रांमधून निर्माण झालेली जलद आर्थिक विकासाची तीव्र इच्छा आणि 'एखाद्या ठिकाणाचे दारिद्र्यसुद्धा इतर सर्व ठिकाण च्या संपन्नतेसाठी गतिरोध निर्माण करू शकते. "Poverty any where is a threat to prosperity every where." ही विकसित राष्ट्रांना कळलेली वस्तुस्थिती यामुळे विकासाच्या अर्थशास्त्राच्या विवेचनास अधिकच गती मिळाली. जी. एम. मेयर आणि आर. ई. बाल्डविन यांनी व्यक्त केलेले मत याला पुष्टी देणारे आहे. त्यांनी असे मत व्यक्त केले की, "राष्ट्रांच्या दारिद्र्याचा अभ्यास हा राष्ट्रांच्या संपत्तीच्या अभ्यासापेक्षा अधिक निकडीचा आहे.

"A study of the poverty of nations has even more urgency than a study of the wealth of Nations." (G. M. Meier and R. E Baldwin -

Economic Development - Theory ; History, Policy)

तथापि, एखाद्या राष्ट्राच्या दारिद्र्याचा अभ्यास आणि त्या अनुषंगाने दारिद्र्य निर्मूलनासाठीची त्या राष्ट्राने स्वीकारावयाची पद्धती ही प्रगत राष्ट्रांच्या अनुभव विश्वाच्या आधारावर निश्चित करणे योग्य होणार नाही हे ध्यानात घ्यावे लागेल. या संदर्भात प्रा. मिर्दाल यांनी व्यक्त केलेले मत उद्‌बोधक ठरेल.

``The Underdeveloped Countries should not accept our inherited economic theory uncritically, but removed it to fit their own problems and interests. So far economic theory has not concerned itself with the problems of under developed Countries, nvertheless if it is uncritically applied to their problems, it becomes wrong. - Gunner Myrdal, Economic Theory and under developed Region."

थोडक्यात, अल्पविकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास कसा घडवून आणता येईल? त्यासाठीचे मार्ग कोणते? त्या मार्गातील अडसर कोणते? हे अडसर दूर करण्यासाठी कोणत्या पद्धतीचा स्वीकार करावा आदी प्रश्नांचा ऊहापोह हा विकासाच्या अर्थशास्त्राचा अभ्यासविषय होय असे म्हणता येईल. या प्रमुख विषयाकडे जाण्यापूर्वी आपण 'आर्थिक विकास' या संकल्पनेचा अर्थ व स्वरूप जाणून घेणे आवश्यक आहे.

**आर्थिक विकासाची संकल्पना** (Concept of Economic Development)

'आर्थिक विकास' ही संकल्पना एखाद्या व्याख्येत बांधणे अवघड आहे. कारण या संकल्पनेचा अर्थ शोधण्यासाठी आपण जसजसे तपशीलात जातो तसतसे तिचा अर्थ अधिक व्यापक असल्याचे आपणास स्पष्ट होते. सर्वसाधारणपणे सामान्य व्यवहारामध्ये आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी, आर्थिक कल्याण, आर्थिक प्रगती आणि ऐहिक सुधारणा इत्यादी शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. परंतु आर्थिक विकास या संकल्पनेचा अर्थ या इतर शब्दांपेक्षा भिन्न आहे. आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यामधील फरक जाणून घेण्यापूर्वी आर्थिक विकास या संकल्पनेच्या विविध अर्थशास्त्रज्ञांच्या व्याख्या पाहुयात.

जे. ए. शुम्पीटर आणि श्रीमती उर्सुला हिक्स यांनी आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी हे सामान्यपणे समान अर्थाने वापरले जाणारे शब्दांचे अर्थ भिन्न असल्याचे स्पष्ट केले आहे.

'आर्थिक विकास' या संकल्पनेची व्याख्या देताना विविध अर्थशास्त्रज्ञांनी 'वास्तव राष्ट्रीय उत्पन्न', दरडोई वास्तव उत्पन्न' आणि 'आर्थिक कल्याण' या तीन निर्देशांकाच्या आधारे व्याख्या दिल्या आहेत. त्यामुळे आर्थिक विकासाच्या व्याख्यांचे तीन प्रकारांत विभाजन करता येईल.

**१. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न यावर आधारित व्याख्या**

मेयर व बाल्डविन यांनी आर्थिक विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे. त्यांच्या मते,

``Economic Development is a proces whereby an economy's real National income increases over a long period of time." Meier and Baldwin.

"आर्थिक विकास ही अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये दीर्घकाळात अर्थव्यवस्थेतील वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढते."

या व्याख्येत आर्थिक विकास या संकल्पनेविषयी तीन प्रमुख बाबींवर भर दिलेला आढळून येतो. एक म्हणजे आर्थिक विकास ही प्रक्रिया आहे. प्रक्रियेमध्ये अर्थव्यवस्थेतील आर्थिक, सामाजिक, राजकीय, तांत्रिक घटकांमध्ये सातत्याने होणारे अनुकूल परिवर्तन अपेक्षित आहे. दुसरे असे की, आर्थिक विकास ही दीर्घकाळाशी निगडित प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतून क्षणिक होणारे परिवर्तन अपेक्षित असणार नाही. तिसरी आणि तेवढीच महत्त्वाची बाब अशी की, वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे हा आर्थिक विकासाचा प्रमुख निर्देशक मानला आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास असे मेयर व बाल्डविन यांचे मत आहे.

परंतु या व्याख्येत खालीलप्रमाणे काही कच्चे दुवे आहेत.

१. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना किमतीत होणारे बदल विचारात घेतले जात नाहीत, परंतु अल्पविकसित अर्थव्यवस्थेमध्ये किमतीतील बदल ही न टाळता येणारी घटना आहे. अशा वेळी किमतीतील बदलांचा विचार न करणे वास्तवास धरून होणार नाही.

२. या व्याख्येमध्ये लोकसंख्या वृद्धीतील बदलांचा विचार केलेला नाही. उदा. अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न वाढत असताना दुसऱ्या बाजूने लोकसंख्येत वेगाने वाढ होत असेल तर आर्थिक विकास होण्याऐवजी तो आर्थिक विकासास अडथळा ठरेल.

३. प्रामुख्याने अल्पविकसित देशातील राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यामध्ये संकल्पनात्मक अडचणी आहेत.

थोडक्यात, या व्याख्येमध्ये व्यापार चक्रातील चढउतार, मुद्रेच्या मूल्यातील बदल व लोकसंख्येतील वाढ यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात होणारे बदल यांचा विचार झालेला नाही.

**२. दरडोई वास्तव उत्पन्नाच्या निर्देशकावर आधारित व्याख्या**

काही अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाची व्याख्या करताना दरडोई वास्तव

उत्पन्न वाढीवर भर दिला आहे.

**प्र. मेयरच्या मते,** "आर्थिक विकास ही अशी प्रक्रिया होय की ज्या प्रक्रियेद्वारे दीर्घकाळात देशाच्या दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ होते."

**प्रा. बरनच्या मते,** "दीर्घकाळात भौतिक वस्तू उत्पादनात झालेल्या वाढीला आर्थिक वृद्धी किंवा आर्थिक विकास म्हणता येईल.

**बुचानन आणि एलिस** यांनी आर्थिक विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "आर्थिक विकास म्हणजे अल्पविकसित प्रदेशाच्या वास्तव उत्पन्नाच्या क्षमता विकसित करणे होय. या क्षमता विकसित करण्यासाठी गुंतवणूक केली जाते आणि उत्पादक साधनांमध्ये भर घातली जाते. ज्यामुळे प्रतिव्यक्ती वास्तव उत्पन्न वाढण्यास मदत होते."

वरील व्याख्येतून एक अर्थ ध्वनित होतो की, आर्थिक विकास साध्य होण्यासाठी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अधिक असला पाहिजे.

तरीपण दरडोई वास्तव उत्पन्न वाढले म्हणजे देशातील सर्व लोकांचे वास्तविक राहणीमान उंचावले असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. त्याचे कारण असे की, देशातील दरडोई वास्तव उत्पन्न वाढत असताना लोकांनी उपभोगावर खर्च करण्याऐवजी बचतीचा दर वाढविण्यासाठी वाढीव उत्पन्न वळविले तर दरडोई उपभोग पातळी घसरेल किंवा वाढीव उत्पन्नाचा विनियोग आपल्या देशाचे लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी अथवा अन्य बाबीसाठी करण्याचे जर त्या देशातील शासनाने धोरण स्वीकारल्यास वास्तव दरडोई उपन्न वाढूनही देशातील लोकांचे राहणीमान सुधारणार नाही. तसेच देशातील वाढीव उत्पन्नाचा मोठा वाटा जर मूठभर श्रीमंत वर्गाच्या हाती गेला व मोठ्या प्रमाणावरील गरीब वर्गाच्या वाट्याला वाढीव उत्पन्नाचा अल्प हिस्सा आला. थोडक्यात, राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन समान झाले नाही तर दरडोई उत्पन्न वाढले तरी मोठ्या प्रमाणावर असलेल्या गरीब वर्गाचे राहणीमान सुधारणार नाही.

याचा अर्थ दरडोई वास्तव उत्पन्नाच्या निर्देशकावर आधारित आर्थिक विकासाच्या व्याख्यांमध्ये इतर महत्त्वाच्या घटनांकडे दुर्लक्ष झालेले दिसते. जसे समाजरचना, लोकसंख्येचा आकार व संरचना, त्या देशातील इतर संस्था व संस्कृती, देशातील उपलब्ध साधनांची रचना आणि उत्पादनाचे समान वितरण.

**३. आर्थिक कल्याणावर आधारित व्याख्या**

आर्थिक कल्याणाच्या दृष्टिकोनातूनसुद्धा काही अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाची व्याख्या केली आहे.

**ऑकन आणि रिचर्डसन यांच्या मते,** "आर्थिक विकास म्हणजे वस्तू व सेवांच्या उपलब्धतेत वाढ होऊन भौतिक कल्याणात झालेली दीर्घकालीन सुधारणा होय."

या व्याख्येच्या काही मर्यादा आहेत. उदा. वस्तू व सेवांच्या उपलब्धतेत वाढ म्हणजेच उत्पादनात वाढ होणे आणि त्याचा अर्थ वास्तव उत्पन्नात वाढ होणे होय. म्हणजेच मेयर व बाल्डविन यांचेच मत वेगळ्या शब्दात या व्याख्येत मांडले आहे. 'वास्तव उत्पन्न' या निर्देशकाच्या मर्यादा वर दिल्या आहेत त्याच याही ठिकाणी लागू होतात.

तसेच आर्थिक कल्याणाचे मापन करताना दरडोई वास्तव उत्पन्न वाढीस साहाय्यभूत ठरणाऱ्या एकूण उत्पादित परिमाणाच्या रचनेकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. कारण उत्पादन रचनेमध्ये भांडवली वस्तूंचे उत्पादन अधिक असेल तर ते उपभोग्य वस्तूंचे परिमाण कमी ठेवल्यामुळे असू शकते. अशा वेळी लोकांच्या कल्याणामध्ये भर पडेलच असे म्हणता येणार नाही.

आर्थिक कल्याणाचा विचार करताना कोणत्या वस्तू व सेवांचे किती उत्पादन झाले याबरोबरच ते उत्पादन करताना कोणती उत्पादन पद्धती वापरण्यात आली याचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. उदा. समजा देशातील उत्पादनात वाढ करताना उत्पादन प्रक्रियेत सहभागी झालेल्या श्रमिकांचे शोषण झालेले असेल अथवा ते ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणची स्थिती अधिकच बिघडली असेल तर एकूण उत्पादन वाढूनही देशाच्या एकूण कल्याणात भर पडली असे कसे म्हणता यईल?

अर्थात, आर्थिक कल्याणाचे मापन करताना वास्तव उत्पन्न वाढीबरोबरच उत्पन्नाचे विभाजन, उत्पादनातील वस्तू व सेवांच्या निर्मितीचे स्वरूप, वास्तव खर्च आदी घटकांचाही विचार केला पाहिजे, जे की अधिक गुंतागुंतीचे व क्लिष्टता निर्माण करणारे कार्य आहे. म्हणूनच वरील क्लिष्टता टाळण्यासाठी व आर्थिक सुलभतेसाठी अर्थशास्त्रज्ञांनी दरडोई वास्तव उत्पन्न या निकषाच्या साहाय्याने आर्थिक विकासाचे मापन करणे अधिक पसंत केले असे दिसते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांच्या मते, "आर्थिक विकास म्हणजे समाजाच्या भौतिक गरजांच्या पूर्ततेबरोबरच समाजाच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे होय. अर्थात, आर्थिक विकास म्हणजे वृद्धी अधिक सामाजिक, सांस्कृतिक, संस्थात्मक आणि आर्थिक बदल होय. या व्याख्येत आर्थिक घटकांबरोबरच आर्थिकेतर घटकांचाही विचार झाला आहे. त्यामुळे तुलनेने ही व्याख्या इतर व्याख्यांपेक्षा अधिक व्यापक व समर्पक आहे.

**आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी** (Economic Development and Economic Growth)

सामान्य व्यवहारामध्ये 'आर्थिक विकास' व 'आर्थिक वृद्धी' हे शब्द समानार्थी वापरले जातात. परंतु अर्थशास्त्रांमध्ये या दोन्ही शब्दांचा अर्थ भिन्न असल्याचे अर्थतज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

**१. जे. ए. शुम्पीटरच्या मते,** "विकास म्हणजे स्थित अवस्थेतील खंडित व उत्स्फूर्त बदल होय. या बदलामुळे पूर्वी अस्तित्वात असलेल्या संतुलन अवस्थेमध्ये सतत बदल आणि स्थानांतरण होते. याउलट आर्थिक वृद्धी म्हणजे बचत दर आणि लोकसंख्येत होणाऱ्या वाढीमुळे दीर्घकाळात क्रमाने आणि स्थिरपणाने होणार बदल होय."

**२. श्रीमती उर्सुला हिक्स** यांच्या मते, " 'आर्थिक विकास' ही संकल्पना अल्पविकसित देशांशी संबंधित आहे. याउलट 'आर्थिक वृद्धी' या संकल्पनेचा संबंध विकसित देशांशी येतो."

**३. प्रा. सी. पी. किंडलबर्जर** यांच्या मते, " 'आर्थिक वृद्धी' म्हणजे अधिक उत्पादन तर 'आर्थिक विकास' म्हणजे अधिक उत्पादनाबरोबरच या अधिक उत्पादनास कारणीभूत असणारे तांत्रिक व संस्थात्मक बदल होत.

**४. प्रा. जे. के. मेहता** यांच्या मते, " 'वृद्धी' मध्ये संख्यात्मक बदल अभिप्रेत आहे, तर 'विकास' या संकल्पनेमध्ये संख्यात्मक व गुणात्मक असे दोन्ही बदल अभिप्रेत आहेत."

**५. ए. मॅडिसन** यांच्या मते, "उत्पन्न पातळीत वाढ होणे ही श्रीमंत राष्ट्रांच्या दृष्टीने आर्थिक वृद्धी होय, तर गरीब राष्ट्रांच्या दृष्टीने आर्थिक विकास होय."

**६.** एव्हरीमॅनस् डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक्समध्ये या दोन्ही संकल्पनातील भेद अधिक स्पष्टपणे सांगितला आहे.

"सामान्यपणे आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वृद्धी होय. परंतु अधिक नेमकेपणाने सांगावयाचे झाल्यास आर्थिक विकास ही संकल्पना केवळ आर्थिक वृद्धीचे संख्यात्मक मापन करणे एवढ्या मर्यादित अर्थाने वापरली जात नाही. (उदा. दरडोई वास्तव उत्पन्न वाढीचा दर माहीत करणे) तर यामध्ये आर्थिक वृद्धीत भर घालण्यासाठी कारणीभूत ठरणारे आर्थिक, सामाजिक किंवा अन्य बदल अभिप्रेत आहेत. आर्थिक वृद्धी ही संख्येत मोजता येणारी आणि वस्तुनिष्ठ संकल्पना आहे. आर्थिक वृद्धीमध्ये श्रमशक्तीतील वाढ, भांडवल वृद्धी, व्यापार व्यवहारातील वाढ आणि उपभोग पातळीवरील वाढ आदी बाबींचे विश्लेषण

केले जाते. याउलट आर्थिक विकासामध्ये आर्थिक वृद्धीच्या निर्धारकांचे विश्लेषण केले जाते. उदा. उत्पादन तंत्रातील बदल, सामाजिक प्रवृत्ती आणि संस्थात्मक रचना इत्यादी ज्यातील बदलाद्वारे आर्थिक वृद्धी साध्य होते.

**आर्थिक विकासाचे मापन किंवा मोजमाप** (Measurement of Economic Development)

कोणत्याही राष्ट्रातील आर्थिक विकासाचे मोजमाप करणे हे अनेक हेतूंनी आवश्यक असते. तेव्हा विकासाचे मोजमाप कसे करायचे त्यासाठी कोणते निर्देशक वापरावयाचे याविषयी अर्थतज्ज्ञांनी पुढील मते मांडली आहेत.

**१. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न :**

एखाद्या राष्ट्रातील आर्थिक विकास किती प्रमाणात झाला याचे मापन त्या देशातील वास्तव उत्पन्न किती प्रमाणात वाढले यावरून करता येईल असे काही अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना वस्तू व सेवांच्या किमतीतील बदलांचा विचार केला जात नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या उत्पादनात झालेली वाढ याचे वास्तव चित्र माहीत होते. वास्तव राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशातील वस्तू व सेवांचे अंतिम उत्पादन होय.

परंतु या निर्देशकाचा वापर करताना अनेक अडचणी येतात. प्रामुख्याने अल्पविकसित देशात वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी आवश्यक आकडेवारी उपलब्ध नसते. संख्यात्मक माहिती संग्रहित करण्यासाठी आवश्यक संकल्पनात्मक स्पष्टता व कार्यक्षम यंत्रणा उपलब्ध नसते.

**२. दरडोई वास्तव उत्पन्न :**

वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असतानाच जर त्या देशातील लोकसंख्येत वेगाने वाढ होत गेली तर त्या राष्ट्रातील जनतेचे राहणीमान उंचावणार नाही. खऱ्या अर्थाने विकास व्हावयाचा असेल तर वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अधिक असला पाहिजे. म्हणजेच देशातील दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ झाली पाहिजे. त्यामुळे काही अर्थतज्ज्ञांनी 'दरडोई वास्तव उपन्न' हा निर्देशक आर्थिक विकासाच्या मापनासाठी अधिक योग्य असल्याचे म्हटले आहे. परंतु या निर्देशकाच्याही काही मर्यादा विचारात घ्याव्या लागतील.

उदा. एखाद्या देशाचे दरडोई वास्तव उत्पन्न वाढले म्हणजे आर्थिक विकास झाला असे गृहीत धरणे सोयीचे नाही. कारण अर्थव्यवस्थेत वाढलेल्या उत्पन्नाचे असमान विभाजन झाले असेल तर श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होऊन सर्वसामान्यांच्या राहणीमानात वाढ होणार नाही. म्हणजेच दरडोई उत्पन्नातील वाढीमुळे वाटणारा आर्थिक विकास फसवा असेल.

३. आर्थिक कल्याण :

आर्थिक कल्याणाच्या निर्देशकावर आर्थिक विकासाची व्याख्या करणाऱ्या अर्थतज्ज्ञांच्या मते आर्थिक कल्याण हा आर्थिक विकासाच्या मोजमापाचा मापदंड अधिक योग्य आहे. जेव्हा देशातील सर्व लोकांच्या राहणीमानात वाढ होते तेव्हा त्यांच्या भौतिक कल्याणात वाढ होते व त्यावेळी तो देश विकसित देश म्हणून गणला जातो. अर्थव्यवस्थेत किमतीची पातळी स्थिर असते, राष्ट्रीय उत्पन्नाचे जास्तीत जास्त समान विभाजन झालेले असते व लोकांच्या खरेदी शक्तीत पुरेशा प्रमाणात वाढ झालेली असते. त्या अर्थव्यवस्थेतील लोकांच्या राहणीमानाची पातळी उंचावते. जेव्हा एखाद्या देशातील लोकांचे राहणीमान निकृष्ट दर्जाचे असते तेव्हा त्यांचे आर्थिक कल्याण साधले जात नाही. अर्थात तो देश अविकसित समजला जातो.

वरील विवेचनावरून आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी वास्तव राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई वास्तव उत्पन्न व आर्थिक कल्याण हे तीन प्रमुख निर्देशक आहेत असे म्हणता येईल.

**अल्पविकसित राष्ट्रांची वैशिष्ट्ये** (Characteristics of less Developed Countries)

विकासाच्या संदर्भात अविकसित, विकसनशील, अल्पविकसित, गरीब, मागास इत्यादी शब्दप्रयोग वापरले जातात, तसेच दरडोई वास्तव उत्पन्न कमी असलेले राष्ट्र हे गरीब राष्ट्र होय. आधुनिकीकरणाचा वापर सुरू झालेला नाही असे राष्ट्र म्हणजे मागास राष्ट्र होय, असे ढोबळमानाने म्हणता येईल. परंतु ज्या राष्ट्रांमध्ये विकासाची सुप्त क्षमता आहे, मात्र त्या क्षमतेचा पर्याप्त वापर होत नसल्यामुळे या राष्ट्रांचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग मंद असतो. अशा राष्ट्रांची गणना अर्धविकसित राष्ट्रांमध्ये केली जाते.

अलीकडील काळात जागतिक पातळीवरील विविध देशांचे तीन वर्गात वर्गीकरण करण्यात आलेले आहे. आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेल्या भांडवलशाही राष्ट्रांचे पहिले जग, आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेल्या समाजावादी राष्ट्रांचे दुसरे जग आणि आफ्रिका, लॅटिन अमेरिका व आशिया खंडातील अप्रगत किंवा गरीब राष्ट्रांचे तिसरे जग. गेल्या दशकामध्ये दुसऱ्या जगातील राष्ट्रांचे एका अर्थाने नेतृत्व करणाऱ्या रशियाचे विघटन झाले आहे. एका अर्थाने साम्यवादी विचारधारेचा पराभव झाला आहे व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी खाजगीकरण, उदारीकरण, खुली स्पर्धा हाच एकमेव मार्ग आहे असे बहुतेक विचारवंत मानू

लागले आहेत. हे बदलते संदर्भ लक्षात घेता भविष्यात जगातील राष्ट्रांचे तीन गटांऐवजी श्रीमंत व गरीब (प्रगत व अप्रगत) असे दोनच गट शिल्लक राहतील असे स्पष्ट दिसत आहे.

अल्पविकसित राष्ट्रांनाच सकारात्मक दृष्टिकोनातून विकसनशील राष्ट्र म्हणण्याचा अलीकडील काळात प्रघात आहे. हे समजून घेण्यासाठी अल्पविकसित राष्ट्र म्हणजे काय याच्या अनेक अर्थतज्ज्ञांनी दिलेल्या व्याख्या पाहुयात.

स्टॅनलेने दारिद्र्य या निर्देशकावर भर देऊन पुढीलप्रमाणे व्याख्या दिलेली आहे. "अल्पविकसित राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य आढळून येते. या राष्ट्रातील दारिद्र्याचा प्रश्न हा तात्कालिक स्वरूपाचा नसून दीर्घकालीन स्वरूपाचा असतो. तसेच या देशात नैसर्गिक साधनसामुग्रीची कमतरता आहे म्हणून दारिद्र्याची स्थिती नसते तर या देशात वापरल्या जाणाऱ्या कालबाह्य उत्पादन पद्धती व सामाजिक संघटन पद्धतीमुळे हे दारिद्र्य असते. परंतु इतर विकसित राष्ट्रांत झालेल्या मार्गांचा अवलंब केल्यास या देशातील दारिद्र्य कमी होऊ शकते अशा राष्ट्रास अल्पविकसित राष्ट्र म्हणतात."

जे. व्हायनर यांनी देशातील लोकांची जीवनमान पातळी या निर्देशकावर त्यांच्या व्याख्येत भर दिलेला आहे. त्यांच्या मते, "अल्पविकसित राष्ट्र म्हणजे असे राष्ट्र ज्यामध्ये भांडवल, श्रमशक्ती व अन्य उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर वर्तमान स्थितीमध्ये होत असलेल्या वापराच्या तुलनेत अधिक प्रमाणात करण्याची क्षमता असते. या क्षमतेच्या अधिक वापराद्वारे त्या राष्ट्रात असलेल्या लोकसंख्येच्या जीवनमान पातळीत वाढ करणे शक्य असते अथवा प्रचलित जीवनमान मुळातच अधिक असेल तर , आहे ती जीवनमान पातळी न खालवता जास्त लोकसंख्येचे पोषण करता येते."

रॅग्नर नर्क्स यांनी भांडवलाची उपलब्धता या घटकावर त्यांच्या व्याख्येत अधिक भर दिलेला आढळून येतो. त्यांच्या मते, "ज्या राष्ट्रात उपलब्ध लोकसंख्या व नैसर्गिक साधनसामुग्रीच्या मानाने भांडवलाचे प्रमाण प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत कमी असते असे राष्ट्र हे अल्पविकसित राष्ट्र होय."

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांच्या मते, "ज्याचे दरडोई वास्तव उत्पन्न अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्या दरडोई वास्तव उत्पन्नाच्या तुलनेत कमी असेल असे राष्ट्र म्हणजे अल्पविकसित राष्ट्र होय."

भारतीय नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात अविकसित किंवा अल्पविकसित राष्ट्राची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे. "एका बाजूस उपलब्ध मनुष्य बळाचा वापर न होणे किंवा अपुरा वापर होणे आणि दुसऱ्या

बाजूस देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्रीचा अपुऱ्या वापरामुळे ही साधनसामुग्री पडून राहणे अशी स्थिती एकाच वेळेस ज्या राष्ट्रात आढळून येते असे राष्ट्र म्हणजे अविकसित किंवा अल्पविकसित राष्ट्र होय.''

वरील व्याख्यांच्या आधारे अल्पविकसित अर्थव्यवस्थेची आर्थिक, सामाजिक, राजकीय व तांत्रिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## अल्पविकसित राष्ट्रांची वैशिष्ट्ये

**१. दरडोई उत्पन्न कमी :** अल्पविकसित राष्ट्रांचे दरडोई उत्पन्न विकसित राष्ट्रांच्या तुलनेने खूपच कमी असते. तसेच दरडोई उत्पन्न वाढीचा वेगही मंद असतो. उदा. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रे, आफ्रिका खंडातील राष्ट्रे यांचे दरडोई उत्पन्न अमेरिका, कॅनडा, जपान आदी विकसित राष्ट्रांच्या तुलनेत खूपच कमी आहे.

**२. अपुरे भांडवल :** देशातील उपलब्ध श्रमशक्ती व नैसर्गिक साधनसामुग्रीचा पुरपूर वापर करण्यासाठी भांडवलाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. परंतु अल्पविकसित देशातील लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्याची बचतक्षमता कमी असते. त्यामुळे भांडवलनिर्मिती पुरेशा प्रमाणात होत नाही. स्वाभाविकपणे या राष्ट्रांना अपुऱ्या भांडवलाच्या समस्येला तोंड द्यावे लागते. प्रा. नर्क्सनी अल्पविकसित राष्ट्रांच्या दिलेल्या व्याख्येत भांडवलाची कमतरता या घटकाकडे आपले लक्ष वेधले आहे.

**३. अतिरिक्त लोकसंख्येचा भार :** अल्पविकसित राष्ट्रांमध्ये लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो. त्यामुळे दरडोई उत्पन्न मंद गतीने वाढते. याचा परिणाम भांडवलनिर्मिती पुरेशा प्रमाणात न झाल्यामुळे एकूण उत्पादन वाढत्या लोकसंख्येच्या गरजांच्या तुलनेत कमी पडते. तसेच देशातील लोकांचे राहणीमान कनिष्ठ प्रतीचे असते. कुपोषण, दारिद्र्य, निरक्षरता, अनारोग्य इत्यादी प्रश्न निर्माण होतात.

**४. बेरोजगारी :** या अर्थव्यवस्थेत एका बाजूने वाढत्या लोकसंख्येमुळे रोजगार मागणाऱ्यांची संख्या वेगाने वाढत असते. तर दुसऱ्या बाजूने गुंतवणुकीचा अल्प दर, उद्योग व सेवाक्षेत्रातील मागासलेपण यामुळे रोजगार निर्मितीचा वेग मंद असतो. थोडक्यात, रोजगारासाठी असलेली मागणी ही अर्थव्यवस्थेकडून पुरविल्या जाणाऱ्या रोजगाराच्या तुलनेत अधिक होते व बेरोजगारी वाढत जाते. तसेच जसजसे औद्योगीकरण होत असते तसतसे ग्रामीण भागात पूर्वापार असलेले कुटीर व ग्रामीण उद्योग नष्ट होत जातात. रोजगारासाठी हा वर्ग शेतीकडे वळतो. शेती मागास असते त्यामुळे शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा भार वाढत जातो.

एकंदरीत ग्रामीण भागातसुद्धा बेकारीचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करतो. थोडक्यात, वाढती बेरोजगारी हे अल्पविकसित अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

**५. नैसर्गिक साधनसामुग्रीचा अपुरा वापर :** अल्पविकसित राष्ट्रांमध्ये उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्रीचा एक तर वापर होत नाही अथवा जरीही वापर होत असला तरी तो पुरेशा प्रमाणावर होत नाही असे सर्वसाधारण चित्र दिसते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी आवश्यक असलेली जिज्ञासू वृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, तांत्रिक प्रगती, कुशल मनुष्यबळ आणि भांडवलाची उपलब्धता यांचीच मुळात अल्पविकसित राष्ट्राकडे कमतरता असते त्यामुळे उपलब्ध नैसर्गिक सामुग्रीचा या राष्ट्रांमध्ये अपुरा वापर होतो. त्यामुळे साधनधनाच्या दृष्टीने श्रीमंत असलेली ही राष्ट्रे प्रत्यक्ष गरीबच राहतात.

**६. प्राथमिक क्षेत्राचा प्रभाव :** या राष्ट्रांमध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेती, जंगले, मत्स्यव्यवसाय आदी प्राथमिक क्षेत्रातील उत्पादनाचा वाटा अधिक असतो. उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास झालेला नसल्यामुळे या क्षेत्राचा वाटा तुलनेने कमी असतो. तसेच या देशातून जी निर्यात होते त्यामध्येसुद्धा प्राथमिक क्षेत्रातील वस्तूंचे प्रमाण अधिक असते. उदा. कापसाच्या गाठी, मासळी, खनिजे, तेलबिया, मसाल्याचे पदार्थ इत्यादी. बहुतेक अल्पविकसित राष्ट्रांमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. या राष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी जास्तीत जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असते. उदा. भारतामध्ये जवळपास ६७ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. अशा प्रकारे देशातील उत्पादन, निर्यातव्यापार, रोजगार क्षेत्र या सर्व क्षेत्रावर प्राथमिक क्षेत्राचा प्रभाव अधिक असतो.

**७. कर्जबाजारीपणा :** अविकसित राष्ट्रांतील लोकांचे उत्पन्न कमी असते. बहुसंख्य लोकांचे उत्पन्न अल्प असल्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठीसुद्धा त्यांना कर्ज घेण्याशिवाय गत्यंतर नसते. त्यात सावकार, पेढीवाल्यांचा व्याजाचा दर जास्त असतो. त्यामुळे कर्जाचा भार वाढत जातो. भारतामध्ये ग्रामीण भागात सावकाराचे प्राबल्य असल्यामुळे ग्रामीण जनता मोठ्या प्रमाणावर कर्जाच्या विळख्यात सापडली आहे हे आपण जाणतोच. शिवाय कमी उत्पन्नाचा परिणाम म्हणून राष्ट्रीय पातळीवर बचत व भांडवल निर्मितीचा दर कमी असतो. शिवाय जनतेची करदेयक्षमता मर्यादित असते त्यामुळे सरकारचे करांपासूनचे उपन्न मर्यादित असते. दुसऱ्या बाजूने वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी, सामाजिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी व एकूण उत्पादन वाढीचा दर उंचावण्यासाठी सरकारला विकास खर्चात व बिन विकास खर्चात वाढ करणे क्रमप्राप्त ठरते. अशा वेळी या

राष्ट्रांना विदेशी कर्जे मोठ्या प्रमाणावर उभारावी लागतात. परिणामी सरकारच्या कर्जातसुद्धा वाढ होते. भारताची कर्जबाजारीपणाची स्थिती आपण जाणतोच. याहीपेक्षा लॅटिन अमेरिकन राष्ट्रांची स्थिती अधिक वाईट आहे. एकूणच कर्जबाजारीपणा हे अल्पविकसित अर्थव्यवस्थेसमोरील न टाळता येणारे संकट ठरले आहे.

**८. अल्प उत्पादकता :** या राष्ट्रांतील शेती, उद्योग इत्यादी व्यवसायातील श्रमिकांची कार्यक्षमता व कार्यकुशलता प्रगत राष्ट्रांतील श्रमिकांच्या तुलनेत खूपच कमी असते. मोठ्या प्रमाणावर असलेली निरक्षरता, प्रशिक्षणाचा अभाव व शासनाद्वारे विविध कामगारविषयक कायद्यांतर्गत श्रमिकांना देण्यात आलेल्या संरक्षणातून श्रमिकांमध्ये बळावलेली सुरक्षिततेची भावना अशा व अन्य काही कारणांमुळे या देशातील श्रमिकांची कार्यक्षमता व कार्यकुशलता कमी असते. परिणामी शेती, उद्योग आदी क्षेत्रांतील उत्पादकतासुद्धा अल्प असल्याचे आढळून येते. उदा. भारतीय शेतीची दर माणसी व दरहेक्टरी उत्पादकता जपान, अमेरिका, इंग्लंड या देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे हे आपणास विदित आहेच. तेव्हा अल्पविकसित राष्ट्रांचे अल्प उत्पादकता हे आणखी एक वैशिष्ट्य होय.

**९. अप्रगत तंत्रज्ञान :** या राष्ट्रांमध्ये भांडवलाची कमतरता, उच्च शिक्षणाचे अल्प प्रमाण, प्रशिक्षणाचा अभाव, परंपरागत दृष्टिकोनाचे प्राबल्य, अल्पसंतुष्ट वृत्ती आदी कारणांमुळे नवीन संशोधन व नवप्रवर्तनासाठीचे प्रयत्न अपवादानेच होतात. त्यामुळे सवर्सामान्यत: उत्पादन क्षेत्रात व सेवा क्षेत्रात पूर्वापार वापरण्यात येणारे तंत्रज्ञान वापरले जाते. समजा जगातील घडामोडींचा परिणाम म्हणून आधुनिक तंत्रज्ञान वापरणे आवश्यक आहे अशी परिस्थिती निर्माण झाल्यास ही राष्ट्रे प्रगत राष्ट्रांनी विकसित केलेले तंत्रज्ञान त्यांच्याकडून आयात करतात व गरज भागवतात. अलीकडे जागतिकीकरण व उदारीकरणाच्या धोरणामुळे अनेक विकसनशील राष्ट्रांनी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे राष्ट्रांच्या आयातीमध्ये उच्च तंत्रज्ञानाच्या आयातीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसेल. यावरून या राष्ट्रांची तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील स्थिती ध्यानात येईल.

**१०. वाहतुक व दळणवळणाच्या सोयींचा अभाव :** ग्रामीण भागातील रस्ते, शहरांना जोडणारे रस्ते, राज्य मार्ग, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वेमार्ग इत्यादी वाहतुकीच्या सोयी या राष्ट्रांमध्ये अपुऱ्या असतात व ज्या असतात त्यांची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची असते. तसेच पोस्ट व तार, दूरध्वनी इत्यादी दळणवळणाची साधनेसुद्धा मर्यादित प्रमाणात उपलब्ध असून त्यांची कार्यक्षमता कमी दर्जाची असते. त्यामुळे देशांतर्गत आंतरराज्यीय व आंतरविभागीय संपर्क सहज व त्वरित साधणे दुरापास्त होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर वाहतुक व दळणवळणाच्या

सोयी प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत फारच कमी असतात. त्यामुळे वस्तू उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होत नाही. उत्पादन घटकांमध्ये गतिशीलतेचा अभाव दिसून येतो. व्यापार-व्यवहारामध्ये वाढ होत नाही. एकंदरीत या राष्ट्रांच्या विकासास खीळ बसते.

**११. परंपरागत दृष्टिकोन :** या राष्ट्रांतील बहुसंख्य जनता निरक्षर, अज्ञानी असल्यामुळे त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव असतो. समाजामध्ये अंधश्रद्धा, दैववादी दृष्टिकोन, रूढी व परंपरा आदींचे मोठ्या प्रमाणावर प्राबल्य असते. त्यामुळे लोकांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन, प्रयत्न व चिकाटी, साहसी वृत्ती, जिज्ञासू वृत्ती, बदलत्या परिस्थितीशी समरस होण्याची प्रवृत्ती, संशोधक वृत्ती इत्यादी गुणांचा अभाव असतो. समाजाची वैशिष्ट्ये अर्थातच या राष्ट्रांच्या प्रगतीमध्ये गतिरोधकाची भूमिका पार पाडत असतात हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

**१२. दारिद्र्याचे दुष्टचक्र :** या राष्ट्रांमध्ये सार्वत्रिक दारिद्र्य आढळून येते. ही राष्ट्रे दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेली आहेत. प्रा. नर्क्स यांनी "A country is poor because it is poor." या विधानाद्वारे मार्मिकतेने दारिद्र्याच्या दुष्टचक्राचे विश्लेषण केले आहे. दारिद्र्याचे दुष्टचक्र तीन प्रकारे कार्यरत असते.

**१. राष्ट्रीय उत्पन्न कमी :** म्हणजे लोकांची खरेदीशक्ती कमी - वस्तू व सेवांची मागणी कमी - गुंतवणूक कमी - कमी उत्पादन - कमी वास्तव उत्पन्न.

**२. वास्तव उत्पन्न कमी :** बचत कमी - गुंतवणूक कमी - कमी उत्पादन, वास्तव उत्पन्न कमी.

**३. बाजारपेठेतील अपूर्णता :** नैसर्गिक साधनांचा अपुरा वापर - मागासलेपण - बाजारपेठेतील अपूर्णता.

अशा प्रकारे अल्पविकसित देश दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेले असतात. अलीकडील काळात अल्पविकसित राष्ट्र सामान्यतः प्रगत राष्ट्र व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांच्याकडून सहकार्य घेऊन दुष्टचक्रास छेद देण्यासाठी प्रयत्नरत असल्याचे दिसून येते.

**१३. द्विदल किंवा दुपाखी अर्थव्यवस्था :**

अविकसित राष्ट्रांमध्ये जेव्हा विकासासाठीच्या प्रयत्नांचा प्रारंभ होतो तेव्हा या राष्ट्रातील नागरी भागातील लोक सुशिक्षित, संघटित व जागरूक असल्यामुळे ते शासनावर प्रभाव टाकू शकतात. स्वाभाविकपणे विकास प्रक्रियेतून नागरी भागामध्ये आधारभूत संरचना निर्माण केली जाते. साहजिकच नागरी भागामध्ये उद्योग व व्यापार यांचा विस्तार होतो. यातून एक आधुनिक सोयींनी युक्त नागरी

अर्थव्यवस्था निर्माण होते. या अर्थव्यवस्थेत वाहतुक दळणवळणाची साधने, पाणी, आरोग्य, शिक्षण आदी सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केल्या जातात. याउलट ग्रामीण भागामध्ये निरक्षरता व अज्ञान असून जागरूकतेचा अभाव असतो. तसेच या भागात राहणारे शेतकरी, शेतमजूर असंघटित असतात. त्यामुळे त्यांना वरील सोयी व सुविधा उपलब्ध करून देणे याकडे शासनाचे दुर्लक्ष होते. यातून या राष्ट्रांमध्ये तुलनेने अधिक विकसित नागरी अर्थव्यवस्था आणि मागास ग्रामीण अर्थव्यवस्था असे एकाच वेळी दोन स्तर असलेली द्विदल अर्थव्यवस्था अस्तित्वात असते.

याशिवाय अविकसित नाणेबाजार व भांडवल बाजार, देवीघेवीच्या समतोलातील प्रतिकूलता, बालश्रमिकांची मोठी संख्या, महिलांना दुय्यम दर्जा, निकृष्ट आहार, आर्थिक विषमता, नोकरशाहीचे वर्चस्व, मनुष्यबळाचा अपुरा विकास, उद्योजकतेचा अभाव इत्यादी अल्पविकसित राष्ट्रांची अन्य वैशिष्ट्ये सांगता येतील.

**आर्थिक विकासाला चालना देणारे (प्रेरक) घटक** (Factors Promoting Economic Development)

या प्रकरणाच्या मागील घटकामध्ये आपण अल्पविकसित अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पाहिली त्यावरून आर्थिक विकासामध्ये गतिरोध (अडथळे) निर्माण करणारे घटक कोणते आणि आर्थिक विकासास चालना देणारे घटक कोणते हे सहजपणे ध्यानात येते.

(एखादे राष्ट्र अविकसित का असते याची अनेक अर्थशास्त्रज्ञांनी सविस्तर मीमांसा केली आहे. अर्थात राष्ट्राच्या अविकसित अवस्थेला कारणीभूत असलेली स्थिती म्हणजेच आर्थिक विकासातील अडथळे होत.)

प्रा. व्हायनर यांनी अल्प उत्पादन, अतिरिक्त लोकसंख्या, अपुरे भांडवल आणि विदेशी व्यापार असे चार अडथळे नमूद केले आहेत.

मेयर व बाल्डविन यांच्या मते, दारिद्र्याचे दुष्टचक्र, बाजरपेठेची अपूर्णता आणि आंतरराष्ट्रीय शक्ती असे आर्थिक विकासाच्या मार्गातील तीन प्रमुख अडथळे होत.

याशिवाय उत्पादन घटकातील गतिशीलतेचा अभाव, किंमत परिदृढता, एकाधिकार व प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहाराचे अस्तित्व, आधारभूत संरचनेचा अभाव, आर्थिक व सामाजिक संस्थांची सदोष रचना, राजकीय अस्थैर्य, जुनाट उत्पादन तंत्र, परंपरागत दृष्टिकोन, सदोष नियोजन इत्यादी आणखी काही अडथळे असल्याचे निदर्शनास येते. हे अडथळे दूर कसे करावेत याचा अविकसित राष्ट्रांना विचार करावा लागतो व त्याप्रमाणे नियोजन करावे लागते. त्याचबरोबर

आर्थिक विकासाला चालना देणारे किंवा प्रेरक घटक कोणते याचाही या राष्ट्रांना विचार करणे आवश्यक असते. या ठिकाणी आपल्याला या घटकांचा सविस्तर विचार करावयाचा आहे.

**आर्थिक विकासाचे प्रेरक घटक :**

आर्थिक विकासासाठी प्रेरक घटक किंवा ज्या घटकांच्या अनुकूलतेमुळे विकासाला गती मिळते अशा घटकांचे आर्थिक घटक व अनार्थिक (आर्थिकेतर) घटक असे प्रामुख्याने दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.

**आर्थिक घटक :**

**१. नैसर्गिक साधनसामुग्री :** यामध्ये राष्ट्रातील भूमी, हवामान, खनिजे, वनसंपत्ती, जलसंपत्ती इत्यादींचा समावेश होतो. ज्या राष्ट्रांमध्ये नैसर्गिक साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात त्यांचा विकास झपाट्याने होतो. अर्थात, या नैसर्गिक साधनांचा वापर पुरेपूर केला जाणे हे त्यासाठी गरजेचे असते. अलीकडील काळात उच्च तंत्रज्ञानाच्या साहाय्याने काही राष्ट्रांनी नैसर्गिक साधनांच्या प्रतिकूलतेवर मात करूनही आपला विकास साध्य केला आहे. उदाहरणार्थ इस्त्रायल आणि जपान असे असले तरी नैसर्गिक साधनांची अनुकूलता असणे हा राष्ट्राच्या जलद विकासास पोषक ठरणारा महत्त्वाचा घटक होय.

**२. भांडवलाची उपलब्धता :** भांडवल म्हणजे पैसा असे वरवर पाहता मानले जाते. परंतु अर्थशास्त्रामध्ये भांडवल 'पुनरुत्पादक शक्तीचा साठा' अशा अर्थाने भांडवल या साधनाचा अर्थ घेतला जातो. आर्थिक विकासाला प्रेरक ठरणारा हा दुसरा महत्त्वाचा आर्थिक घटक होय. यामध्ये यंत्रसामुग्री, इमारती, आदी बाबींचा समावेश होतो. उपलब्ध नैसर्गिक साधन धनाचा पर्याप्त वापर करण्यासाठी भांडवलाचा वापर केला जातो. प्रगत राष्ट्रांनी त्यांच्याजवळ असलेल्या या घटकाच्या अनुकूलतेमुळे आर्थिक विकास जलद गतीने केला असे दिसून येते.

**३. संघटन कौशल्य :** संघटक किंवा संयोजक हा आणखी एक महत्त्वाचा आर्थिक घटक होय. अल्पविकसित राष्ट्रांच्या विकासाची गती मंद असल्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे या राष्ट्रात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन धन व भांडवल इत्यादी उत्पादन घटकांचा पुरेपूर वापर करण्यासाठी पुढाकार घेऊन कार्य करणाऱ्या संयोजकांची कमतरता हे होय. उत्पादनासाठी आवश्यक भूमी, श्रम व भांडवल या घटकांचे सुयोग्य एकत्रीकरण करून कमीत कमी उत्पादन खर्चात जास्तीत जास्त उत्पादन करणे हे संघटकाचे महत्त्वाचे कार्य होय. यासाठी संघटकाकडे संघटन कौशल्याबरोबरच साहसी वृत्ती, चिकाटी, भविष्याचा वेध घेण्याची क्षमता इत्यादी गुणवैशिष्ट्यांची गरज असते. प्रगत राष्ट्रांमध्ये संयोजकाचा

एक मोठा वर्ग असल्यामुळे या देशांची औद्योगिक प्रगती झपाट्याने झाली हा अनुभव आहे. त्यावरून या घटकाचे महत्त्व लक्षात येते.

**४. मानव संसाधन :** यापूर्वी भांडवल या घटकाचा वर उल्लेख आलेला आहे. आर्थिक विकासासाठी भांडवल, नैसर्गिक साधने हे जसे महत्त्वाचे घटक आहेत तसेच किंवा त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा घटक म्हणजे त्या देशातील मानव संसाधनांची उपलब्धता हा होय. यालाच 'मानवी भांडवल', 'ह्युमन कॅपिटल' असे म्हणतात. एखाद्या राष्ट्रातील मानव संसाधनाची संख्यात्मक व गुणात्मक स्थिती अनुकूल असेल तर तेथील विकास प्रक्रियेला योग्य दिशा व गती मिळते. मानव संसाधनाची गुणात्मकता त्या देशातील लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांचे शिक्षण, त्यांची नवीन ज्ञान आत्मसात करण्याची इच्छा व क्षमता, त्यांना अवगत असलेले तंत्रज्ञान यावर अवलंबून असते.

**५. तांत्रिक प्रगती :** तांत्रिक प्रगतीचा संबंध राष्ट्रातील वस्तू व सेवांच्या उत्पादन पद्धतीशी येतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अनेक राष्ट्रांनी स्वत:चा विकास तर घडवून आणलाच त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:चे वर्चस्व प्राप्त केले आहे. तांत्रिक प्रगती हा घटक आर्थिक विकासासाठी किती महत्त्वाचा आहे याचा 'तांत्रिक प्रगती व आर्थिक विकास' या प्रकरणामध्ये आपण सविस्तर विचार करणार आहोतच.

**६. श्रमविभागणी :** औद्योगिक क्रांतीनंतर मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या उद्योगांचा विकास व विस्तार होत गेला. विशेषीकरण व श्रमविभागणी हे या उद्योगांच्या भरभराटीसाठी आवश्यक बाब ठरली. श्रमविभागणीमुळे श्रमिकांची कार्यकुशलता वाढते. उत्पादनाच्या साधनात बचत होते. वेळेची बचत होते, उत्पादन वाढते. उत्पादन खर्चात घट होते, वस्तूंचा दर्जा सुधारतो या सर्व फायद्यांमुळे आर्थिक विकासासा चालना मिळते.

याशिवाय विकसित बाजारपेठ, वित्तीय सेवांची उपलब्धता, आधारभूत संरचना, आर्थिक धोरण इत्यादी घटकांचा आर्थिक घटकांमध्ये समावेश होतो.

**अनार्थिक (आर्थिकेतर) घटक :**

आर्थिक विकासासाठी ज्याप्रमाणे आर्थिक घटकांचे महत्त्व आहे त्याचप्रमाणे आर्थिकेतर घटकही तेवढेच महत्त्वाचे आहेत. आर्थिकेतर घटक अनुकूल असतील तर आर्थिक विकास जलद गतीने होतो. तसेच एखाद्या राष्ट्राचा जसजसा विकास होतो तसतशी त्या राष्ट्रातील आर्थिकेतर घटकांमध्ये अनुकूलता निर्माण होते. आर्थिकेतर घटकांमध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटकांचा समावेश होतो. त्यापैकी काही प्रमुख घटकांचा पुढीलप्रमाणे उल्लेख करता येईल.

**१. ऐतिहासिक कारणे :** ज्या देशाची संस्कृती समृद्ध असते, ज्या राष्ट्रांचा इतिहास हा पराक्रम व विजयी घटनांनी युक्त असतो अशा राष्ट्रांतील समाजामध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान व राष्ट्राभिमान जागृत असतो. अशा समाजामध्ये विजिगिषू वृत्ती दिसून येते. या राष्ट्रातील लोक जगामध्ये आपले सामर्थ्य टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी अविरत प्रयत्न करतात. भारताची संस्कृती अतिप्राचीन आहे हे आपण जाणतो. आपला प्राचीन इतिहास म्हणजे पराक्रमांची गाथा आहे. असे असूनही आपला देश अविकसित का? असा आपल्या मनात प्रश्न निर्माण होऊ शकतो. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे गेली काही शतके भारतामध्ये असलेले परकीयांचे राज्य व त्यातून निर्माण झालेली गुलामी वृत्ती आणि न्यूनगंड हे होय. याउलट ज्यू लोकांनी अनेक वर्षे आपल्या मातृभूमीपासून दूर राहून हालअपेष्टा सहन केल्या, परंतु त्यांच्यामध्ये असलेला राष्ट्राविषयीचा अभिमान व प्रबळ महत्त्वाकांक्षा यामुळे आज नैसर्गिक प्रतिकूलतेवर मात करून ते एक सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून समर्थपणे उभे राहिले.

**२. सामाजिक स्थिती :** आर्थिक किंवा भौतिक विकासासाठी त्या देशातील सामाजिक स्थिती अनुकूल असावी लागते. जातीव्यवस्थेचा प्रभाव, स्पृश्य-अस्पृश्यतेची भावना, श्रेष्ठ व कनिष्ठतेची भावना, महिलांचे समाजातील दुय्यम स्थान, बालश्रमिकांचे अधिक प्रमाण, अंधश्रद्धा, निरक्षरता इत्यादी बाबींचे अस्तित्व आर्थिक विकासात अडथळा निर्माण करतात. याउलट त्या समाजामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य असेल, सामाजिक समता व बंधुभाव असेल, समान संधी व श्रममूल्याला प्रतिष्ठा असेल, स्त्री-पुरुषांना समान दर्जा व सन्मान दिला जात असेल, वैज्ञानिक दृष्टिकोन असेल, साक्षरतेचे प्रमाण अधिक असेल तर त्या देशाचा आर्थिक विकास वेगाने होतो.

**३. राज्यव्यवस्था :** अलीकडील काळात कल्याणकारी राज्याची कल्पना विकसित झाली आहे. अशा देशांमध्ये लोककल्याण हा प्रमुख हेतू ध्यानात घेऊन शासन अनेक योजना आखते. त्यांची अंमलबजावणी करते. यासाठी लोकशाही शासनप्रणाली ही आज सर्वमान्य शासनव्यवस्था मानली जाते. या शासनव्यवस्थेमध्ये आर्थिक विकासास पोषक वातावरण निर्माण होते.

**४. शांतता व सुव्यवस्था :** ज्या देशात शांतता व सुव्यवस्था असते अशा देशांचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यास मदत होते. आर्थिक व्यवहार सुरळीत चालण्यासाठी याची गरज असते. या घटकाचा ज्या ठिकाणी अभाव असतो तेथे उद्योजकांना असुरक्षिततेची भावना निर्माण होते व ते गुंतवणूक करण्यास तयार नसतात. तेव्हा अधिकाधिक उद्योजकांनी पुढे येऊन गुंतवणूक

३) **उत्पन्न निर्देशक-** उत्पन्न व संपत्तीचा विचार

४) **रोजगार निर्देशक-** एकूण रोजगारात शेतीमधील रोजगाराचा हिस्सा, कामाचे सरासरी दिवस, १००० लोकसंख्येमागे कामकरी व्यक्तींचे प्रमाण इ.

५) **आरोग्य निर्देशक-** साथीच्या व इतर रोगांचे प्रमाण, बालमृत्यूचे प्रमाण, आयुर्मान इत्यादी.

६) **शैक्षणिक निर्देशक-** साक्षरतेचा दर, प्रौढ साक्षरता वगैरे.

७) **निवास निर्देशक-** बेघरांचे प्रमाण, निवासाचे स्वरूप इ.

८) **मूलभूत सोयींचा निर्देशक -** पिण्याचे पाणी, दवाखाने, शाळा, बाजारपेठा, बँका यांची उपलब्धता.

९) **सामाजिक निर्देशक-** मुलींचे लग्नाच्या वेळी वय, जन्मदर, कुटुंब नियोजनाला प्रतिसाद, कुटुंबाचा सरासरी आकार वगैरे.

थोडक्यात, विकासाचे मापन करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याने एकूण परिस्थितीचा विचार करून योग्य असे निरनिराळे निर्देशक वापरणे अधिक वास्तववादी व व्यावहारिकदृष्ट्या योग्य ठरेल.

## आर्थिक वृद्धी (Economic Growth)

### आर्थिक विकास व वृद्धी यातील फरक

आर्थिक विकास आणि वृद्धी या दोन वेगवेगळ्या कल्पना आहेत काय याविषयी अर्थशास्त्रज्ञांमध्ये बरेच मतभेद आहेत. बरेच अर्थशास्त्रज्ञ या दोन कल्पनांमध्ये फरक करतात.

१) **शुम्पिटर-** आर्थिक विकास हा अर्थव्यवस्थेच्या स्थैतिक (Stationary) अवस्थेतील उत्स्फूर्त बदल असून विकासाची प्रक्रिया खंडित (Discontinuous) किंवा तुटक असू शकते. याउलट अर्थव्यवस्थेमध्ये दीर्घकाळात संथपणे व सातत्याने होत जाणारा बदल म्हणजे वृद्धी होय. वृद्धीमधील हा बदल बचतीचा दर आणि लोकसंख्या यामधील सामान्य वाढीमुळे घडून येतो.

२) **उर्सुला हिक्स-** उर्सुला हिक्स यांनी विकासाचा संबंध विकसनशील देशांशी तर वृद्धीचा संबंध विकसित देशांच्या प्रगतीशी जोडला आहे. विकसनशील देशांपुढील मुख्य प्रश्न म्हणजे ज्या साधनांचे उपयोग माहित आहेत पण तरीही ज्यांचा वापर झाला नाही त्यांना उपयोगात कसे आणयचे? त्या दृष्टीने अंमलात आणली जाणारी प्रक्रिया म्हणजे विकास होय. प्रगत राष्ट्रांमध्ये मात्र बरीच साधने माहीत असतात व शिवाय ती विकसित असतात. त्यामुळे तेथील प्रक्रियेचे स्वरूप भिन्न असते, तिलाच वृद्धी असे म्हणता येईल. साध्या शब्दात, विकसनशील देशातील प्रगतीची प्रक्रिया म्हणजे विकास, तर विकसित राष्ट्रांमधील वाढीची प्रक्रिया म्हणजे वृद्धी होय.

३) **जे.के मेहता-** प्रो. मेहता यांच्या मते आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत होणारे बदल हे गुणात्मक स्वरूपाचे (Qualitative) असतात, तर वृद्धीच्या काळात होणारे बदल मात्रात्मक स्वरूपाचे (Quantitative) असतात. विकसनशील देशातील उपलब्ध साधने, तंत्रज्ञानाची पातळी इत्यादी विचारात घेता तेथे वेगवान विकासासाठी गुणात्मक बदल आवश्यक ठरतात. पण विकसित देशात मात्र हे घटक आधीच प्रगत असल्याने मुख्य प्रश्न वाढीशी निगडित असतो, व त्यामुळे तेथील बदल प्रामुख्याने मात्रात्मक असतात.

४) **मॅडिसन-** विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांमध्ये जे प्रयत्न केले जातात त्यांचा उद्देश उत्पन्नाची पातळी उंचावणे हाच असतो. मॅडिसन यांच्या मते हा प्रयत्न विकसित देशात होत असल्यास त्याला वृद्धी म्हणावे तर विकसनशील देशांमधील प्रक्रियेला विकास म्हणावे, कारण उद्दिष्ट समान असले तरी विकासाच्या अवस्थेतील अंतरामुळे या दोन्ही देशांचे मार्ग मात्र समान राहू शकत

नाहीत.

**५) बॉने-** प्रो. बॉने यांच्या दृष्टीने, विकसनशील देशात निरनिराळ्या घटकात वाढ करून ती टिकविण्यासाठी काही प्रमाणात मार्गदर्शन व नियमनाची गरज असते.या पद्धतील विकास म्हणता येईल. पण विकसित असलेल्या (मुक्त) अर्थव्यवस्थांमध्ये शिक्षण, उद्योजकता इत्यादींचा स्तर इतका वाढलेला असतो की विकासाची प्रक्रिया बरीचशी स्वयंस्फूर्त असते, व त्यामुळे नियमनाची फारशी गरज नसते. या तऱ्हेच्या प्रक्रियेला वृद्धी म्हणता येईल.

वरील मतांच्या आधारे आर्थिक विकास व वृद्धी यामध्ये पुढील फरक दाखविता येतो–

**१) साधनांची स्थिती -** देश विकसनशील असला तरी तेथे विकासासाठी बरीच साधने उपलब्ध असू शकतात. या साधनांचा उपयोगही ज्ञात असतो. परंतु पुरेशा विकासाअभावी त्यांचा वापर करणे मात्र शक्य होत नाही. म्हणून प्रथमतः या साधनांचा विकास करणे हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा एक आवश्यक भाग असतो. याउलट विकसित देशांमध्ये साधनांचे उपयोग माहीत असतात, त्या दृष्टीने विविध साधने विकसित झालेली असतात व त्यांचा वापरही केला जातो. त्यामुळे येथील प्रक्रियेचे स्वरूप भिन्न राहाणे अपरिहार्य आहे. म्हणूनच तिचे वर्णन वृद्धी या शब्दाने करतात.

**२) मात्रात्मक व गुणात्मक फरक-** आर्थिक वृद्धी या शब्दातून आर्थिक घटकांमधील मात्रात्मक परिवर्तन दिसून येते. विकसित देशात आदानांची (Inputs) उपलब्धता जास्त असल्यामुळे उत्पादन वाढते. तसेच कार्यक्षमतेचा स्तर उच्च असल्याने आदानाच्या प्रति मात्रेसाठी उत्पादनात होणारी वाढ जास्त असते. ही परिस्थिती विकसनशील देशात नसते. म्हणून विकसित देशातील प्रक्रियेचा वेगळेपणा 'वृद्धी' या शब्दातून व्यक्त करतात. प्रो. हॅरड किंवा डोमर यांनी जी प्रारूपे (Models) मांडली आहेत त्यांचा उद्देश विकसित देशांच्या प्रगतीची प्रक्रिया स्पष्ट करणे हाच आहे, आणि त्यांचा उल्लेखही 'वृद्धीची प्रारूपे' (Growth Models) असाच करतात.

वृद्धीच्या कल्पनेतून उत्पन्नात वाढीची सुरूवात कशी होते याचे स्पष्टीकरण नसते, कारण ती सुरुवात पूर्वीच झालेली असून त्यापुढील प्रक्रियेचे स्पष्टीकरण करण्याचे काम तेवढे या कल्पनेद्वारे केले जाते. दुसऱ्या शब्दात, वृद्धीच्या संदर्भात प्रगतीचा एक किमान स्तर गृहितच धरला जातो. तांत्रिक प्रगती, उत्पादक घटकांमधील वाढ वगैरे घटकांचा विशिष्ट दर आधी गृहीत धरून मगच वृद्धीची प्रारूपे मांडली जातात. परंतु जे घटक विकसित राष्ट्रांसाठी स्वाभाविकपणे गृहीत धरता येतात तेच विकसनशील देशांसाठी जास्त महत्वाचे ठरतात, कारण तेवढ्या प्रगतीच्या अभावी तेथे गुणात्मक परिवर्तनाची गरज आधी असते. या फरकामुळेच वृद्धीच्या प्रारूपांचा उल्लेख 'श्रीमंत राष्ट्रांचे सिद्धांत' असा केला जातो.

**३) विकासाची अवस्था-** वरील विवेचनावरून दिसून येते की वृद्धीचा संबंध विकसित अवस्थेशी तर विकासाचा संबंध विकसनशील अवस्थेतील प्रगतीशी जोडण्यात येतो.

**४) प्रक्रियेचे स्वरूप-** विकसित व विकसनशील अशा दोन्ही देशात प्रगती सुरू असते, पण त्या प्रक्रियेचे स्वरूप मात्र भिन्न असते. विकानशील देशांपुढील प्रश्न, निरनिराळ्या त्रुटी, प्रगतीचा निम्न स्तर, इत्यादींमुळे तेथील प्रक्रिया स्वयंस्फूर्त पण तुटक अशी राहील. याउलट विकसित देशांमध्ये अनेक गोष्टींची उच्च पातळी आधीच साध्य झालेली असल्याने ही प्रक्रिया संथपणे, सातत्याने चालणारी व दीर्घकालीन स्वरूपाची असते.

**५) साधनांचा वापर-** विकसनशील देशातील कमी विकासामुळे उपलब्ध साधनांचा वापर न होता ते पडून राहतात, म्हणून त्यांचा विकास करणे, त्यांच्या उपयोगासाठी तांत्रिक ज्ञान संपादन करणे

व नंतर उत्पन्न वाढविणे असा प्रयत्न आर्थिक विकासात करावा लागतो. परंतु विकसित देशात ही साधने आधीच वापरात असतात. तांत्रिक ज्ञानाची पातळी उच्च असते. त्यामुळे या साधनांचे कार्यक्षमरित्तीने पुनर्वितरण कसे करावे हा मुख्य प्रश्न असतो. याचे विवेचन 'वृद्धी' या नावाने केले जाते.

६) **निर्देशनाची गरज-** विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये सरकारला अनेक बाबतीत मार्गदर्शन किंवा निर्देशन करावे लागते, कारण एकदा निर्माण झालेल्या वाढीच्या प्रेरणा अशा निर्देशनाशिवाय टिकणे किंवा योग्य वळण घेणे कठीण असते. त्यामुळे विकासाच्या प्रयत्नांमध्ये निर्देशनाची गरज जास्त राहील. विकसित देशात मात्र वाढीच्या प्रक्रियेला स्वतःची एक गती प्राप्त झालेली असल्याने ती एकप्रकारे स्वयंस्फूर्त स्वरूपाची असते. तिला निर्देशनाची फारशी गरज भासत नाही. (अर्थात समाजवादी देशांचा अपवाद वगळून).

७) **क्रम-** देश आधी अविकसित असतो. नंतर त्याची विकसनशील अवस्था येते व शेवटी तो विकसित होतो. हा क्रम विचारात घेतल्यास आर्थिक विकास आधी व नंतर वृद्धी असेच म्हणावे लागते. देशाच्या स्वप्रेरित विकासासाठी आधी गुणात्मक व रचनात्मक बदल आवश्यक ठरतात, जे विकसनशील देशात केले जातात. त्यांची मीमांसा आर्थिक विकास देतो. हे बदल झाल्यानंतर पुढचा मार्ग बराच सुरळीत असतो, व त्यातील बदल वृद्धीद्वारे सांगितले जातात. एका दृष्टीने, चढाव पार केल्यानंतर पुढील सपाट रस्त्यावर निश्चितपणे चालणे असा फरक विकास व वृद्धी यात करता येईल. विकासाचा मार्ग चढावाचा आहे, तर वृद्धीचा मार्ग सहज गतीने पार पडणारा आहे.

थोडक्यात, जेथे वाढीसाठी रचनात्मक बदलांपासून सुरूवात करावी लागते तेथील प्रश्न विकासाच्या कक्षेत येतात. जेथे आधीच विशिष्ट विकास झाला आहे तेथील प्रश्न वृद्धीच्या विवेचनात येतात.

**समानार्थी कल्पना-** वरील भागात या दोन कल्पनांमधील फरक स्पष्ट केला आहे. परंतु अनेक अर्थशास्त्रज्ञांना या दोन संज्ञा समानार्थी वाटतात. प्रो. लेविस, पॉल बरन, मायर व बाल्डविन यांनी त्यांना समानार्थी मानले आहे. प्रो. लेविस यांच्या मते, नेहमी-नेहमी 'विकास' हा शब्द वापरण्यापेक्षा बदल म्हणून 'वृद्धी' किंवा 'प्रगती हे शब्द वापरणे बरे वाटते! पॉल बरनने म्हटल्यानुसार, या दोन्ही गोष्टीतून जुन्याकडून नवीन व कालसुसंगत गोष्टींकडे होणारे संक्रमण सूचित होते. जे जुने व अनुपयोगी ठरले आहे त्याच्या जागी नवीन (रचना, घटक) येणे हीच गोष्ट दोन्हीमध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे त्यांना समानार्थी मानणेच योग्य ठरेल.

मॅडिसन यांनी विकास व वृद्धीचा संबंध उत्पन्नाची पातळी वाढविण्याशीच जोडला आहे. फरक इतकाच केला आहे की हे प्रयत्न विकसित अर्थव्यवस्थेत होत असल्यास ती वृद्धी, तर विकसनशील देशात होत असल्यास तो विकास. म्हणजे हा तथांकथित फरक बराचसा अनावश्यक आहे. म्हणूनच मायर-बाल्डविन यांनी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे-""There is a tendency to use the terms economic development, economic growth and secular change interchangeably. Although it is possible to draw some fine distinction among these terms, they are in essence synonymous."

वरील मत ग्राह्य धरून प्रस्तुत पुस्तकात या दोन कल्पनांमधील फरक विचारात घेतलेला नाही. तथापि ज्या मुद्यांच्या संदर्भात संबंधित अर्थशास्त्रज्ञांनी असा भेद केला आहे तेथे तो तसाच मांडला आहे.

## आर्थिक वृद्धीचे निर्देशक (वैशिष्ट्ये)

जगातील बहुसंख्य देश विकसनशील आहेत. काही निवडक देश मात्र या अवस्थेतून गेलेले

असून तेथे होणारा स्वयंपूर्ण व स्वप्रेरित विकास हा आर्थिक वृद्धी या नावाने ओळखला जातो. अमेरिका, जपान, कॅनडा, पश्चिम युरोपीय देश यांचा समावेश 'विकसित देश' या गटात आपण करतो. आधुनिक काळातील या आर्थिक वृद्धीची काही ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यांचा अभ्यास केल्यास विकासाप्रमाणे वृद्धीचे निर्देशक कोणते याचे विवेचन या ऐतिहासिक अनुभवावरून करता येते.

**प्रो. कुझनेट्स यांचा दृष्टिकोन-** आर्थिक वृद्धीचे विश्लेषण करतांना प्रो. सिमॉन कुझनेट्स यांनी प्रथम ही कल्पना स्पष्ट केली आहे. 'आधुनिक आर्थिक वृद्धी' या पुस्तकात ते म्हणतात, "आर्थिक वृद्धी म्हणजे दरडोई किंवा प्रतिश्रमिक उत्पादनात होणारी स्वप्रेरित वाढ होय-जिच्या सोबत सामान्यतः लोकसंख्येतील वाढ आणि प्रचंड रचनात्मक बदल अनुभवास येतात."

पुढे या व्याख्येचे स्वरूप बदलून कुझनेट्स यांनी ती पुढीलप्रमाणे मांडली-"देशातील लोकांना विविध वस्तूंचा वाढत्या प्रमाणात पुरवठा करण्याच्या (अर्थ - व्यवस्थेच्या) क्षमतेतील दीर्घकालीन वाढ म्हणजे आर्थिक वृद्धी. विकसित होत जाणारे तंत्रज्ञान आणि त्यासाठी आवश्यक असे संस्थात्मक व तांत्रिक समायोजन यांचा आधार या वाढत्या क्षमतेला असतो."

वरील व्याख्येवरून असे दिसून येते की वस्तूंच्या पुरवठ्यात होत जाणारी स्वप्रेरित वाढ हे वृद्धीचे मुख्य लक्षण आहे. हा घटक साध्य होण्यासाठी तंत्रज्ञानाचा विकास होणे आवश्यक आहे, व प्रगत देशाने तो साध्य केलेला असतो. अर्थात नवीन तंत्रज्ञानाचा वापर तेव्हाच होऊ शकतो जेव्हा देशात निरनिराळे संस्थात्मक आणि तांत्रिक बदल शक्य होतील. म्हणून असे बदल घडवून नवीन तंत्रज्ञान लागू करणे व त्या आधारे वस्तूंच्या पुरवठ्यात स्वप्रेरित वाढ होणे हे वृद्धीचे मुख्य लक्षण आधुनिक काळात दिसून येते.

**वृद्धीचे निर्देशक-** विकसित राष्ट्रांच्या आधुनिक काळातील प्रगतीच्या आधारावर वृद्धीची निरनिराळी वैशिष्ट्ये दाखविता येतात. प्रो. कुझनेट्स यांनी असे सहा घटक सांगितले आहेत.

**१) लोकसंख्या व दरडोई उत्पादनाच्या वाढीचा उच्चदर-** वृद्धीच्या काळात देशातील लोकसंख्येच्या वाढीचा वेग बराच जास्त दिसून येतो. पण त्याचवेळी, देशाने साध्य केलेल्या प्रगतीमुळे, उत्पादन इतके वाढत असते की दरडोई उत्पादनाच्या वाढीचा वेगसुद्धा जास्त असतो. अर्थात लोकसंख्येची वाढ होणे ही गोष्ट दरडोई उत्पादन वाढीसोबत असेलच असे नाही. रशिया, इंग्लंड, स्वीडन, इटाली या देशांमध्ये लोकसंख्येच्या वाढीचा वेग बराच कमी होता, तर दरडोई उत्पादनाच्या वाढीचा वेग त्या तुलनेत जास्त होता. अमेरिका आणि कॅनडामध्ये मात्र हे दोन्ही दर उच्च होते. अर्थात यावेळी एकुण उत्पादनाच्या वाढीचा वेगही जास्त होता हे सांगण्याची गरज नाही. अन्यथा दरडोई उत्पादन वाढ इतक्या वेगाने झालेली दिसली नसती. सरासरीने विचार करता, विकसित देशांमध्ये लोकसंख्येची वाढ एक प्रतिशत वेगाने, दरडोई उत्पादनाची वाढ दोन प्रतिशत वेगाने तर एकूण उत्पादनाची वाढ तीन प्रतिशत वेगाने झालेली दिसते. दशकामधील वाढीच्या वेगांचा सरासरीने विचार केल्यास ऑस्ट्रेलिया, अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये लोकसंख्या १९ ते २४ प्रतिशत वेगाने वाढली. डेन्मार्क, पश्चिम जर्मनी, जपान इत्यादी देशात हा वेग १० ते १४ टक्के होता, तर इंग्लंड, स्वीडन, इटाली या देशामध्ये ६ ते ७ प्रतिशतच्या दरम्यान होता. या तुलनेत दरडोई उत्पादनातील वाढीचा वेग (प्रतिदशक) विचारात घेतल्यास, रशियामध्ये तो सर्वात जास्त म्हणजे ४४ टक्के होता. जपानमध्ये हा दर २६ प्रतिशत तर अमेरिका, जर्मनी आदी देशात १६ ते १९ प्रतिशतच्या दरम्यान होता. यावरून सामान्यपणे असे म्हणता येईल की लोकसंख्या आणि दरडोई उत्पादन यांची वेगाने वाढ होणे हा वृद्धीचा एक सूचक आहे.

**२) उत्पादकतेत वाढ -** प्रो. कुझनेट्स यांच्या मते, बहुतेक विकसित देशांमध्ये आधुनिक काळात उत्पादकतेमध्ये खूप वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे दरडोई उत्पादन सुद्धा वेगाने वाढले.

असे घडून येण्याचे मुख्य कारण म्हणजे प्रगतीच्या काळात विविध आदानांच्या दर्जात घडून आलेली सुधारणा हे होय.

ऐतिहासिक अनुभव असे दर्शवितो की वृद्धीच्या काळात विकसित देशांमध्ये लोकसंख्या वेगाने वाढत असल्यामुळे श्रमाचा पुरवठासुद्धा वाढतो. थोड्या देशांचा अपवाद वगळता, बाकी सर्व विकसित देशांमध्ये श्रमशक्तीचे एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण वाढतांना दिसून येते. अर्थात लोकसंख्येची वयोगट रचना अधिक अनुकूल झाल्याशिवाय ही गोष्ट शक्य होत नाही.

कार्यक्षमता किंवा उत्पादकता यांच्यातील वाढ दर्शविणारा अजून एक घटक म्हणजे सरासरीने प्रत्येक व्यक्तीला कराव्या लागणाऱ्या श्रमाच्या तासांमध्ये होत गेलेली घट. कमी श्रम करावे लागूनसुद्धा उत्पादनात वाढ होणे ही गोष्ट उत्पादकतेतील सुधारणेची व वृद्धीची मुख्य सूचक आहे.

**३) रचनात्मक परिवर्तन -** अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा आणि या क्षेत्रांमध्ये गुंतलेल्या श्रमाच्या प्रमाणात होणारे बदल अभ्यासले असता वृद्धीमधील रचनात्मक परिवर्तन दिसून येते. ऑस्ट्रेलियाचा अपवाद वगळता, इतर सर्व विकसित देशांच्या एकूण उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा घटलेला दिसतो. साधारण एक शतकाच्या काळात इंग्लंडमध्ये ही घट २२ टक्क्यांवरून ५ टक्के इतकी दिसते, तर अमेरिकेमध्ये ४१ प्रतिशतपासून ९ प्रतिशतपर्यंत होती. जपानमध्ये तर शेतीचा एकूण उत्पादनातील सहभाग (१८७८) ६३ टक्के होता, तो १४ प्रतिशतपर्यंत (१९६२) कमी झालेली दिसतो. अर्थात उद्योगक्षेत्राचा हिस्सा या काळात तितक्याच वेगाने वाढला. ही वाढ साधारण ५० प्रतिशतपेक्षा जास्त दिसून येते. याचा अर्थ औद्योगीकरणाच्या वाढीमुळे एकूण उत्पादनातील शेतीचे महत्व कमी होत जाणे हे वृद्धीचे लक्षण आहे.

विविध क्षेत्रात गुंतलेल्या श्रमशक्तीचे प्रमाण कसे बदलते यावरूनही वृद्धीची कल्पना येऊ शकते. प्रदीर्घकाळाचा विचार केल्यास शेतीत गुंतलेल्या श्रमिकांचे प्रमाण इंग्लंडमध्ये ५%, अमेरिकेत १२%, जपानमध्ये ३३% तर रशियामध्ये ४०% दिसून येते. अर्थात उद्योगात गुंतलेल्या श्रमिकांचे प्रमाण वेगाने वाढले. जपान व रशियाचा विकास इतरांच्या तुलनेत उशीरा सुरू झाल्याने तेथील प्रमाण कमी घटलेले दिसते.

**४) शहरीकरण -** वाढते शहरीकरण हा औद्योगीकरणाचा अपरिहार्य परिणाम आहे. वृद्धीच्या काळात उद्योगांचे महत्व सातत्याने वाढते व शेतीचे कमी होते. त्यामुळे पूर्वी जी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण भागात राहात असे ती उद्योगातील रोजगारासाठी शहराकडे स्थलांतरीत होते. किंबहुना, असे स्थलांतरण झाल्याशिवाय औद्योगीकरणासाठी श्रमशक्ती उपलब्ध होऊ शकत नाही. याचा एक परिणाम म्हणजे वृद्धीच्या काळात शहरीकरण वेगाने वाढते. शहरीकरणाचे इतर दुष्परिणाम काहीही असले तरी त्यामुळे जन्मदरात घट, छोट्या आकाराच्या कुटुंबांची वाढ, वृद्धीला पोषक वातावरणाची निर्मिती यासारखे फायदेही होतात.

**५) प्रभाव क्षेत्रातील वाढ -** विकसित देशांमध्ये वृद्धीच्या अनुभवावरून असे दिसून येते की या देशांचा प्रभाव इतर देशांमध्ये वाढत जातो, व त्यामधून वृद्धीला चालना मिळण्याची शक्यता असते. हा घटक वृद्धीचा सूचक म्हणण्यापेक्षा एक वैशिष्ट्य म्हणून मानणे जास्त योग्य ठरेल. आधुनिक काळात दळणवळण आणि संचारमाध्यमांमध्ये जी क्रांती झाली त्यामुळे विकसित देशांना प्रभाव क्षेत्र वाढविणे जास्त शक्य झाले आहे. आंतराष्ट्रीय संबंधांचा जो राजकीय पैलू आहे तो आधुनिक काळातील वृद्धीच्या विस्ताराला कारणीभूत ठरतो असे म्हणतात, कारण पूर्वी कधी नव्हते इतके तांत्रिक ज्ञानाच्या आदानप्रदानासाठी विविध देश परस्परांवर अवलंबून झाले आहेत, व या अवलंबित्वामुळे प्रभाव क्षेत्राची वाढ अपरिहार्यपणे होते.

६) **श्रम, वस्तू व भांडवल स्थलांतर** - प्रामुख्याने पहिल्या महायुद्धापूर्वीच्या परिस्थितीचा अभ्यास करून प्रो कुझनेट्स यांनी असे दाखविले आहे की विकसित देशांमधून वरील तीन घटकांचे स्थानांतरण वेगाने झाले आहे. १९ व २० व्या शतकात युरोपातील लोक उत्तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, ब्राझिल इत्यादी देशांमध्ये स्थलांतरित झालेले दिसतात.

दुसऱ्या बाजूने, या विकसित देशांमधील प्रगत उत्पादन तंत्रामुळे, आणि दळणवळणाच्या साधनांमधील सुधारणांमुळे तेथील वस्तूंचा प्रवाह इतर देशांकडे सुरू झाला. याच काळात विदेशी व्यापारात विस्मयकारक वाढ घडून आली. तत्कालीन मुक्त व्यापाराच्या धोरणामुळे या गोष्टीला चालना मिळाली.

भांडवलाबाबतसुद्धा दिसून येते की विकसित देशातील भांडवल वाढत्या प्रमाणात इतरत्र जाते. १९५६-६१ या काळात केवळ अमेरिकेतूनच प्रतिवर्ष ६७ मिलियन डॉलर्स भांडवल बाहेर पडत होते यावरून या गोष्टीची कल्पना यावी.

प्रो. कुझनेटस् यांनी स्पष्ट केलेला हा अंतिम घटकसुद्धा आर्थिक वृद्धीचा एक परिणाम किंवा वैशिष्ट्य दाखविणारा आहे. वृद्धीचे निर्देशक या दृष्टीने सुरवातीचे चार घटक महत्वपूर्ण आहेत. त्यावरून दिसून येते की उत्पादकतेत सततवाढ, वेगवान रचनात्मक परिवर्तन, शहरीकरण आणि दरडोई उत्पादनात वाढ यावरून आर्थिक वृद्धी स्पष्ट होते.

## देशाच्या मागासलेपणाची कारणमीमांसा (Causes of Backwardness)

जगातील बहुसंख्य देश विकसनशील (म्हणजे आर्थिकदृष्ट्या मागासलेले) आहेत. त्यांच्या या अवस्थेला कारणीभूत घटक निरनिराळे आढळतात. प्रत्येक देशाच्या परिस्थितीनुसार तेथील विकासाच्या समस्या कमी-अधिक प्रमाणात तीव्र असतात. त्यामुळे सर्व देशांच्या मागासलेपणाची कारणे सारखीच असतील असे नाही. तथापि अनेक ठिकाणी आढळणारी, सर्वसामान्य अशी काही कारणे दाखविणे शक्य आहे.

### आर्थिक घटक

१) **भांडवलाची कमतरता** - मागासलेल्या देशांमध्ये नेहमी दारिद्याचे दुष्टचक्र दिसून येते. मोठ्या प्रमाणावरील बेकारी दारिद्याला जन्म देते. लोकांचे उत्पन्न अतिशय कमी असल्याने त्यांची बचतक्षमतासुद्धा कमी असते. कमी बचतीमुळे भांडवलाची निर्मिती व पुढे गुंतवण पुरेशी होत नाही. त्यामुळे पुन्हा लोकांचे उत्पन्न कमी राहून ते दरिद्री राहतात. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी जो भांडवल निर्मितीचा दर आवश्यक असतो तो साध्य न झाल्यामुळे देश मागासलेला राहतो.

या विषयाची दुसरी बाजू म्हणजे बचत कमी असली तरी जी काही उपलब्ध असते ती सुद्धा पूर्णपणे गुंतविली जात नाही. उत्पन्नाचे उपभोगावरील आधिक्य (बचत) हे बरेचदा सुवर्ण खरेदीसारख्या किंवा अनावश्यक खरेदीसारख्या मार्गाने गुंतविले जाते. परिणामतः उत्पादक गुंतवण कमी असल्याने देशाच्या समस्या तीव्र होतात.

२) **उद्योजकतेची कमतरता** - मागस देशांमध्ये जे भांडवल असते त्याचा वापर कोणत्या मार्गाने होतो हा सुद्धा महत्वाचा प्रश्न आहे. एक तर औद्योगिक क्षेत्रात धाडसी पावले टाकणारे उद्योजक आढळत नाहीत. उद्योग क्षेत्रात ज्या व्यक्ती असतात, त्यांचा दृष्टिकोन प्रवर्तनापेक्षा लवकर नफा मिळविण्याचा असतो. महाराष्ट्राच्याच एक जिल्ह्यात असे आढळले की ज्या उद्योजकांचा मूळ व्यवसाय डाळ करण्याचा आहे ते खरेदीकरून ठेवलेली तूर (बाजारात किंमती वाढताच) प्रक्रिया न करता परस्पर विकून टाकतात. त्यांच्या दृष्टीने औद्योगिक प्रक्रियेपेक्षा नफ्याला जास्त महत्व असते. अशा वातावरणामध्ये उद्योजकतेचा विकास न झाल्यामुळे देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक असे उद्योग सुरू

# प्रकरण ४

# आर्थिक विकासाचे सिद्धांत

(Theories of Economic Growth)

प्रकरण दुसरे

आर्थिक विकासाचे सिद्धांत अभ्यासताना अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या सिद्धांतापासून आरंभ करावा लागतो. तसे पाहता त्या पूर्वीच्या व्यापारवादी व निसर्गवादी विचारधारांनीसुद्धा आर्थिक विकासाविषयी चिंतन केले आहे. परंतु ते विस्कळीत स्वरूपात होते. त्यामुळे अभिमतपंथी विचारधारेपासूनच (Classical-School) विकासाच्या विवेचनास व सुसंबद्ध मांडणी सुरुवात झाली असे म्हणता येईल. आर्थिक विकासाच्या संकल्पनेचा आजच्या संदर्भात पुरेसा अर्थ स्पष्ट होण्यासाठी भूतकाळातील विविध विचारधारांनी विकासविषयक केलेली कारणमीमांसा, विविध प्रश्न व विकासाची प्रक्रिया या विषयीचे ज्ञान होणे आवश्यक आहे.

आर्थिक विकासाचे सिद्धांत अभ्यासताना सर्वसाधारणपणे अभिमतपंथी, नवअभिमतपंथी आणि केन्सनंतरची विचारधारा अशा प्रामुख्याने तीन विचारधारा सांगता येतील. या विचारधारांमधून ज्या विविध अर्थतज्ज्ञांनी आपले सिद्धांत मांडले आहेत त्यापैकी काही अर्थतज्ज्ञांच्या सिद्धांताचा आपल्याला या ठिकाणी विचार करावयाचा आहे.

**विकासाचे अभिमतपंथी (सनातनवादी) विवेचन** (Classical Interpretation of Development) :

अभिमतपंथी विवेचनाची सुरुवात अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांच्यापासून करणे उचित ठरेल. या विचारधारेचा कालखंड साधारणपणे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते एकोणिसावे शतक असा येतो. अर्थशास्त्रातील विविध विचारधारेमध्ये ही विचारधारा अतिशय समृद्ध व प्रभावशाली राहिली. अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञामध्ये ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, जॉन स्टुअर्ट मिल, थॉमस रॉबर्ट माल्थस इत्यादींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. यापैकी ॲडम स्मिथ, रिकार्डो आणि माल्थस यांच्या विचारांचाच या प्रकरणामध्ये आपल्याला मागोवा घ्यावयाचा आहे. याशिवाय याच काळात कार्ल मार्क्स यांनीसुद्धा आपले विचार मांडले आहेत. परंतु त्यांचे विचार आणि अभिमतपंथी विचारधारेमध्ये भिन्नता असल्यामुळे मार्क्स यांचे विवेचन स्वतंत्रपणे अभ्यासणे योग्य ठरेल.

**ॲडम स्मिथ** (Adam Smith) :

ॲडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या `An Inquiry in to the Nature and causes of the Welth of Nations' या ग्रंथामध्ये आर्थिक विकासाविषयी विचार मांडले आहेत. त्यांचे हे विचार विखुरलेले आहेत. ॲडम स्मिथ यांनी जरी आर्थिक विकासाचा स्वतंत्र सिद्धांत मांडलेला नसला तरीही त्यांनी विकासाविषयी जे विवेचन केले आहे ते त्यांच्या समकालीन व नंतरच्या अर्थशास्त्रज्ञांना आधारभूत ठरले आहे. संपूर्ण युरोपखंडामध्ये पुढे बराच काळ त्यांच्या विचारांचा प्रभाव होता. स्मिथ यांनी विकासविषयक मांडलेल्या विचारांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

**निर्हस्तक्षेपाचे धोरण** (Laissez Fair Ploicy) :

स्मिथ यांनी निर्हस्तक्षेपाचे तत्त्व प्रभावीपणे मांडले. स्मिथवर यासंदर्भात अठराव्या शतकातील 'नैसर्गिक नियमाच्या तत्त्वाचा' (Doctrine of Natural Law) प्रभाव पडला आहे. हे तत्त्व थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. There is a set of rules of right or justice, and perhaps evn of morality in general, which are, or maybe, known by all men by the help eighter of `veason' or f a moral sense, and which posses an authority superior to that of such commands of human sovereigns and such customry legal and moral regulations as may contraven them." Ref. - Economics and Liberalism, by - O.H. Taylor

स्मिथच्या मते, शासन किंवा व्यक्तिगत हस्तक्षेपामुळे मुक्त नैसर्गिक स्पर्धेमध्ये व्यत्यय येतो. त्यामुळे स्मिथ यांना आर्थिक व्यवहारात शासनाचा हस्तक्षेप मान्य नव्हता. त्यांच्या मते अत्यंत महत्त्वाची क्षेत्रे वगळता इतर क्षेत्रात व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे. उदाहरणार्थ कायदा व सुव्यवस्था, संरक्षण, रस्तेबांधणी ही कार्ये व त्याचबरोबर आयातकर आकारणे इत्यादी अधिकार शासनाकडे असावेत. परंतु आर्थिक विकासासाठी शासनाने आर्थिक क्षेत्रात पदार्पण करणे अनुचित होय. निर्हस्तक्षेपामुळे व्यक्तीला स्वतःचे हित अधिक योग्य रीतीने साधता येते. सर्वच व्यक्तींचे हित सर्वाधिक साधले गेले की समाजाचेही अधिक हित साधले जाईल. म्हणजेच व्यक्तिगत हित व सामाजिक हित हे परस्परपूरक होत. त्यामुळे समाजातील काही व्यक्तींना विशेष आर्थिक लाभ देणे किंवा काहींच्या कृतीस निर्बंध घालणे हे नैसर्गिक वातावरणात साधल्या जाणाऱ्या विकासास बाधक ठरते. बचतवृद्धीतून भांडवलसंचय, व्यापारवृद्धी व बाजारपेठांचा विस्तार होण्यासाठी अर्थव्यवस्था मुक्त असणे आवश्यक आहे. जरी मुक्त अर्थव्यवस्थेत काही अडथळे निर्माण झाले तरी अदृश्य शक्तीद्वारे सर्व काही ठीक होईल. म्हणजेच अर्थव्यवस्थेत

पूर्णस्पर्धेची स्थिती सर्वत्र असेल तेव्हा 'अदृश्य शक्ती'द्वारे अपेक्षित परिणाम घडून येतील.

मात्र 'निर्हस्तक्षेपाचे तत्त्व' त्रिकालाबाधित सत्य आहे असे स्मिथचे मत नव्हते. त्यांच्या मते ज्यावेळी व्यक्तिगत स्वार्थापोटी मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न व्यक्तीकडून होईल तेव्हा मक्तेदारी दूर करण्यासाठी मक्तेदारीविरुद्ध कायदे करणे, शिवाय व्याजदराचे नियंत्रण, बँकनिर्मित चलन, सक्तीचे प्राथमिक शिक्षण इत्यादी संदर्भात शासनाच्या हस्तक्षेपाचे त्यांनी समर्थन केले आहे. अशा प्रकारची नियंत्रणे, व्यक्तीच्या नैसर्गिक स्वातंत्र्यापासून जर संपूर्ण समाजाच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होत असेल तर आवश्यक आहेत असे स्मिथ यांनी सुचविले आहे.

**भांडवल संचय** (Capital Accumulation) :

स्मिथने आर्थिक विकासासाठी भूमी, श्रम, भांडवल, संघटन व तंत्रज्ञान या सर्वच घटकांचे महत्त्व मान्य करूनसुद्धा बचत व भांडवल संचय यावर विशेष भर दिला आहे.

त्यांच्या मते ज्या अर्थव्यवस्थेत भांडवल विपुल प्रमाणात उपलब्ध असते तेथे नैसर्गिक घटक, श्रम इत्यादींचा योग्य वापर होऊन उत्पादन वेगाने वाढते व आर्थिक विकास जलद गतीने होतो. थोडक्यात, भांडवल संचय ही त्याने आर्थिक विकासाची मूलभूत गरज मानली आहे. मग हा भांडवलसंचय होणार कसा? त्यासाठी लोकांनी मोठ्या प्रमाणावर खर्च टाळून बचत केली पाहिजे असे स्मिथ म्हणतो. या संदर्भात त्यांनी वैयक्तिक बचतीचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. व्यक्तीने केलेली बचत जेव्हा तो स्वत: उद्योगात गुंतवितो किंवा अन्य व्यक्तींना गुंतवणुकीसाठी देतो तेव्हा भांडवलात वाढ होते. भांडवल वृद्धीमुळे उत्पादन वाढते. उत्पादन वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढून दरडोई उतपन्न वाढते आणि दरडोई उत्पन्न वाढल्यामुळे परत बचतीचा दर वाढतो.

स्मिथच्या मते ही बचत समाजातील श्रमिक वर्ग करू शकत नाही. वेतनदराची प्रवृत्ती नेहमी निर्वाह पातळीला राहण्याची असते. (Iron Law of Wages) त्यामुळे बचतीचे कार्य भांडवलदार व भूमीपती हेच करू शकतात. बचतीच्या दरावर भांडवल संचयाचे प्रमाण अवलंबून असते आणि भांडवल संचयावर आर्थिक विकास अवलंबून असतो. त्यामुळे आर्थिक विकास होण्यासाठी भांडवल संचयाचा दर सतत वाढता असायला हवा.

**श्रमविभाजन** (Division of Labour):

स्वहिताच्या प्रेरणेतून आर्थिक विकास कशा प्रकारे होतो हे विशद करताना ॲडम स्मिथने श्रमविभाजनाच्या तत्त्वाचा आधार घेतला आहे. त्यांच्या मते

श्रमविभाजन व विशेषीकरणामुळे श्रमिकांच्या कुशलतेत वाढ, वेळेची बचत, आधुनिक यंत्र व साधनांचे संशोधन आणि अधिक दर्जेदार उत्पादन इत्यादी फायदे होतात. या सर्वांचा प्रत्यक्ष परिणाम उत्पादनात वाढ होऊन अधिक प्रमाणात वस्तू व सेवा उपलब्ध होतात. परंतु श्रमविभागणीमुळे श्रमिकांचा एकच वस्तू किंवा वस्तूच्या उत्पादनाचा एक भाग निर्माण करण्यात सहभाग असतो. त्यामुळे त्या एका वस्तुमुळे त्याच्या सर्व प्रकारच्या गरजा भागणार नाहीत. त्यामुळे प्रत्येक जण आपल्या वस्तूची दुसऱ्याकडील वस्तूंची देवाणघेवाण करील. जर देशात उत्पादनास पुरेशी मागणी नसेल तर ते परदेशातही निर्यात केले जाईल. यालाच स्मिथ यांनी 'मानवी स्वभावातील विनिमयाची नैसर्गिक प्रवृत्ती' (Natural propensity among men, to truck, barter and exchange one thing for another) असे संबोधले आहे. याच प्रवृत्तीतून श्रमविभाजन व विशेषीकरणास उत्तेजन मिळते आणि श्रमविभाजनाने उत्पादनात वाढ होऊन जो देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येईल त्यामुळे राष्ट्राच्या संपत्तीत भर पडते. परंतु त्याचबरोबर श्रमविभाजन हे बाजारपेठसुद्धा असणे आवश्यक आहे

थोडक्यात, श्रमविभाजनाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावयाचा असेल तर बाजारपेठेचा विस्तार करणे आवश्यक आहे. या संदर्भात स्मिथने अमेरिकेच्या शोधामुळे युरोप खंडाला कसा फायदा झाला याचा उल्लेख केला आहे. स्मिथ म्हणतात की, अमेरिकेच्या शोधामुळे युरोपातील वस्तूंना एक नवीन व शाश्वत बाजारपेठ मिळाली. त्यामुळे श्रमविभाजन व कुशलतेत प्रगती होऊन उत्पादनात वाढ झाली. तसेच वास्तविक उत्पन्न व शक्तीत वाढ होऊन उपादनात वाढ झाली. तसेच वास्तविक उत्पन्न व संपत्तीतसुद्धा वाढ झाली. जे पूर्वीच्या मर्यादित बाजारपेठेमध्ये शक्य झाले नसते.

अशा रीतीने ॲडम स्मिथच्या मते, एकदा आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू झाली की ती गतिशील बनते. सुरुवातीस पुरेसे भांडवल संग्रहण व बाजारपेठ असताना श्रमविभाजनाद्वारे उत्पादकतेत वाढ होते. यातूनच राष्ट्रीय उत्पन्न वाढते, रोजगार वेतनात वाढ होते आणि लोकसंख्या वाढते. उत्पन्नात वाढ झाल्यामुळे एका बाजूने बचत क्षमता वाढते तर दुसऱ्या बाजूने लोकसंख्या वाढल्यामुळे मागणी वाढते. त्यामुळे परत श्रमविभागणीचे लाभ मिळून उत्पादकतेत वाढ होते.

तसेच मोठ्या प्रमाणावर उत्पादनामुळे बहिर्गत बचतीचे फायदे मिळून उत्पादन खर्च कमी होतो. त्यामुळे नफ्याचे प्रमाण वाढते व परत गुंतवणुकीस उत्तेजन मिळते. अशा प्रकारे एकदा विकास सुरू झाल्यावर आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिशील बनते.

**स्थैतिकता (Stationary State) :**

आर्थिक विकासाची प्रक्रिया जरी स्वत: होऊन गती घेत असली तरी ती अमर्याद चालू राहू शकत नाही. कारण त्यालासुद्धा मर्यादा आहेत. स्मिथ यांनी या मर्यादा पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

पहिली मर्यादा म्हणजे मर्यादित साधने आणि आऱ्हासी उत्पत्तीचा नियम ही होय. दुसरी मर्यादा बचतक्षमतेत घट ही होय. वेतनातील वृद्धीमुळे लोकसंख्येत वाढ होऊन श्रम पुरवठ्यात वाढ होईल. श्रमंपुरवठ्यात वाढ झाल्यामुळे वेतनदर घटेल व तो निर्वाह पातळीपर्यंत खाली येईल.

यामुळे एका बाजूने वस्तूंच्या मागणीत घट होईल व दुसऱ्या बाजूने बचत क्षमतेत घट होईल. तिसरी मर्यादा म्हणजे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सुरुवातीच्या काळात नफा अधिक मिळत असला तरी पूर्ण स्पर्धा असल्यामुळे काही काळानंतर उत्पादकांना साधारण नफा मिळेल त्यामुळे नफ्यात घट होईल आणि भांडवल संचयावर प्रतिकूल परिणाम होईल.

अशा प्रकारे वेतनदार व नफा घटत असताना मात्र भूमीच्या मर्यादित पुरवठ्यामुळे भूमीपतींना खंड अधिक दराने मिळेल. परंतु यामुळे भांडवल संचयात वाढ होणे शक्य नसल्यामुळे अर्थव्यवस्थेला स्थैतिकता प्राप्त होते.

ॲडम स्मिथ यांनी आर्थिक विकासाविषयी जे विवेचन केले आहे त्यामध्ये अनेक उणिवा आहेत. उदाहरणार्थ विकासविषयक विवेचन करताना त्यांनी व्यक्तिगत हित आणि सामाजिक हित हे दोन्ही नेहमीच परस्परपूरक आहेत व त्यामुळे व्यक्तिगत हित साधले गेले म्हणजे सामाजिक हित साध्य होते. तसेच आर्थिक विकासामध्ये जर काही अडथळे निर्माण झाले तर 'अदृश्य शक्ती'द्वारे ते दूर करता येतात. त्याचप्रमाणे समाजातील भांडवलदर वर्गच केवळ बचत करू शकतो इत्यादी गोष्टी ज्या गृहीत धरल्या यावर टीका केली जाते.

ॲडम स्मिथ यांच्या विवेचनात वरील दोष असले तरी विकासाच्या विवेचनामध्ये त्यांचे विचार आधारभूत मानले जातात. त्यांच्या विचारांचा नंतरच्या विचारावर बराच प्रभाव पडल्याचे दिसून येते. विशेषत: निर्हस्तक्षेपाचे तत्त्व, भांडवल संचयाचे विकासातील महत्त्व, मुक्त व्यापाराची कल्पना या संकल्पना अभिमतपंथी विचारधारेमध्ये पुढेही बऱ्याच काळ मान्यता पावल्याचे दिसून येते.

**डेव्हिड रिकार्डो (David Ricardo) :**

डेव्हिड रिकार्डो यांनी १८१७ मध्ये 'दी प्रिंसिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ॲण्ड टॅक्सेशन' हा ग्रंथ लिहिला. याशिवाय रिकार्डोंनी इतर अर्थतज्ज्ञांशी वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहारातून अर्थशास्त्रीय विचारांची जी देवाणघेवाण केली

हे सर्व लेखन व पत्रव्यवहार 'दी वर्क्स अॅण्ड करस्पॉन्डन्स ऑफ रिकार्डो' या नावाने स्राफा यांनी संपादित केले आहे. यातून आर्थिक विकासाच्या संदर्भात केलेल्या विवेचनाचा मागोवा घ्यावा लागतो. तसे पाहता रिकार्डोंना आर्थिक विकासाच्या विवेचनापेक्षा मूल्यविषयक आणि वितरणविषयक सिद्धांतामध्ये अधिक रस होता हे शुम्पीटर यांनी केलेल्या पुढील विधानावरून सहज लक्षात येईल. शुम्पीटर म्हणतात -

``Ricardo `all but identifies economics with the theory of distribution, implying that he had little or nothing to say about to use his language - `the laws which regulate total output."

(A Joseph Schumpeter, History of Economic analysis)

रिकार्डोने जरी आर्थिक विकासाविषयी स्वतंत्र सिद्धांत मांडलेला नसला तरी त्यांनी यासंदर्भात जे चिंतन केले आहे ते मौलिक स्वरूपाचे आहे. विकासविषयक विवेचनामध्ये स्मिथप्रमाणेच रिकार्डोंनीसुद्धा पूर्ण स्पर्धा, नफा व भांडवल संचय यातील संबंध, नैसर्गिक वेतनदर, आऱ्हासी उत्पत्तीची अपरिहार्यता इत्यादी गृहीत तत्त्वे आधार म्हणून मानली आहेत.

**समाजाची तीन वर्गात विभागणी :**

भांडवलदार, श्रमिक आणि जमीनदार असे रिकार्डोने समाजाचे तीन वर्गात वर्गीकरण करून आर्थिक विकासामध्ये या तीन घटकांचे स्थान काय याचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

रिकार्डोच्या मते भांडवलदार आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत दोन प्रकारची महत्त्वाची कार्ये पार पाडत असतात. एक म्हणजे उत्पादनकार्यात उत्पादनाचे विविध घटक कार्यान्वित करून त्यांची कार्यक्षमता पुरेपूर उपयोगात आणण्याचे कार्य करतात. यातून अर्थव्यवस्थेत साधनांचे योग्य वितरण होते. तसेच महत्तम नफा मिळेल अशा विविध क्षेत्रांचा शोध घेऊन त्या त्या क्षेत्रात भांडवल गुंतवणूक करतात. हे करत असताना उत्पादनाच्या विविध क्षेत्रात मिळणाऱ्या नफ्याच्या दरात समानता प्रस्थापित होण्यास मदत होते.

दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे भांडवलदार वर्ग जोखीम पत्करून भांडवल गुंतवणूक करतात. अश रीतीने अर्थव्यवस्थेतील भांडवल संचयात वाढ होऊन आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस गती मिळते.

समाजातील तीन वर्गामध्ये श्रमिक वर्ग मोठ्या संख्येने असलेला वर्ग होय. या वर्गाजवळ श्रमाशिवाय अन्य उत्पादनाची साधने नसल्यामुळे हा वर्ग रोजगारासाठी भांडवलदार वर्गावर विसंबून असतो. श्रमिकांचे उत्पन्नाचे साधन म्हणजे त्यांना मिळणारे वेतन होय. वेतनदर हा वेतननिधी आणि श्रमिकांची संख्या यावर

1879
USE With Care

अवलंबून असतो.

रिकार्डोनी वेतनदराचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक 'बाजारातील वेतनदर' (Market Wage Rate) आणि दुसरा 'नैसर्गिक वेतनदर' (Natural Wage Rate). रिकार्डोच्या मते वेतनदर तत्कालीन रूढी, परंपरेनुसार ठरतो व तो सर्वसाधारणपणे परिस्थितीमध्ये 'नैसर्गिक वेतनदराइतका' असतो. जेव्हा बाजारातील वेतनदर (MWR) हा 'नैसर्गिक वेतनदरापेक्षा' (NWR) अधिक असतो तेव्हा लोकसंख्येत वाढ होऊन श्रमपुरवठ्यात वाढ होते. याउलट जेव्हा बाजारातील वेतनदर' नैसर्गिक वेतनदरा'पेक्षा कमी असतो तेव्हा लोकसंख्या कमी होण्याची प्रवृत्ती असते व परिणाम श्रमपुरवठा कमी होतो.

रिकार्डोच्या मते खंड म्हणजे 'भूमीच्या उपजत व अविनाशी गुणांबद्दल भूमीच्या उत्पादनापैकी जो अंश जमीनदार वर्गाला मिळतो तो खंड होय.' त्यांच्या मते सुरुवातीस एकूण जमिनीपैकी अधिक सुपीक जमीन लागवडीखाली आणली जाते व उत्पादन केले जाते. परंतु जसजशी लोकसंख्या वाढते तसतशी अन्नधान्याची वाढती गरज भागविण्यासाठी कमी सुपीक जमीनसुद्धा लागवडीखाली आणली आहे. अशा वेळी जमिनीच्या सुपिकतेतील भिन्नता आणि घटत्या सीमांत उत्पादनाची प्रवृत्ती यामुळे कमी सुपीक जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पादनाचा सरासरी उत्पादनखर्च वाढतो. त्यामुळे अन्नधान्याच्या किमतीत वाढ होते. परंतु तुलनेने अधिक सुपीक असलेल्या सीमांतपूर्व जमिनीतील उत्पादनाचा सरासरी उत्पादनखर्च कमी असूनसुद्धा त्या उत्पादनाला ही वाढलेली किंमत मिळेल.

रिकार्डोच्या मते नवीन तंत्राचा अवलंब करून काही काळ उत्पादन खर्चात कपात करता येईल व अन्नधान्याच्या किमतीत होणारी वाढ रोखताही येईल. परंतु दीर्घकाळात आऱ्हासी उत्पत्तीच्या प्रवृत्तीमुळे उत्पादनखर्च वाढेल. त्यामुळे अन्नधान्याच्या किमतीत वाढ होणे अटळ असते. यासंदर्भात रिकार्डो म्हणतात -

``Although, then, it is probable that, under the most favourable circumstance, the power of production is still greater than that of population, it will not long continue so : for the land being limited in quantity, and differing in quality, with every increased portion of capital employed on it there will be a decreased rate of production, whilst the power of population continues always the same," (David recardo, `The Principles of Political Economy and Taxation.")

**आर्थिक विकासाची प्रक्रिया** (Process of Economic - Development):

रिकार्डोनीसुद्धा ॲडम स्मिथप्रमाणे भांडवल संचयाला विकासप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यांच्या मते उत्पादकाला एकूण उत्पन्नापैकी काही भाग श्रमिक

वर्गाच्या वेतनासाठी आणि यंत्र अवजारे इत्यादी भांडवली वस्तू चालू स्थितीत ठेवण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी ठेवावा लागतो. एकूण उत्पन्नातून श्रमिकांचे वेतन आणि भांडवलावरील चालू खर्च वजा केला असता जे उत्पन्न शिल्लक राहते ते निव्वळ उत्पन्न होय. या निव्वळ उत्पन्नातूनच भांडवलदारवर्ग भांडवल संचय करतो. या भांडवलसंचयाची गुंतवणूक झाली असता विकासाची प्रक्रिया सुरू होते. रिकार्डोंच्या मते कोणत्याही अर्थव्यवस्थेत भांडवल संचयाचा दर हा बचतक्षमता आणि बचतीच्या इच्छाशक्तीवर अवलंबून असतो. अर्थव्यवस्थेतील 'निव्वळ उत्पन्न' हे बचतक्षमता निर्धारित करील तर बचती इच्छाशक्ती ही नफ्याच्या दरावर अवलंबून असते.

नफा आणि वेतनदरातील संबंध हा व्यस्त असतो असे रिकार्डोंचे मत आहे. वेतनदर कमी असेल तर भांडवलदारांचा नफा वाढेल. याउलट वेतन वाढल्यास नफा कमी होईल. तसेच वेतनदर अन्नधान्याच्या किमतीवर अवलंबून असतो आणि धान्याची किंमत ही जर्मनीच्या सीमांत उत्पादकतेनुसार ठरते. उत्पादनफल घटते मिळत असेल तर सरासरी उत्पादनखर्च वाढेल व धान्याच्या किमतीत वाढ होईल. त्यामुळे वेतनदरात वाढ होऊन नफ्याच्या प्रमाणात घट होईल. याउलट उत्पादनफल वाढते मिळत असेल तर उत्पादनखर्चात घट होऊन धान्याच्या किमती कमी होतील. त्यामुळे वेतनदर कमी होऊन नफ्याच्या प्रमाणात वाढ होईल.

रिकार्डोंच्या मते विकासाच्या सुरुवातीच्या काळात शेतीमध्ये वाढत्या उत्पादनफलाच्या नियमाचा प्रत्यय येईल. त्यामुळे भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होऊन बचत क्षमतेत वृद्धी होईल आणि भांडवलसंचय वाढेल. शिवाय वाढत्या नफ्याच्या प्रेरणेतून भांडवलदारवर्गाकडून अधिक गुंतवणूक केली जाईल व अधिक उत्पन्न केले जाईल. अधिक उत्पादन करण्यासाठी श्रमिकांची मागणी वाढेल. त्यामुळे बाजारातील वेतनदरापेक्षा अधिक असेल. या पूर्वी दिल्याप्रमाणे ज्यावेळेस नैसर्गिक वेतनदरापेक्षा बाजारातील वेतनदर अधिक असतो तेव्हा लोकसंख्येत वाढ होते. त्यामुळे अन्नधान्याची मागणी वाढून किमतीत वाढ होते. अन्नधान्याच्या किमती वाढल्यामुळे श्रमिकवर्ग अधिक वेतनाची मागणी करेल त्यामुळे परत वेतनदरात वाढ होईल. श्रमिकांचे वेतन वाढल्यामुळे भांडवलदार वर्गाच्या नफ्यात घट होईल व भांडवलसंचयावर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल.

थोडक्यात, जोपर्यंत नफा मिळतो तोपर्यंत भांडवलसंचयात वाढ होऊन आर्थिक विकासाची प्रक्रिया चालू राहील आणि जेव्हा नफ्याचे प्रमाण घटते तेव्हा भांडवलसंचय वाढवणे शक्य नसल्यामुळे अर्थव्यवस्थेत स्थित अवस्था येईल.

आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास (International Trade and Economic Development)

रिकार्डोने मुक्त व्यापाराचे समर्थन केले आहे. त्याच्या मते मुक्त व्यापारामुळे उत्पादन साधनाचा महत्तम उपयोग होऊन संपत्तीत वाढ होते. शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भांडवलदारांचा नफा कमी होण्याची प्रवृत्ती टाळता येते. आंतरराष्ट्रीय व्यापार खुला असेल तर उद्योगप्रधान राष्ट्र अन्नधान्याची इतर देशांतून आयात करून अन्नधान्याच्या किमतीची पातळी खाली आणू शकतात व त्याद्वारे वेतनदराची पातळी कमी ठेवू शकतात. वेतनदर कमी राहिल्यामुळे भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होईल आणि भांडवलसंचय वाढून विकासास चालना मिळेल. त्यामुळे रिकार्डोच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापाराचे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार कशा प्रकारे फायदेशीर ठरतो हे दाखवून देण्यासाठी रिकार्डोने तुलनात्मक परिव्यय सिद्धांत स्वतंत्रपणे मांडला आहे.

**मूल्यमापन**

रिकार्डोने आर्थिक विकासाच्या संदर्भात केलेल्या विवेचनामध्ये अर्थशास्त्रामध्ये मौलिक भर घातली आहे. त्यांच्या आर्थिक विकासविषयक विवेचनातील जमेची बाजू पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१.** रिकार्डोने सुरुवातीस शेतीमधील तंत्रात सुधारणा केल्यामुळे वाढते उत्पादन मिळून धान्याच्या किमतीत घट होऊन वेतनाची पातळी कमी होते आणि भांडवलसंचय वाढून आर्थिक विकासास चालना मिळते हे जे विवेचन केले आहे त्यावरून त्यांनी आर्थिक विकासाला चालना मिळण्यासाठी सर्वप्रथम शेती क्षेत्राचा विकास होणे अगत्याचे आहे असे प्रतिपादन केले आहे. आजच्या संदर्भात हा विचार विकसनशील देशामध्ये उड्डाण अवस्था (Take-off Stage) गाठण्यासाठी शेती विकासास प्राधान्य दिले पाहिजे या दृष्टीने मार्गदर्शक ठरू शकतो.

**२.** रिकार्डोने आर्थिक विकासात नफा आणि भांडवलसंचयास महत्त्व दिले आहे. आजही आधुनिक अर्थतज्ज्ञ या घटकांचे महत्त्व मान्य करतात यावरून त्यांचे विचार योग्यच होते असे दिसून येते.

**३.** रिकार्डोने खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अनेक देशांचा आर्थिक विकास अधिक वेगाने होऊ शकतो असे प्रतिपादन केले आहे सद्य:स्थितीत अनेक विकसित राष्ट्रांनी या मार्गाने आपला आर्थिक विकास झपाट्याने करून घेतला ही वस्तुस्थिती पाहता त्यांचे हे विचारसुद्धा महत्त्वाचे वाटतात.

**४.** लोकसंख्या वाढीमुळे आर्थिक विकास कुंठित होतो. त्यामुळे वाढती लोकसंख्या हा एक आर्थिक विकासातील अडथळा होय. हा विचार रिकार्डोनेसुद्धा

केला आहे. आज अनेक राष्ट्रांमध्ये वाढती लोकसंख्या त्यांच्या विकासात अडसर बनल्याचे दिसून येते. यावरून त्यावेळेस या प्रश्नाविषयी रिकार्डोने केलेला विचार बरोबर होता हेचे सिद्ध होते.

**टीका :**

१. रिकार्डोने समाजाचे जमीनदार, भांडवलदार आणि श्रमिक असे तीन वर्ग निश्चित करून यापैकी भांडवलदारवर्गच केवळ बचत करू शकतो असे प्रतिपान केले आहे. प्रत्यक्षात मात्र जमीनदारवर्ग आणि अल्पप्रमाणात का असेना श्रमिकवर्गसुद्धा बचत करतात आणि भांडवलसंचयास मदत करतात ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा अल्प प्रमाणात का असेना श्रमिकवर्गसुद्धा बचत करतात आणि भांडवलसंचयास मदत करतात ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा या वर्गाच्या बचत क्षमतेत रिकार्डोने विचार केला नाही अशी टीका केली जाते.

२. आऱ्हासी उत्पत्तीच्या प्रत्ययातून अर्थव्यवस्थेत काही काळानंतर स्थित अवस्था येते असे रिकार्डोचे म्हणणे आहे. यावर आक्षेप घेताना काही विचारवंत विकसित देशांचे उदाहरण देऊन असे मत व्यक्त करतात की, शास्त्रीय शोध आणि तंत्रज्ञानातील सुधारणा यांच्या साहाय्याने या देशातील शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. तसेच भूमीच्या मर्यादेमुळे देशातील आर्थिक विकास थांबला आहे असे अनुभवास आलेले नाही.

रिकार्डोच्या विवेचनात वरीलप्रमाणे काही उणिवा असल्या तरी त्यांनी आर्थिक विकासाच्या संदर्भात मांडलेले विचार कमी महत्त्वाचे आहेत असे मात्र नाही. याउलट ॲडम स्मिथ यांनी मांडलेल्या विचारांची विस्ताराने मांडणी करून त्यांना अधिक स्पष्टता देण्याचे श्रेय रिकार्डोंना दिले जाते.

अभिमतपंथी विवेचनामध्ये रिकार्डोच्या विवेचनास फार महत्त्वाचे स्थान आहे. टेलर यांनी तर रिकार्डो हेच खरे अर्थशास्त्राचे जनक होत असे मत व्यक्त केले आहे. रिकार्डोच्या विचारांचे महत्त्व विशद करताना जे. के. मेहतांनी पुढीलप्रमाणे विधान केले आहे.

``Recardo can be described as Smith refined and made more systematic -----, He is as refined, perhaps as one could have been in those days when Economics as a Science was in it's infancy."

**थॉमस रॉबर्ट माल्थस (Thomas Robert Malthus) :**

जगामध्ये पहिले अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी थॉमस रॉबर्ट माल्थस यांना मिळाली. स्मिथपेक्षा यांच्या विवेचनात अनेक बाबतीत भिन्नता आढळून येते. विशेषत: स्मिथसारखा माल्थस यांचा दृष्टिकोन आशावादी

नाही. त्यांना जाणवलेली तीव्र निराशा, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेले अन्नाचे दुर्भिक्ष्य, धान्याच्या वाढत्या किमती, आयर्लंडमधील दुष्काळाची स्थिती, बेकारी, दारिद्र्य, रोगराई इत्यादी परिस्थितीचा परिणाम असू शकतो.

`The ideas of Malthus were the product of the circumstances of the time in which malthus writing असे मत प्रा. घोष यांनी आपल्या `Concise History of Economic Thought' या ग्रंथात व्यक्त केले आहे.

माल्थस यांनी १८२० मध्ये `Principles of Political Economy, Considered with a View to their Practical Application' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथाच्या पहिल्या खंडात मूल्य आणि वितरणाची चर्चा आहे तर दुसऱ्या खंडामध्ये प्रामुख्याने (`The progress of Wealth') आर्थिक विकासाविषयीचे विवेचन आहे. माल्थस यांनी मांडलेला 'लोकसंख्येचा सिद्धांत' यामुळे जरी ते आपल्याला अधिक परिचित असले तरी त्यांनी अर्थशास्त्रातील इतर अनेक प्रश्नांवर चिंतन केले आहे हे त्यांनी लिहिलेल्या अनेक निबंधावरून व इतर ग्रंथावरून सहज लक्षात येईल. विशेष म्हणजे त्यांच्या समकालीन विचारवंतांच्या तुलनेत माल्थस यांनी आर्थिक विकासाच्या प्रश्नामध्ये अधिक रस घेतलेला आढळून येतो.

माल्थस यांच्या मते कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा विचार करावयाचा म्हणजे त्या देशातील संपत्तीच्या निर्मितीची किंवा उत्पादनाची क्षमता Potential of producing riches) आणि प्रत्यक्षात असलेली संपत्ती किंवा उत्पादन (actual riches) या दोहोत अंतर असण्याची कारणे व ते अंतर कमी कसे करता येईल यासंबंधीचे विवेचन करणे होय. याचा अर्थ माल्थस यांच्या मते आर्थिक विकासाचा संबंध संपत्तीच्या वाढीशी येतो. संपत्तीच्या निर्मितीबरोबरच तिच्या वितरणालासुद्धा माल्थसने तितकेच महत्त्व दिले आहे.

आर्थिक विकास आणि लोकसंख्या यांच्यातील संबंधाविषयी विवेचन करताना माल्थस म्हणतात की, लोकसंख्या वाढीबरोबर आर्थिक विकास होत जाईल असे मानणे चुकीचे आहे. आर्थिक विकास हा लोकसंख्या वाढीचा परिणाम नसून लोकसंख्या वाढ ही आर्थिक विकासाचा परिणाम असू शकते. अर्थात, लोकसंख्यावाढ हा विकासाचा निर्देशक म्हणता येणार नाही. याउलट लोकसंख्या वाढ आर्थिक विकासात अडसर ठरू शकते.

एखाद्या देशातील लोकसंख्येत वाढ झाली असता त्या देशातील उत्पादनात व उत्पन्नात वाढ होईलच असे नाही. यासाठी माल्थस यांनी युरोप खंडातील स्पेन, पोर्तुगाल व हंगेरी तसेच आफ्रिका खंडातील बहुतेक सर्वच देशांचा संदर्भ देऊन आपले म्हणणे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकसंख्यावाढ ही नेहमीच विकासातील अडसर असते असे मात्र माल्थस यांचे मत नव्हते. त्यांच्या मते आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत लोकसंख्या वाढीचे महत्त्व निश्चित आहे, परंतु जर लोकसंख्या वाढीबरोबर प्रभावी मागणी वाढली तरच ते विकासास पोषक ठरेल. प्रभावी मागणी ही श्रमिकांच्या क्रयशक्तीवर अवलंबून असते. श्रमिकांची क्रयशक्ती वाढायची असेल तर उपादक वर्गाकडून श्रमिकांची मागणी वाढली पाहिजे आणि श्रमिकांची मागणी भांडवलसंचयाच्या दरावर अवलंबून असते. या बाबतीत माल्थस यांच्या विचारामध्ये आणि स्मिथ व रिकार्डो यांच्या विचारमध्ये साम्य आढळून येते. मात्र स्मथ व रिकार्डोच्या बचत ही गुंतवणुकीत परिवर्तीत होते. त्यामुळे बचतीचा दर व गुंतवणुकीचा दर समान असतो असे जे गृहीत धरले याच्याशी माल्थस सहमत नाहीत.

माल्थसच्या मते बचत ही दोन प्रकारची असते. एक म्हणजे स्वयंस्फूर्त किंवा स्वेच्छेची बचत (expost Saving or realised Savings) जी समाजाकडून स्वेच्छेने केलेली असते. या बचतीमुळे गुंतवणूक वाढते तसेच उपभोग खर्चही वाढतो. यामुळे ही बचत विकासास पोषक ठरते. बचतीचा दुसरा प्रकार म्हणजे नियोजित बचत किंवा सक्तीची बचत (exante savings or abstinence). अशा प्रकारच्या बचतीमुळे उपभोग खर्चात कपात होते त्यामुळे उपभोगात घट होऊन प्रभावी मागणी घटते. प्रभावी मागणीत घट झाल्यामुळे उत्पादकवर्गाच्या नफ्यात घट होते. याचा गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे सक्तीची बचत आर्थिक विकासास पोषक ठरत नाही. याद्वारे प्रभावी मागणीची कमतरता ही आर्थिक विकासातील अडसर होय असे माल्थस यांना म्हणावयाचे आहे असे दिसून येते.

जे. बी. से. यांनी मांडलेला 'पुरवठा आपली मागणी निर्माण करतो' हा बाजारपेठेचा नियम माल्थस यांना मान्य नव्हता. जे. बी. से. नी या नियमामध्ये वस्तूंच्या पुरवठ्याइतकी वस्तूला मागणी निर्माण होत असल्यामुळे अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची स्थिती कधीही नसते असे प्रतिपादन केलेले आहे. परंतु माल्थस यांनी अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची अवस्था निर्माण होणे कसे शक्य आहे हे त्यांच्या 'Theory of Glut of Overporduction' मध्ये नमूद केले आहे.

अतिरिक्त उत्पादनाची पहिली शक्यता श्रमिकवर्गाच्या 'उपभोग न्यूनतेतून' निर्माण होते असे माल्थस यांचे मत आहे. त्यांच्या मते श्रमिक आपल्याजवळील श्रमाचा पुरवठा करून उत्पादनकार्यात जसा सहभाग देतो तसा तो उपभोक्ताही असतो. प्रत्यक्षात तो उत्पादनासाठी जी कार्यक्षमता श्रमातून देतो त्या तुलनेत

त्याला त्याचा मोबदला (वेतन) कमी दिला जातो. त्यामुळे जरीही त्याने सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च केले तरी त्याने उत्पादनात ज्या प्रमाणात भर घातली त्या प्रमाणात वस्तूंची मागणी तो करू शकणार नाही. यातून उपभोग न्यूनतेची स्थिती निर्माण होऊन प्रभावी मागणी कमी होते. प्रभावी मागणी कमी झाल्यामुळे अतिरिक्त उत्पादनाची अवस्था निर्माण होते व वस्तूंच्या किमती घटतात. त्यामुळे भांडवलदारांचा संचय कमी होतो. शेवटी याचा परिणाम आर्थिक विकासाचा वेग कमी होण्यात होतो.

दुसरी शक्यता त्यांनी भांडवलदारवर्गाच्या अत्यंत काटकसरी वृत्तीमुळे उपभोगन्यूनता निर्माण होऊन अतिउत्पादनाची अवस्था निर्माण होते. भांडवलदार वर्ग बचतक्षमता वाढवून जास्तीत जास्त गुंतवणूक करण्याच्या प्रेरणेतून स्वत:च्या उपभोगावर निर्बंध घालतो. त्यामुळे भांडवलसंचय वाढून गुंतवणूक वाढते. परंतु एका विशिष्ट अवस्थेनंतर जेव्हा केलेल्या गुंतवणुकीतून नफा मिळण्याची शक्यता संपुष्टात येते तेव्हा भांडवलदारांनी गुंतवणुकीसाठी उपभोगावर निर्बंध घालून स्वयंप्रेरणेतून जी बचत केलेली असते ती गुंतवणुकीत परिवर्तीत होत नाही. याचा परिणाम प्रभावी मागणीत घट होण्यात होतो व अर्थव्यवथेत अतिरिक्त उत्पादनाची अवस्थेत येते. वस्तूंच्या किमती कमी होतात आणि भांडवलदार वर्गाच्या नफ्यात परत घट होईल. त्यामुळे भांडवलदारवर्ग उत्पादन कमी करण्याचा निर्णय घेईल. भांडवलदारवर्गाच्या या निर्णयामुळे श्रमिकांमध्ये बेकारी वाढेल आणि उपभोगन्यूनतेची अवस्था येऊन अर्थव्यवस्था मंदीच्या चक्रात सापडेल व आर्थिक संकट निर्माण होईल.

अशा प्रकारे माल्थसच्या मते अर्थव्यवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेतून अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती निर्माण होते. परंतु याबरोबरच त्यांनी प्रभावी मागणी वाढवून अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी उपायही सुचविल्याचे दिसून येते. हा उपाय म्हणजे बाजारपेठेचा विस्तार (अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय) हा होय. त्यांच्या मते देशातील उत्पादनास प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा विस्तार करून प्रभावी मागणी वाढविता येते. यासाठी श्रमविभाजन अधिक प्रमाणात केले पाहिजे आणि वाहतुक व दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली पाहिजे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे महत्त्व आणखी एका कारणासाठी त्यांनी विशद केले. त्यांच्या मते अविकसित देशांच्या संदर्भात श्रमिक व व्यवस्थापक (उत्पादक) वर्गाचा श्रमपुरवठ्याचा वक्र मागे वळणारा असतो. (Backward sloping or bending supply curves of effort, both for workers and managers). यासाठी त्यांनी आयर्लंड व मेक्सिकोचे

उदाहरण दिले आहे. हा वक्र मागे वळणारा असण्याचे कारण त्यांना अधिक श्रम करण्यास वेतनदर व नफ्याचा दर कमी असल्यामुळे पोषक वातावरण नसते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या उपलब्धतेमुळे प्रभावी मागणीत वाढ होईल. त्यामुळे किंमत पातळी वाढून वेतनदर आणि नफ्याच्या दरात वाढ होईल. त्यामुळे किमतपातळी वाढून वेतनदर आणि नफ्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे श्रमिक व उत्पादक वर्गास अधिक कार्यक्षमता उपयोगात आणण्यासाठी प्रेरणा मिळेल.

आर्थिक विकासाचे विवेचन करताना माल्थस यांनी उद्योग व कृषि क्षेत्राच्या संदर्भात पुढीलप्रमाणे विचार मांडले आहेत. उद्योगक्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढत असताना आधुनिक तंत्रज्ञानाच्या आविष्कारामुळे वाढते उत्पादनफल मिळते. उद्योगक्षेत्राचा विस्तार होऊन रोजगार संधीत वाढ होते. त्यामुळे कृषिक्षेत्रामध्य जमीनविषयक सुधारणांचे प्रयत्न केले पाहिजेत. संपत्ती व भूमीचे योग्य वितरण केले पाहिजे. त्यामुळे उत्पादनात वाढ होईल व प्रभावी मागणीसुद्धा वाढेल.

याशिवाय प्रभावी मागणीत वाढ करण्यासाठी अनुत्पादक उपभोक्त्याच्या खर्चात वाढ झाली पाहिजे असेही माल्थस यांनी सुचविले आहे. थोडक्यात, आर्थिक विकासास चालना मिळण्यासाठी समाजाच्या उपभोगपातळीत वाढ झाली पाहिजे व प्रभावी मागणीत वाढ झाली पाहिजे अस माल्थस यांनी प्रतिपादन केले आहे.

**मूल्यमापन :**

आर्थिक विकासाविषयीचे माल्थस यांचे विचार स्मिथ व रिकार्डो यांच्यापेक्षा भिन्न असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. त्यामुळेच माल्थस यांनी अभिमतपंथी विचारधारेतील विचारवंत असूनसुद्धा आपल्या अधिक वास्तववादी विवेचनातून आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांनी 'से' च्या बाजारपेठेच्या नियमाच्या विरोधी मत नोंदविले. प्रभावी मागणीची कल्पना व तिचा बचत आणि गुंतवणुकीशी संबंध स्पष्ट केला आणि म्हणूनच "आजच्या केन्सच्या किंवा कलेकीच्या अर्थशास्त्रीय विचारांची बीजे माल्थस यांच्या विचारात दिसून येतात" असे मत हिगिन्स यांनी व्यक्त केले आहे.

अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल आणि उद्योग व कृषि क्षेत्राचे परस्परावलंबित्व स्पष्ट केले. शिवाय आर्थिक विकासाच्या दृष्टीने कृषिविषयक सुधारणांचे महत्त्वही माल्थस यांनी विशद केले. नंतरच्या काळात कोलीन क्लार्क यांनी यावर विशेष भर दिलेला आढळून येतो.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या उपलब्धतेतून प्रभावी मागणीत वाढ करता

येईल आणि आर्थिक विकासास चालना मिळेल हा माल्थस यांचा विचार, आज अनेक विकसित राष्ट्रांची भर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये आपले प्रभुत्व कायम ठेवण्यासाठी जी धडपड चालू आहे त्यावरून महत्त्वाचा वाटतो.

विकसनशील राष्ट्रांच्या बाबतीत, त्यांच्या उत्पन्नात वाढ होत असताना श्रमिक व उत्पादक वर्गामध्ये श्रम कमी करण्याची प्रवृत्ती आढळून येते. हे मागे वळणाऱ्या वक्राद्वारे माल्थस यांनी दाखवून दिले. या विवेचनाद्वारे आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा अडसर त्यांनी निदर्शनास आणून दिला.

अशा रीतीने माल्थस यांच्या विवेचनात अनेक अनेक आधुनिक कल्पनांचे मूळ सापडते. केन्स यांनी तर माल्थस यांचा उल्लेख 'केंब्रिज विचार पंथाचा प्रथम पुरुष' असा केला आहे. तरीही माल्थस यांच्या विवेचनामध्ये काही दोष आहेत. जसे प्रभावी मागणी वाढण्यासाठी अनुत्पादक उपभोक्त्यांच्या-उपभोगास त्यांनी प्रोत्साहन दिले आहे हे फारसे बरोबर म्हणता येणार नाही. तसेच त्यांच्या अतिरिक्त उत्पादनाच्या शक्यतेच्या कल्पनेत एकप्रकारे निराशावादाची जी छाया दिसते यावरसुद्धा अनेक अर्थतज्ज्ञांनी टीका केली आहे.

**अभिमतपंथी विवेचनाची वैशिष्ट्ये :**

ॲडमस्मिथ, रिकार्डो आणि माल्थस यांनी आर्थिक विकासाच्या संदर्भात जे विवेचन केले आहे, त्यावरून या विचारधारेतील विकासविषयक विवेचनाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनी विकासाच्या प्रक्रियेमध्ये 'निर्हस्तक्षेपाच्या' तत्त्वावर भर दिला आहे. तसेच आर्थिक विकास हा प्रामुख्याने भांडवल संचयाच्या दरावर अवलंबून असतो आणि भांडवलसंचय भांडवलदारवर्गाच्या बचत क्षमतेवर म्हणजेच पर्यायाने त्यांच्या नफ्याच्या प्रमाणावर अवलंबून असतो असे प्रतिपादन केले आहे. थोडक्यात आर्थिक विकासात भांडवलदारवर्गाची भूमिका अधिक महत्त्वाची मानली आहे.

२. अभिमतपंथीयांच्या मते अर्थव्यवस्थेत काही काळानंतर स्थित अवस्था येते. कारण भांडवल गुंतवणूक वाढल्यानंतर वेतनदरात वाढ होते. वेतनदरात वाढ झाल्यामुळे लोकसंख्येत वाढ होऊन अन्नधान्याच्या किमती वाढतात व त्याबरोबरच खंड वाढतो. भांडवलदारांच्या खर्चामध्ये या घटकांचा समावेश असल्यामुळे त्यांच्या नफ्यात घट होते. भांडवलदारांच्या नफ्यात घट झाल्यामुळे त्यांची बचतक्षमता कमी होऊन भांडवल गुंतवणूक घटते व अर्थव्यवस्थेत स्थित अवस्था येते. अशा रीतीने अर्थव्यवस्थेत काही काळानंतर स्थित अवस्था येणे अपरिहार्य आहे असे त्यांचे मत आहे.

घटकाबद्दलची अनास्था, भांडवलदारवर्गाला दिलेले 'अवाजवी महत्त्व' निराशावादी सूर हे विश्लेषण फारसे बरोबर वाटत नाही. त्यामुळेच की काय प्रामुख्याने रिकार्डो व मिल यांना "अर्थशास्त्राचे वाहन चुकीच्या मार्गाने नेल्याबद्दल" जेव्हन्स यांनी दोषी ठरविले आहे.

याचा अर्थ अभिमतपंथी विवेचन संपूर्णपणे कुचकामी आहे. अस्वीकारार्ह आहे असे मात्र नाही. या विवेचनामधून मांडलेल्या, निर्वाह वेतनदराची पातळी, उपभोगशून्याता, प्रभावी मागणी इत्यादी कल्पना, मार्क्स हॉब्सन, डगलस आदी अर्थशास्त्रज्ञांना त्यांच्या सिद्धांताची मांडणी करताना मार्गदर्शक ठरल्या आहेत. त्यामुळे अभिमतपंथी विवेचनाचे महत्त्व मान्य करावे लागते.

## कार्ल मार्क्स (KARL MARX) प्रकरण तिसरे

आर्थिक विचारवंतांमध्ये असे फार थोडे विचारवंत आहेत की, ज्यांचा मार्क्स इतका आर्थिक विचारावर प्रभाव पडला आहे. मार्क्सवाद एक फार मोठी व्यापक आणि विस्तृत विचारधारा आहे. ज्यामध्ये दार्शनिक, ऐतिहासिक, राजनैतिक आणि आर्थिक सिद्धांतांचा समावेश होतो. शुम्पीटरच्या शब्दात, मार्क्सवाद एका अर्थाने धर्म होय. ज्यांची मार्क्सवादावर श्रद्धा आहे त्यांच्या दृष्टीने ही एक अशी विचारधारा आहे की, ज्यामध्ये जीवनातील अंतिम ध्येयांचे प्रतिबिंब दिसते. ही विचारधारा एक असा मापदंड आहे की, ज्याद्वारे अनेक घटनांचा आणि कृतीचा अर्थ आणि अन्वय लावता येतो. मार्क्सने या विचारधारेमध्ये अशा काही दोषांकडे लक्ष वेधले आहे की, ज्या दोषांमुळे मानवी समाजाला किंवा मानवी समाजातील काही निवडक वर्गाला होणाऱ्या मोठ्या हानीपासून वाचविता येईल. म्हणूनच कर्मठ मार्क्सवादी यांची अशी धारणा आहे की, 'जे मार्क्सवादाला विरोध करतात ते केवळ चूक करतात असे नाही तर ते पाप करतात..... To An orthodox marxist, "an opponent is not Merely in error but in sin."(Joseph Schumpeter - Capitalism, Socialism and Democracy Second Ed.)

मार्क्स यांनी आपल्या विवेचनासाठी रिकार्डोप्रमाणेच निगमन पद्धतीचा उपयोग केला आहे. तसेच रिकार्डो यांच्या मूल्य सिद्धांत, खंड नफा आणि वेतन विषयक सिद्धांतांचा मार्क्सवर प्रभाव पडलेला दिसून येतो. काही विचारवंतांनी मार्क्स यांना अभिमतपंथी विचारधारेतील शेवटचा अर्थशास्त्रज्ञ असे संबोधिले आहे. चार्लस् जीडच्या मते, "Marxism is simply a branch grafted on the classical trunk."(A History of Economic Doctrines, - Gide and Rist, Page 469.)"

असे असले तरी मार्क्सच्या विचारामध्ये आणि अभिमतपंथीयांच्या विचारामध्ये

भिन्नता आढळून येते. स्वतः मार्क्स यांच्याच शब्दात, "साम्यवादी सिद्धांत हे आदर्शवादी किंवा स्वप्नाळू विचारांवर आधारित नसून ते प्रत्यक्ष घडत असलेल्या ऐतिहासिक आंदोलनाच्या अंतर्गत असलेल्या वर्गसंघर्षातून निर्माण झालेल्या वास्तविक संबंधांचे स्पष्टीकरण आहे." मार्क्स यांच्यावर हेगेल विचारांचा प्रभाव दिसून येतो. परंतु हेगेल यांचा 'द्वंद्ववाद' आदर्शावर आधारित आहे. मार्क्सने आपल्या 'द्वंद्ववादा'स भौतिकतेच्या तत्त्वाचाच आधार दिला आहे. या संदर्भात मार्क्स म्हणतात की, "हेगेल यांच्या विवेचनामध्ये 'द्वंद्ववाद' डोक्याच्या आधारावर उभा आहे. मी त्याला पायावर उभे केले आहे."

मार्क्स यांचे विवेचन व्यावहारिक आणि भौतिकवादी आहे. इतिहासाचा भौतिक अन्वय, द्वंदात्मक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत, वर्गसंघर्ष, भांडवलाचा विकास व अवनती, आर्थिक विकासाचा सिद्धांत आदी शीर्षकांतर्गत मार्क्सच्या सिद्धांताचे विवेचन आणि अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत या त्यांच्या कल्पनावरच आधारित आहे. त्यामुळे या दोन्ही कल्पनाविषयी थोडक्यात स्पष्टीकरण करणे क्रमप्राप्त ठरेल.

**I) इतिहासाचे भौतिकवादी प्रतिपादन** (Materialistic Interpretation of history):

मार्क्स यांनी समाजजीवनाच्या विकासाचे भौतिकवादी विवेचन केले आहे. त्यांच्या मते, "मानवाच्या जाणिवा किंवा चेतना (Consciousnes) त्यांचे सामाजिक अस्तित्व निर्धारित करीत नसून सामाजिक अस्तित्वानुसार त्यांच्या जाणिवा किंवा चेतना निर्धारित होतात."

(Marx rejects historical explanations which refer to metaphysics or psychological laws of human nature. The first type of exposition he denounces as meaningless Mysticism, the Second he dismises with the remark that, ``It is not consciousness of men that determines their existence, but on the contrary, their Social existence determines their consciousness." (Karl Marx,

A contribution to the Critique of Political Economy, tr. By, N.I.Stone)

मार्क्सच्या मते उत्पादन प्रणालीतील परिवर्तनामुळे उत्पादनसंबंधात परिवर्तन होते. उदाहरणार्थ औद्योगिक युगामध्ये उत्पादन साधनाचे स्वरूप बदलल्यामुळे उत्पादनसंबंधात (भांडवलदार आणि श्रमिक) परिवर्तन झाले आणि कृषि अर्थव्यवस्थेच्या ऐवजी भांडवलशाहीचा विकास झाला. उत्पादनसंबंधातूनच समाजातील आर्थिक संरचनेची निर्मिती होते. या संरचनेला मार्क्सने 'अधिसंरचना' (sub-structure) असे संबोधले आहे. या संरचनेचा नैतिक, धार्मिक, राजनैतिक, वैधानिक आदी सामाजिक संबंधांवर प्रभाव पडतो. नीती, धर्म, कला, राज्यसंस्था, विधिसंस्था

वाढ केली जाते. परंतु श्रमिकांना निर्वाह पातळीपेक्षा कमी वेतन दिल्यास दीर्घकाळात श्रमपुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम होईल. त्यामुळे हा एका मर्यादेपर्यंतच उपयोगात आणता येईल.

तिसरा मार्ग म्हणजे उत्पादन तंत्रात सुधारणा करून अतिरिक्त मूल्यात वाढ केली जाते. भांडवलदार नवीन यंत्रसामुग्रीचा आविष्कार अशा रीतीने करतात की ज्यामुळे श्रमिकांच्या कुशलतेत व कार्यक्षमतेत वाढ होईल. श्रमिकांच्या उत्पादकतेत वाढ झाल्यामुळे पूर्वीइतकेच श्रम कार्यान्वित करूनसुद्धा पूर्वीपेक्षा उत्पादन जास्त होते. परंतु श्रमिकास मात्र वेतन निर्वाह पातळीइतकेच दिले जाते. त्यामुळे भांडवलदारांना मिळणाऱ्या अतिरिक्त मूल्यात वाढ होते. वरील तीन मार्गांपैकी भांडवलदारवर्गाला अतिरिक्त मूल्य वाढीचा हा शेवटचा मार्ग अधिक योग्य वाटतो.

अशा रीतीने मार्क्स यांनी केलेले इतिहासाचे भौतिक विवेचन आणि अतिरिक्त मूल्याची कल्पना थोडक्यात मांडता येईल. मार्क्सने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे विवेचन करताना या दोन्ही कल्पना प्रामुख्याने आधार म्हणून घेतल्या आहेत.

**मार्क्सचा आर्थिक विकासाचा सिद्धांत** (Marxian Theory of Economic Development) :

मार्क्सने आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतामध्ये भांडवलशाहीच्या विकास, अवनती आणि लय कशा प्रकारे होतो (Laws of Motion or Development of Capitalism) याचे विश्लेषण केले आहे. भांडवलशाहीचा विकास होत असताना तिच्या आंगिक दोषामुळे भांडवलशाही संपुष्टात येऊन समाजवादाचा उदय आणि वर्गविहीन समाजाची निर्मिती कशा प्रकारे होते याचे विवेचन केले आहे. मार्क्सच्या मते भांडवलशाही ही आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक टप्पा आहे, अंतिम स्थिती नव्हे.

मार्क्स यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील विकासाच्या विविध अवस्था पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

विविध अवस्था पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

१) साधे पुनरुत्पादनाची स्थिती

२) भांडवल संचय

३) श्रमिकांचे शोषण

४) भांडवलाचे केंद्रीकरण

५) नफ्याच्या दरात घट

६) वर्गसंघर्ष आणि समाजवादाचा उदय.

**१) साधे पुनरुत्पादनाची स्थिती** (State of Simple Reproduction) :

मार्क्स यांच्या विकासविषयक विवेचनाची सुरुवात त्यांनी मांडलेल्या 'साधे पुनरुत्पादन आयोजना' (Simple Reproduction Scheme) या संकल्पनेमध्ये वर्णन केलेल्या स्थितीपासून करता येईल. या अवस्थेत भांडवलदारवर्ग निर्माण झालेल्या अतिरिक्त मूल्याचा विनियोग संपूर्ण उपभोगासाठी करतात. त्यामुळे भांडवलदर वर्गाकडून भांडवलसंचय होत नाही. मार्क्स यांनी याचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

त्यांच्या मते अर्थव्यवस्थेतील एकूण उद्योगांचे दोन विभागामध्ये वर्गीकरण करता येते.

अ) उत्पादन साधनांची निर्मिती करणारे उद्योग (Industries which produces Means of Production)

ब) उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग (Industries which Produces Consumption Goods)

दोन्ही विभागातील एकूण उत्पादन मूल्यामध्ये (W), स्थिर भांडवल (C), चल भांडवल (V) आणि अतिरिक्त मूल्य (S) या तीन घटकांचा समावेश असतो. हेच सूत्ररूपात पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$C + V + S = W$$

प्रत्येक विभागाच्या उत्पादन मूल्याचा व त्यातील घटकांचा स्वतंत्र विचार केल्यास, 'अ' विभागासाठी वरील घटकांना अनुक्रमे $C_1$, $V_1$, $S_1$ आणि $W_1$ तर 'ब' विभागासाठी $C_2$, $V_2$, $S_2$ आणि $W_2$.

असे संबोधिल्यास प्रत्येक विभागासाठी एकूण उत्पादन मूल्याचे विश्लेषण सूत्ररूपात पुढीलप्रमाणे असेल.

विभाग 'अ'साठी --- $C_1 + V_1 + S_1 = W_1$

विभाग 'ब' साठी --- $C_2 + V_2 + S_2 = W_2$

साध्या पुनरुत्पादनाच्या अवस्थेमध्ये दोन्ही विभागामध्ये गुंतविलेले स्थिर भांडवल हे 'अ' विभागातील एकूण उत्पादन मूल्याबरोबर असते.

$C_1 + C_2 = W_1$

म्हणजेच $C_1 + C_2 = C_1 + V_1 + S_1$

सूत्रातील दोन्ही बाजूकडील समान ($C_1$) मूल्य वगळता $C_2 = V_1 + S_1$

याचा अर्थ 'ब' विभागामध्ये गुंतविलेले स्थिर भांडवल 'अ' विभागातील भांडवलदार आणि श्रमिक यांच्या उपभोगाइतके असते. त्यामुळे प्रतिवर्षी उत्पादनाचे

प्रमाण स्थिर राहील. (Constant Scale of Production)

या अवस्थेची पुढीलप्रमाणे वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) भांडवलदार वर्ग सर्वच अतिरिक्त मूल्याचा उपभोगासाठी विनियोग करीत असल्याने अर्थव्यवस्थेत भांडवल संचय होत नाही.

२) उत्पादन क्षमता स्थिर असते.

३) श्रमिकांना वेतनदर निर्वाहपातळीइतका मिळतो.

**२. भांडवल संचय** (Capital Accumulation) :

मार्क्स यांनी 'साध्या पुनरुत्पान आयोजने' मधून विकासासाठी केवळ उपभोग आवश्यक नसून भांडवलसंचय होणे आवश्यक आहे हे निदर्शनास आणून दिले. भांडवलदार वर्ग अतिरिक्त मूल्यातून भांडवलसंचय करतील तेव्हाच विकासाची प्रक्रिया गतिमान होते. काही काळानंतर एक अशी अवस्था येते की, प्रत्येक भांडवलदाराला, भांडवलदारवर्गामध्ये आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी भांडवल संचय करणे आवश्यक बनते. भांडवलदारवर्गातील परस्परामधील स्पर्धा भांडवलदारांना जास्तीत जास्त भांडवल संचय करण्याकरिता प्रेरित करते. मार्क्स म्हणतो की, "कंजुष माणसाप्रमाणे भांडवलदारवर्गसुद्धा संपत्ती संचय करतो. परंतु कंजुष माणसाची ही कृती एक प्रवृत्ती आहे. तर भांडवलदारवर्गाची ही कृती अशा सामाजिक यंत्रणेचा परिणाम आहे की ज्या यंत्रणेचा तो अविभाज्य अंग बनलेला असतो."

औद्योगिक प्रगती जसजशी होत जाते तसतशी भांडवलाची गरज वाढत जाते आणि भांडवलदार अतिरिक्त मूल्याची किंवा होणाऱ्या नफ्याची पुनर्गुंतवणूक करीत जातात. मार्क्स म्हणतात की, अशा परिस्थितीत त्यांच्यासमोर एकच ध्येय असते ते म्हणजे - ``Accumulate, Accumulate ! That is Moses of the Prophets!"

संचय करा, संचय करा! हाच ईश्वरी आदेश आहे.'

**३. श्रमिकांचे शोषण** (Exploitation of labour) :

भांडवल संचय करीत असताना श्रमिकांचे शोषण कशा प्रकारे होते याचे कार्ल मार्क्स यांनी स्पष्टीकरण केले आहे.

हे समजून घेण्यासाठी त्यांच्या 'साध्या पुनरुत्पादन आयोजना' नंतर दिलेल्या 'वर्धित पुनरुत्पादन आयोजनेचा' (Expanded Reproduction Scheme) आधार घेता येईल.

या अवस्थेत भांडवली वस्तू उत्पादन करणाऱ्या 'अ' विभागातील उत्पादन मूल्ये हे 'अ' आणि 'ब' या दोन्ही विभागातील स्थिर भांडवलाच्या मागणीपेक्षाही

जास्त होते आणि म्हणून भांडवलसंचय वाढविणे शक्य होते. हे सूत्ररूपात मांडता येईल.

$$C_1 + V_1 + S_1 = C_1 + C_2$$

- दोन्ही बाजूकडील समान मूल्य वगळता

$$V_1 + S_1 = C_2$$

अशा रीतीने भांडवलसंचयात जेव्हा वाढ होते तेव्हा सुरुवातीस अधिक उत्पादन करण्यासाठी श्रमाची मागणी वाढते व त्यामुळे श्रमिकांची वेतन पातळी वाढते. ही भांडवल संचयाची स्थिती जोपर्यंत उत्पादनतंत्र पूर्वीचेच असते तोपर्यंत श्रमिकांना फायद्याची ठरते. परंतु वेतनदर वाढल्यामुळे भांडवलदारवर्गाच्या नफ्यात घट होणार असल्याने त्यांना हे हिताचे वाटत नाही. त्यामुळे श्रमिकांचा वेतन दर निर्वाह पातळीवर स्थिर राहण्यासाठी भांडवलदारवर्ग प्रयत्न करतात.

यासाठी भांडवलदारवर्गाकडून आधुनिक उत्पादन तंत्राचा आविष्कार केला जातो. या उत्पादन तंत्रामुळे श्रमिकांच्या उत्पादकतेत वाढ होते. त्यामुळे उत्पादनासाठी पूर्वीपेक्षा कमी श्रमिक लागतील. आधुनिक उत्पादनाच्या वापरामुळे श्रमाची बचत शक्य झाल्यामुळे रोजगारात असलेल्या श्रमिकांपैकी काही श्रमिक कमी केले जातात. शिवाय पूर्वीच्या उत्पादन तंत्रात भविष्यात आणखी श्रमाची मागणी वाढली असती तीसुद्धा वाढणार नाही. शिवाय त्यामुळे एकूण श्रमिकांच्या मागणीत घट होते. एका बाजूने श्रमिकांच्या मागणीत घट होत असताना दुसऱ्या बाजूने लोकसंख्या वाढत असल्यामुळे श्रमिकांच्या बेकारीत आणखी भर पडते. या श्रमिकांच्या बेकारीला मार्क्स यांनी (Reserve Army of Labour) 'श्रमिकांची राखीव सेना' असे म्हटले आहे. या बेकार श्रमिकांमध्ये रोजगार मिळविण्यासाठी परस्परांत स्पर्धा निर्माण होते. त्यामुळे त्यांच्या सौदाशक्तीत घट होते. या संधीचा भांडवलदारवर्ग लाभ घेतो आणि श्रमिकांना कमीत कमी वेतन दर देऊन त्यांचे शोषण करतो.

अशा रीतीने श्रमिकांचे जास्तीत जास्त शोषण करणे आणि अतिरिक्त मूल्यात वाढ करून स्वत:कडे संचय करणे हे भांडवलदारांचे ध्येयच बनते.

**४. भांडवलाचे केंद्रीकरण** (Concentration of Capital) :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलसंचय वाढत असताना स्थिर भांडवलाचा चल भांडवलाशी अनुपात (C/V) वाढत जातो. यालाच मार्क्सने Increasing Organic Composition of Capital) 'भांडवलाची वाढती आंगिक रचना' असे म्हटले आहे.

भांडवलदारवर्गाकडून भांडवलप्रधान तंत्र वापरल्यामुळे श्रमिकांची उत्पादकता

वाढते आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. भांडवलदारवर्गात परस्परांत तीव्र स्पर्धा सुरू होते. या स्पर्धेमध्ये लहान लहान उत्पादकांची स्पर्धाशक्ती कमी असल्यामुळे ते एकतर बाजारपेठेतून बाहेर फेकले जातात किंवा मोठ्या उत्पादकांशी तडजोड करून त्यांच्या उद्योगात विलीन होतात. मार्क्स यांच्या शब्दात - ''मोठे मासे लहान माशांना गिळंकृत करतात.''

अशा प्रकार भांडवलशाही अर्थव्यवस्थेत छोट्या भांडवलदारांचे अस्तित्व नष्ट होऊन काही मोठ्या भांडवलदारांकडे भांडवलाचे केंद्रीकरण होते. यातूनच मोठ्या उद्योगगृहांची निर्मिती होऊन भांडवलशाहीतील स्पर्धेचा अंत होऊन एकाधिकारशाहीचा उदय होतो.

नवीन उत्पादन तंत्राच्या वापरामुळे उत्पादन खर्चात घट होऊन भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होते. तसेच बेरोजगारीमुळे श्रमिकांमध्ये परस्परांत काम मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाल्यामुळे श्रमिकांकडून कमीत कमी वेतनावर जास्तीत जास्त श्रम करून घेऊन श्रमिकांचे शोषण करून भांडवलदार अधिकाधिक नफा मिळवितात. याशिवाय श्रमिकांच्या ऐवजी कमी वेतनावर स्त्रिया व अल्पवयीन मुलांनाही कामावर घेतले जाते. अशा प्रकारे भांडवलदार श्रमिकवर्गाचे जितके जास्तीत जास्त शोषण करता येईल तितके करण्याचा प्रयत्न करतो. अर्थात, यातूनच भांडवलशाहीच्या अवनतीची सुरुवात होते.

**५. नफ्याच्या दरात घट** (Falling Rate of Profit) :

नफा अधिक मिळविण्याच्या प्रेरणेतून, श्रमाची बचत करण्यासाठी, उत्पादन व्यय कमी करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी भांडवलदार नवीन तंत्राचा वापर करतात. यामुळे श्रमिकांची बेकारी वाढते तसेच अतिरिक्त मूल्याचा अधिकाधिक हिस्सा नफ्याच्या स्वरूपात भांडवलदारवर्गाकडे जात असल्यामुळे श्रमिकांची वेतन पातळी खाली येते. त्यामुळे श्रमिकांची क्रयशक्ती कमी होते. अशा रीतीने समाजात शोषण आणि शोषित असे दोन वर्ग निर्माण होतात.

श्रमिक वर्गाची क्रयशक्ती कमी झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या उत्पादनाला पुरेशी मागणी निर्माण होत नाही. (उपभोग न्यूनतेची स्थिती). परिणामी अतिरिक्त उत्पादनाची स्थिती निर्माण होते. तेव्हा उत्पादनास मागणी निर्माण होण्याकरिता भांडवलदारवर्गाला एकतर वस्तूंच्या किमती कमी कराव्या लागतील किंवा श्रमिकांना वेतन वाढवून द्यावे लागेल. शिवाय विशिष्ट काळानंतर अर्थव्यवस्थेत आऱ्हासी उत्पत्तीची प्रवृत्तीसुद्धा क्रियाशील होते. त्यामुळे उत्पादन व्ययसुद्धा वाढतो. या सर्व परिस्थितीचा परिणाम भांडवलाच्या नफ्याचा दर कमी होण्यात होतो. नफ्याच्या दरात घट झाल्यामुळे भांडवलदारवर्गाची पुनर्गुंतवणुकीची

प्रेरणा नष्ट होते आणि त्यांची रोखतेची अभिलाषा वाढते. याचा आर्थिक विकासाच्या गतीवर प्रतिकूल परिणाम होतो व आर्थिक विकासाची प्रक्रिया अवरुद्ध होते.

**६. वर्गसंघर्ष आणि समाजवादाचा उदय** (Class Struggle and Rise of Socialism) **:**

भांडवलदार श्रमिकांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक कशा प्रकारे करतात हे आपण वर पाहिलेच आहे. जेव्हा श्रमिकांना होणारी पिळवणूक असह्य होते तेव्हा आपल्या स्थितीत सुधार झाला पाहिजे अशा प्रकारची जाणीव निर्माण होऊन श्रमिकवर्ग जागरूक बनतो. भांडवलदारवर्गाविरुद्ध अनेक मार्गांनी संघर्ष करण्यासाठी प्रयत्न करतो. उदाहरणार्थ एकत्रित येऊन संघटना स्थापन करणे, हक्कासाठी संप करणे इत्यादी. हळूहळू भांडवलदार व श्रमिकवर्गातील संघर्ष तीव्र होतो आणि शेवटी या संघर्षातून क्रांती घडून येते. या क्रांतीतून एक नवीन आर्थिकप्रणालीचा म्हणजेच समाजवादाचा उदय होतो. या प्रणालीमध्ये एकूण उत्पानावर समाजाचा अधिकार प्रस्थापित होतो. समाजवादामध्ये उत्पादन शक्ती आणि उत्पादन संबंध यामध्य सामंजस्य निर्माण होते. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती परिश्रम करूनच आपला उत्पादनातील हिस्सा मिळवितो.

अशा रीतीने अर्थव्यवस्थेत सर्वच लोक श्रमातून आपले उत्पन्न मिळवीत असल्यामुळे समाजात पूर्वी अस्तित्वात असलेले भांडवलदार आणि श्रमिक असे वर्ग नाहीसे होतात. समाजामध्ये कोणीतरी एक शोषक वर्ग आणि दुसरा शोषित वर्ग अशी जी वर्गरचना होती ती संपुष्टात येते आणि एका वर्गविरहित समाजाची निर्मिती होते.

**मूल्यमापन :**

कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा सर्व जगांवर प्रभाव पडला की यातून 'मार्क्सवादा'च्या रूपाने एक स्वतंत्र विचारप्रणालीच अस्तित्वात आली. विशेष म्हणजे 'मार्क्सवादावर श्रद्धा असणाऱ्यांसाठी 'मार्क्सवाद' हा धर्म बनलेला दिसून येतो, तरीसुद्धा अजूनही मार्क्स यांचे विचार टीकेचा विषय बनले आहेत. आर्थिक विकासाच्या सिद्धांतामध्ये त्यांनी भांडवलशाहीच्या विकास-अवनती-ऱ्हास आणि वर्गविरहित समाजरचनेचा उदय अशा सूत्ररूपात आर्थिक विकासाविषयी केलेल्या प्रतिपादनांवर अनेक विचारवंतांनी अनुकूल आणि प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

**आर्थिक विकासाच्या सिद्धांतावरील टीका :**

**१.** मार्क्सने इतिहासाची भौतिकवादी मीमांसा करताना असे म्हटले आहे की, अगोदर अस्तित्वात असलेल्या सरंजामशाहीचा अस्त होऊन भांडवलशाहीचा

उदय झाला. परंतु भांडवलशाहीच्या विकासामध्येच तिच्या नाशाची बीजे असल्यामुळे ही व्यवस्था कोलमडून पडेल आणि समाजवादाचा उदय होईल. याचा अर्थ भांडवलशाही राष्ट्रांमध्ये क्रांती होऊन समाजवादाची प्रतिष्ठापना होईल अशी त्यांची कल्पना होती. परंतु प्रत्यक्षात मात्र रशिया, चीनसारख्या अप्रगत राष्ट्रांमध्ये क्रांती घडून आली. जेथे भांडवलशाहीचा विकास झालेला नव्हता. तसेच ज्या राष्ट्रामध्ये भांडवलशाही विकसित झाली होती तेथे ती अधिकच दृढ होत गेली. यावरून 'समाजवाद' ही भांडवलवादानंतरची अवस्था असे मार्क्स यांनी म्हटले आहे ते फारसे बरोबर नाही. त्यामुळे काही विचारवंतांच्या मते, 'समाजवाद' भांडवलवादाच्या नंतरची अवस्था नसून 'समाजवाद' भांडवलदाराला पर्याय आहे असे म्हणणे अधिक योग्य होईल.

**२.** भांडवलशाहीच्या विकासाबरोबरच श्रमिकांचे शोषण वाढते आणि त्यांच्या दारिद्र्यात वाढ होते असे मार्क्स यांनी म्हटले आहे. आज प्रत्यक्षात मात्र वस्तुस्थिती भिन्न आहे. भांडवलशाही राष्ट्रांमध्ये श्रमिकांचे वास्तविक उत्पन्न वाढले असून त्यांच्या राहणीमानातदेखील सुधारणा झाली आहे.

**३.** मार्क्स यांनी भांडवलशाहीमध्ये मोठ्या प्रमाणावरील उत्पादनप्रणालीचा आविष्कार केल्यामुळे लहान लहान उद्योगांचे अस्तित्व धोक्यात येते असे प्रतिपादन केले आहे. परंतु आज भांडवलशाही राष्ट्रांमध्येसुद्धा (जपान, अमेरिका इत्यादी) लहान उद्योग केवळ अस्तित्वातच नाही तर त्यांचे महत्त्वसुद्धा वाढलेले आढळून येते.

**४.** नवीन तंत्रज्ञानामुळे उत्पादकता वाढते आणि उत्पादनात वाढ होते या निवेदनात तथ्य असले तरी तांत्रिक बदलामुळे 'बेरोजगारांची सेना' निर्माण होते हे मार्क्स यांचे प्राक्कथन पटत नाही. जेव्हा उत्पादनतंत्रात बदल करावयाचा असतो तेव्हा त्यासाठी नवीन यंत्रसामुग्री निर्माण करण्यासाठी श्रमाची आवश्यकता असते. शिवाय नवीन यंत्रसामुग्रीची देखभाल आणि पुनरुत्थानासाठी श्रमिकांची आणखी आवश्यकता असतेच. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाच्या वापरातून होणाऱ्या बेकारीबरोबरच निर्माण होणाऱ्या नवीन रोजगार संधीचाही विचार व्हायला हवा. ही रोजगार संधीची शक्यता मार्क्स यांनी विचारात घेतली नाही अशी टीका केली जाते.

``---- the net effect of technological progress has been to increase the demand for labour rather than decrease it, since the investment associated with techonogical progress raises aggregate demand and income." (Meir and Baldwin, Op. Cit, P. 63.

५) भांडवलशाहीमध्ये काही काळानंतर नफ्याच्या दरात घट होते हे

मार्क्स यांचे प्रतिपादनसुद्धा निराधार आहे अशी टीका केली जाते. हिगिन्स यांच्या शब्दात ``Marx did not foresee a process of Economic development in which technological progress brings such increases in productivity and total output that both wages and profits can rise together."

६) मार्क्स यांनी भांडवलदार आणि कामगारवर्गामध्ये संघर्ष होऊन समाजवादी अर्थव्यवस्था अस्तित्वात येते आणि एक वर्गविहीन समाजरचना निर्माण होते असे प्रतिपादन केले. परंतु आज चीन आणि रशियामधील अनुभवावरून हे स्पष्ट दिसते की, या देशामध्येसुद्धा वरिष्ठ वर्ग कनिष्ठ वर्गावर सत्ता गाजवतो. या समाजरचनेमध्ये तत्त्वत: `All are equal' असे जरी बोलले जात असले तरी व्यवहारामध्ये `Except some are more equal than others" असे मानले जाते.

``----These utopian conclusions of Marx have been satrized by George Orwell in his `Animal Farm', in which utopian communism finally breaks down with the emergence of the idea that ``all animals are qual except some are more equal than ohers." (History of Economic Theory - Harry Lendreth, Page 162)

७) प्रा. हने यांच्या मते, "मार्क्स यांनी मांडलेले तत्त्वज्ञान एकांगी स्वरूपाचे आहे आणि म्हणूनच त्यांची भविष्यवाणीसुद्धा खोटी ठरली."

८) मार्क्स यांचे परममित्र एंगल्स यांनासुद्धा मार्क्स यांचे इतिहासाचे विवेचन मान्य नव्हते.

**मार्क्स यांच्या विचारांचे श्रेष्ठत्व :**

मार्क्स यांच्या विवेचनावर अनेक विचारवंतांनी टीका केली असली तरी त्यांच्या विचारांचा पुरस्कार अनेक राष्ट्रांनी केलेला आढळून येतो. अजूनही ``Workers of the world unite, you have nothing to loose but your chains." या घोषणेने श्रमिकांना एकतेचा एक आगळा प्रत्यय येतो.

सदोष व्यवस्थेमुळेच भांडवलशाहीचा अंत होईल असे मार्क्सचे मत होते. अद्याप तरी ते खरे ठरलेले नाही. परंतु त्यामुळे त्यांचे संपूर्ण विवेचन खोटे आहे असे म्हणणे उचित होणार नाही. हाईलब्रोनरच्या मते, "बाजारव्यवस्थेतील दोषांचे निराकरण करण्यासाठी (सुव्यवस्था आणण्यासाठी) जो हस्तक्षेप एकदा सुरू झाला तो अजूनही थांबला नाही. या हस्तक्षेपाद्वारे भांडवलशाहीवरील संभाव्य आपत्ती प्रत्येक वळणावर रोखली गेली. याचे श्रेय मार्क्स यांना द्यावेच लागते."

लॉर्ड केन्सबद्दल आदर असणारे काही अभ्यासकसुद्धा मान्य करतात की, केन्स यांची काही भाकिते खरी ठरली नाहीत. तरीही केन्स यांनी अर्थशास्त्रीय विचारात दिलेले योगदान आर्थिक विचारवंत मान्यच करतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत विकासाबरोबरच भांडवलाचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणावर होऊन एकाधिकारशाही अस्तित्वात येते असे मार्क्स यांनी केलेले विवेचन आज भांडवलशाही राष्ट्रांमधल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे (Multi-National Corporations) जगातील बाजारपेठेमध्ये वाढत असलेले महत्त्व विचारात घेता बरोबर वाटते.

अभिमतपंथी विचारवंतांनी भांडवलवादालाच अंतिम सत्य मानून आर्थिक विकासाचे विवेचन केले. भांडवलशाहीनंतरही अर्थव्यवस्थेत काही परिवर्तन शक्य आहे याचा त्यांनी विचारच केलेला नाही. परंतु कार्ल मार्क्स यांनी भांडवलवादानंतर समाजवाद अपरिहार्य आहे असे मत मांडले आणि भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. यातच अभिमतपंथी विचारवंतांपेक्षा मार्क्स यांचे वेगळेपण सिद्ध होते.

---

## प्रश्नसंग्रह

**१) ॲडम स्मिथ :**

प्र. १. ॲडम स्मिथ यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत विशद करा.

**२) डेव्हिड रिकार्डो :**

१. डेव्हिड रिकार्डोचा आर्थिक विकासाचा सिद्धांत विशद करून त्याचे मूल्यमापन करा.

**३. रॉबर्ट माल्थस :**

१. रॉबर्ट माल्थसचा आर्थिक विकासाचा सिद्धांत सांगून त्याचे टीकात्मक मूल्यमापन करा.

२. अभिमतपंथी विवेचनाची वैशिष्ट्ये सांगून अभिमतपंथी विवेचनाचे मूल्यमापन करा.

**४. कार्ल मार्क्स :**

१. कार्ल मार्क्स यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत सांगून टीकात्मक परीक्षण करा.

२. कार्ल मार्क्स यांनी दिलेल्या विकासाच्या विविध अवस्था विशद करून त्यांच्या विचारांचे महत्त्व विशद करा.

❏❏❏

## अमर्याद श्रम पुरवठा आणि आर्थिक विकास - लेविस यांचे विकासाचे प्रारूप

(Lewis Model of Unlimited Supply of Labour)

अर्धविकसित देशांच्या आर्थिक विकासासाठी 'संतुलित वृद्धी'च्या व्यूहरचनेचा पुरस्कार नर्क्स यांच्याप्रमाणेच आर्थर लेविस यांनीसुद्धा केला आहे. ज्या देशामध्ये अमर्याद श्रमपुरवठा उपलब्ध असतो त्या देशांचा विकास कशा प्रकारे करता येईल याचे विवेचन त्यांनी त्यांच्या (Economic Development with unlimited Supplies of Labour) या शोधनिबंधातून केले आहे. यालाच लेविस यांचे 'विकासाचे प्रारूप' असे म्हटले जाते.

डब्ल्यू. ए. लेविस यांच्या मते आर्थिक विकासाच्या विवेचनासाठी अभिमतपंथी सिद्धांतामधील काही गृहिते काही प्रमाणात सुधारणा करून आजही अर्धविकसित देशांच्या विकासाच्या विवेचनासाठी लागू होतात. उदाहरणार्थ - निर्वाहवेतन पातळीवर श्रमपुरवठा उपलब्ध असतो किंवा भांडवल संचयातून आर्थिक विकासाच्या गतीमध्ये वाढ होते. तसेच अविकसित देशात असलेला अमर्याद श्रमपुरवठासुद्धा उपयोगात आणता येईल इत्यादी गृहितांचा विचार करता येईल. त्यानंतर नव-अभिमतपंथीयांनी मात्र निर्वाहवेतन पातळीवर अमर्याद श्रमपुरवठा उपलब्ध असतो या गृहिताचा विचार केलेला नाही. याचे कारण युरोपमध्ये अमर्याद श्रमपुरवठ्याची स्थितीच नव्हती असा युक्तिवाद मांडला जातो. परंतु आशिया खंडातील अनेक देशांमध्ये अमर्याद श्रमपुरवठ्याची स्थिती असतानासुद्धा फार कमी अर्थतज्ज्ञांनी याचा विचार केलेला दिसून येतो. ही वस्तूस्थिती मान्य केली पाहिजे. केन्स यांनी मात्र अल्पकाळामध्ये चालू वेतन दराप्रमाणे अमर्याद श्रमाचा पुरवठा गृहीत धरलेला दिसून येतो.

लेविस यांनी त्यांच्या विकासाच्या प्रारूपामध्ये अर्धविकसित देशांमध्ये अमर्याद श्रमपुरवठा असतो आणि हा श्रमपुरवठा 'वास्तव वेतन दरावर' उपलब्ध होऊ शकतो आणि हा वेतनदर स्थिर राहतो असे गृहीत धरले आहे.

**बंदिस्त अर्थव्यवस्था** (Closed Economy) :

लेविस यांनी प्रथम 'बंदिस्त अर्थव्यवस्थे'मध्ये अमर्याद श्रमपुरवठ्याच्या साहाय्याने आर्थिक विकास कसा करता येईल याचे विवेचन केले आहे. 'बंदिस्त अर्थव्यवस्था' म्हणजे अशी अर्थव्यवस्था की ज्यामधून उत्पादन घटकांचे इतर देशांमध्ये स्थलंतरण होत नाही किंवा बाहेरच्या देशातून उत्पादन घटक (श्रम किंवा भांडवल) आयात केले जात नाहीत. थोडक्यात,

सुरुवातीस त्यांनी केवळ एक अर्थव्यवस्था विचारात घेऊन त्यांच्या प्रारूपाची मांडणी केली.

लेविस यांच्या विकासाच्या प्रारूपाचे विवेचन पुढील गृहितांवर आधारित आहे.

१) अर्धविकसित देशामध्ये द्विदल अर्थव्यवस्था असते आणि २) या देशामध्ये अमर्याद श्रमपुरवठा असतो.

**१) द्विदल अर्थव्यवस्था** (Dual Economy) :

अर्धविकसित राष्ट्रांमध्ये दोन उत्पादन क्षेत्र असतात. एक भांडवली क्षेत्र (Capitalist Sector) आणि 'निर्वाह क्षेत्र' (Subsistance Sector). भांडवली क्षेत्रामध्ये पुनरुत्पादी भांडवलाचा (Reproducibal Capital) वापर केला जातो. म्हणजे भांडवली वस्तूंचा वापर केला जातो. त्या क्षेत्रात भांडवलदार त्यांचे भांडवल गुंतवतात आणि नफा मिळवतात. या क्षेत्रामध्ये विविध वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग, खाणी, मळे (Plantation Industry) इत्यादींचा समावेश होतो. लेविस यांनी या क्षेत्रात खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र या दोन्ही क्षेत्रांतील गुंतवणुकीचा समावेश केला आहे. या क्षेत्रातील कामगारांची उत्पादनक्षमता निर्वाहक्षेत्राच्या तुलनेत अधिक असते.

निर्वाह क्षेत्रात पुनरुत्पादी भांडवलाचा वापर होत नाही. म्हणजेच भांडवली वस्तूंचा वापर केला जात नाही. या क्षेत्राला 'परंपरागत क्षेत्र' किंवा 'स्वयंम रोजगाराचे क्षेत्र' असेही म्हणता येईल. या क्षेत्रातील कामगारांची उत्पादकता भांडवली क्षेत्राच्या तुलनेत खूपच कमी असते. यामध्ये कृषि, ग्रामीण भागातील हंगामी रोजगार देणारे व्यवसाय, घरगुती व्यवसाय, किरकोळ व्यापार इत्यादी उद्योगांचा समावेश होतो. कृषिक्षेत्रातील सांप्रत तंत्रज्ञानामध्ये श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य किंवा शून्याच्याजवळ असते. त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रच्छन्न बेकारी असते.

**भांडवली क्षेत्र आणि निर्वाह क्षेत्रातील संबंध :**

लेविस यांच्या मते, - या दोन्ही क्षेत्रामध्ये घनिष्ठ स्वरूपाचे संबंध आहेत. भांडवली क्षेत्राचा विस्तार होताना निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रात सामावून घेतले जाते. त्या ठिकाणी त्यांची उत्पादकता वाढते म्हणजेच दरडोई उत्पादन वाढते. त्यांच्यामते अशा अर्थव्यवस्थेमध्ये भांडवली क्षेत्रामध्ये श्रमिकांना प्रचलित वेतनदर देऊन नवीन उद्योगांची उभारणी करणे किंवा आहे त्या उद्योगांचा विस्तार करणे सहज शक्य असते. शिवाय अमर्याद श्रमपुरवठा उपलब्ध असल्यामुळे रोजगाराचे नवीन स्रोत निर्माण

केल्यास हितकारकच असते.

भांडवली क्षेत्रातील वेतनदर निर्वाह क्षेत्रातील वेतनदरापेक्षा अधिक असेल कारण श्रमिकांना निर्वाह क्षेत्रातून भांडवली क्षेत्रात स्थलांतरित होण्यासाठी आणि त्यांना पारंपारिक जीवनपद्धतीपेक्षा वेगळे जीवनमान उपलब्ध करून देण्यासाठी निर्वाहक्षेत्रातील 'निर्वाह वेतन दरा'पेक्षा (Subsistance wages) अधिक वेतन दर दिला जाईल. भांडवली क्षेत्रातील या वेतनदरास लेविस यांनी 'वास्तव वेतन दर' (Real Wages) असे म्हटले आहे. त्यांच्या मते वास्तव वेतन दर आणि निर्वाह वेतन दरामध्ये साधारणपणे ३० टक्के तफावत असते. म्हणजेच निर्वाह वेतन दरापेक्षा वास्तव वेतन दर जास्त असतो.

(........ Real wage means subsistance plus a certain percentage to cover higher cost & living in towns where the surplus population will be taken for creating capital.)

**२) अमर्याद श्रमपुरवठा :**


या प्रारूपाची मांडणी करताना लेविस यांनी जे दुसरे गृहीत धरले ते म्हणजे **अर्थव्यवस्थेत श्रमाचा पुरवठा अमर्याद असतो.** म्हणजेच श्रमपुरवठा संपूर्ण लवचिक असतो. त्यांच्या मते सर्वच देशांमध्ये श्रमपुरवठा अमर्यादित असतो असे मात्र नाही. जसे इंग्लंड, उत्तर-पश्चिम युरोप, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील काही देशांमध्ये श्रमपुरवठा मर्यादित आहे. परंतु इजिप्त, भारत इत्यादी देशांमध्ये श्रमपुरवठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे.

या देशामध्ये श्रमपुरवठा विविध कारणांमुळे अतिरिक्त आहे. जसे या देशातील लोकसंख्या वाढीचा वेग अधिक आहे तसेच उपलब्ध साधन संपत्ती व भांडवल यांच्यापेक्षा अधिक प्रमाणात श्रमाचा पुरवठा असणारे काही देश आहेत. भांडवली क्षेत्राचा विस्तार पुरेशा प्रमाणात झालेला नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध श्रमिकांना निर्वाह क्षेत्रावरच अवलंबून राहावे लागते. यातून या देशांमध्ये प्रच्छन्न बेकारीची समस्या निर्माण झालेली असते. शिवाय हंगामी रोजगारीमुळे श्रमाचा अपव्यय होतो. या सर्व कारणामुळे अशा देशांतून श्रमपुरवठा अमर्याद असतो.

**आर्थिक विकासाचे प्रारूप :**

लेविस यांनी आर्थिक विकासाकरिता भांडवली क्षेत्रातील आधिक्य हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला आहे. या आधिक्यातून पुन्हा भांडवल गुंतवणूक करून निर्वाह क्षेत्रातील प्रच्छन्न बेकारीच्या स्वरूपात आणि इतर

उपलब्ध असलेला श्रमपुरवठा (जो संपूर्ण लवचिक आहे.) यांच्या साह्याने भांडवली क्षेत्राचा विस्तार करून अर्धविकसित देशाचा आर्थिक विकास साधता येईल, असे लेवित यांनी आपल्या विकासाच्या प्रारूपातून स्पष्ट केले आहे. या प्रारूपाचे स्पष्टीकरण आकृतीच्या साहाय्याने पुढीलप्रमाणे करता येईल.




Dr. Shivaji Pate
Asso. Professor and
Head Dept. Of
Economics
Sant Tukaram College of
Arts and Science,
Parbhani

१) स स - निर्वाह क्षेत्रातील वेतन

२) व व - भांडवली क्षेत्रातील वेतन

३) $न_{१}$ $प_{१}$

$न_{२}$ $प_{२}$

$न_{३}$ $प_{३}$ - सीमांत उत्पादकता वक्र

$न_{४}$ $प_{४}$

वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर श्रमाच्या मात्रा आणि 'अय' अक्षावर वेतन आणि सीमांत उत्पादन दिले आहे. 'अक्ष' अक्षासी समांतर असलेला 'वव' हा वक्र भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतनदर दर्शवितो. तसेच श्रमपुरवठा संपूर्ण लवचिक असल्याचेही दर्शवितो. 'सस' हा वक्र निर्वाह वेतनदर दर्शवितो जो वेतनदरापेक्षा कमी आहे. आकृतीत दर्शविलेले $न_{१}$ $प_{१}$, $न_{२}$ $प_{२}$, $न_{३}$ $प_{३}$ आणि $न_{४}$ $प_{४}$ हे सीमांत उत्पादकता दर्शवितात.

सुरुवातीस विशिष्ट भांडवल गुंतवणूक केली असता अम$_१$ इतके श्रमिक कार्यान्वित केले जातील. त्यांना 'अव' इतका वेतनदर दिला जाईल. याठिकाणी एकूण उत्पादन (अन$_१$ प$_१$ म$_१$) इतके असेल. एकूण उत्पादनातून एकूण वेतन (अवप$_१$ म$_१$) हे वजा केले असता शिल्लक राहिलेला भाग (न$_१$ वप$_१$) हा उत्पादक वर्गाचे आधिक्य किंवा नफा असेल.

या मिळालेल्या आधिक्यातून उत्पादकांनी परत गुंतवणूक केली असता अधिक भांडवल गुंतवणूक केल्यामुळे श्रमिकांची उत्पादकता वाढेल व सीमांत उत्पादकता वक्र वर सरकेल आणि (न$_२$ प$_२$) हा नवीन सीमांत उत्पादकता वक्र मिळेल तसेच उत्पादक, श्रमिकांच्या संख्येत वाढ करून (अम$_२$) श्रमीक कार्यान्वीत करील. याठिकाणी एकूण उत्पादन (अन$_२$ प$_२$ म$_२$) मिळेल यामधून (अव प$_२$ म$_२$) हे श्रमिकांचे एकूण वेतन वजा केल्यास उत्पादकांना (न$_२$ व प$_२$) इतके अधिक्य मिळेल. जे पुर्वीपेक्षा अधिक आहे.

अशा प्रकारे मिळालेल्या अधिक्यातून उत्पादकांनी परत भांडवल गुंतवणूक केल्यास त्यांच्या आधिक्यात अनुक्रमे (न$_३$ व प$_३$) आणि (न$_४$ व प$_४$) अशा प्रकारे वाढ होईल. तसेच भांडवली क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाणसुद्धा (अम$_३$) व (अम$_४$) अशा प्रकारे वाढत जाईल याचा अर्थ उत्पादक वर्गांना मिळणारे आधिक्य परत गुंतवणूक करून निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रात कार्यान्वित करून एकूण उत्पादन पातळी वाढविता येईल आणि आर्थिक विकासास गती मिळेल.

अमर्याद श्रमपुरवठ्यास कार्यान्वित करण्यासाठी लेविस यांनी श्रमप्रधान तंत्राला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या मते ज्या सुधारणा उद्योगांमध्ये भांडवलप्रधान तंत्रांचा अंगीकार करणे अपरिहार्य असते त्या ठिकाणी अवश्य त्याचा वापर करावा. परंतु अर्धविकसित देशांमध्ये अनेक महत्त्वाचे उपक्रम अल्प भांडवल गुंतवून आणि मानवी श्रमाचा मोठ्या प्रमाणावर वापर करून सुरू केले पाहिजेत. एवढेच नाही तर या देशात बऱ्याच भांडवली वस्तूंची निर्मितीसुद्धा अमर्याद पुरवठा असलेल्या श्रमाचा वापर करून करता येईल आणि या देशांत मुळातच मर्यादित स्वरूपात उपलब्ध असलेल्या भांडवलाचा प्रश्नसुद्धा सोडवता येईल. (Witness the pyramids of the Marvellous railway tunnels built in the mid-nineteenth century almost with bare hands! W. A. Lewis))

**भांडवल उभारणीचे स्रोत :**

आर्थिक विकासाकरिता आवश्यक भांडवल उभारणी उपादक वर्गाच्या आधिक्यातून होते असे लेविस यांनी प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते

अर्धविकसित देशांमध्ये साधारणपणे वरच्या १० टक्के लोकांकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी जवळजवळ ४० टक्के राष्ट्रीय उत्पन्न केंद्रित झालेले असते. त्यामुळे या १० टक्के वर्गाकडे बचत क्षमता असते. म्हणजेच ज्या लोकांकडे नफा व खंड जातो तेच लोक फक्त बचत करतात. कामगारांची वेतन पातळी कमी असल्यामुळे ते बचत करू शकत नाहीत आणि मध्यमवर्गाची बचतसुद्धा राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा जास्त नसते. मात्र उत्पादकवर्गाची उत्पन्न पातळी, आधिक्य वरचे वर वाढत जात असल्याने सातत्याने वाढते. परंतु यांचा अर्थ उत्पन्न विषमता जितकी अधिक तितकी बचत क्षमता अधिक असा मात्र नाही. उलट या देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे जितके समान वाटप होईल तितकी बचत क्षमता अधिक असते.

भांडवल उभारणीकरिता उत्पादकवर्गाचा नफा हा जसा महत्त्वाचा घटक आहे तसेच त्या देशातील शासनाद्वारे अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यात वाढ करून किंवा बँकांद्वारे अधिक पतनिर्मिती करूनसुद्धा भांडवल उभारणी करता येते, असे लेविस यांनी प्रतिपादन केले आहे. या भांडवल गुंतवणुकीतून बेकार श्रमिक कार्यान्वित होतील. त्यांची उत्पन्न पातळी वाढेल व त्यामुळे त्याचा उपभोग खर्च वाढेल. अल्पकाळामध्ये उत्पादित वस्तूंचा पुरवठा वाढलेला नसल्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढतील. परंतु दीर्घकाळात भांडवली क्षेत्राचा विस्तार होत असताना उत्पादनातसुद्धा वाढ होते. त्यामुळे उपभोग्य वस्तूंचा पुरवठा बाजारात आल्याबरोबर त्याच्या किंमती कमी होतील. अशा प्रकारे चलनवाढ करून भांडवली उभारणी केल्यामुळे किंमतपातळी वाढण्याच्या शक्यता आपोआपच नाहीशा होतात असे लेविस म्हणतात.

अशा प्रकारे अमर्याद श्रमपुरवठ्याला कार्यान्वित करण्यासाठी भांडवल गुंतवणक केली जाईल. यातून भांडवली क्षेत्राचा विस्तार होऊन सीमांत उत्पादकता वाढत जाते, एकूण उत्पादन वाढते, राष्ट्रीय उत्पन्न वाढते व आर्थिक विकासाला चालना मिळते.

**भांडवल उभारणीच्या मर्यादा :**

आर्थिक विकासाचा वेग भांडवली क्षेत्रातील उत्पादकांना मिळणाऱ्या नफ्यातून किंवा आधिक्यातून केल्या जाणाऱ्या भांडवल गुंतवणुकीवर अवलंबून असतो. जोपर्यंत ही भांडवल गुंतवणूक केली जाईल तोपर्यंत आर्थिक विकास होत राहील. परंतु लेविस यांच्यामते या भांडवल गुंतवणुकीवरसुद्धा मर्यादा आहेत. त्या मर्यादा पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) जोपर्यंत अर्थव्यवस्थेत अतिरिक्त श्रमिक आहेत तोपर्यंतच उत्पादक वर्ग गुंतवणूक करील. जेव्हा निर्वाह क्षेत्रातील सर्व अतिरिक्त श्रमिक भांडवली क्षेत्रात

कार्यान्वित केले जातील त्या ठिकाणी भांडवल संचयाची प्रक्रिया थांबेल.

२) भांडवल गुंतवणुकीतून निर्वाह क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावरील अतिरिक्त श्रमपुरवठा भांडवली क्षेत्रात कार्यान्वित केल्यानंतर एका बाजूने निर्वाह क्षेत्राने राहिलेल्या श्रमिकांची उत्पादकता वाढेल त्यामुळे त्यांच्या वेतनात वाढ होईल. दुसऱ्या बाजूने निर्वाह क्षेत्रातील वेतनात वाढ झाल्यामुळे भांडवली क्षेत्रातील वेतनात वाढ झाल्यामुळे भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतनदर वाढेल. त्यामुळे उत्पादकांच्या नफ्यात घट होईल आणि भांडवल गुंतवणुकीची प्रेरणा राहणार नाही.

३) भांडवली क्षेत्रातील विकासाबरोबर निर्वाह क्षेत्रामध्येसुद्धा आहे ते तंत्रज्ञान न वापरता आधुनिक तंत्राचा म्हणजेच यंत्रसामुग्री, खते, उत्पादकवर्धक बी-बियाणे इत्यादींचा वापर केला जाईल. त्यामुळे या क्षेत्रातील उत्पादकता वाढून उत्पादन वाढेल. स्वाभाविकपणे या क्षेत्रातील श्रमिकांचे वेतन वाढेल. याचा परिणाम म्हणून परत भांडवली क्षेत्रातील श्रमिकांच्या वेतनात वाढ होईल आणि उत्पादकांच्या नफ्यात घट होऊन भांडवल गुंतवणुकीची पातळी घटते.

४) भांडवली क्षेत्राचा विस्तार होताना या क्षेत्रातील श्रमिकांनासुद्धा स्वतःचे राहणीमान उंचावण्याची सुप्त इच्छा जागृत होईल. त्यासाठी ते संघटित होऊन प्रयत्न करतील. त्यामुळे त्यांचे वेतन वाढेल मात्र दुसऱ्या बाजूने उत्पादकता वाढत नाही. साहजिकच एकूण उत्पादन वाढणार नाही. त्यामुळे भांडवलदारवर्गाच्या अधिक्यात घट होईल.

अशा प्रकारे अमर्याद श्रमपुरवठ्याची स्थिती नाहीशी झाल्यावर आणि उत्पादक वर्गाच्या नफ्यात घट झाल्यामुळे उत्पादक अधिक भांडवल निर्मिती करून भांडवल गुंतवणूक करणार नाहीत. त्यामुळे आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबेल.

**खुली अर्थव्यवस्था** (Open Economy)

जर केवळ देशातील अर्थव्यवस्थेपुरता भांडवल गुंतवणुकीचा आणि अमर्याद श्रम पुरवठ्याचा विचार केला तर वर निर्देशित केल्याप्रमाणे भांडवलसंचयाची प्रक्रिया कुंठीत होईल. परंतु जर भांडवली आधिक्याची इतर देशामध्ये निर्यात करणे शक्य असेल किंवा इतर देशांत असलेला अमर्याद श्रमपुरवठा आपल्या देशात आणून उत्पादनासाठी कार्यान्वित करणे शक्य असेल. थोडक्यात खुली किंवा मुक्त अर्थव्यवस्था असेल तर आणखी भांडवल गुंतवणुकीच्या शक्यता निर्माण होतील. लेविस यांच्या मते अशा अर्थव्यवस्थेत पुढील मार्गाचा अवलंब करून भांडवली आधिक्याची पुनर्गुंतवणूक करणे शक्य होते.

१) इतर देशातील अतिरिक्त श्रमिकांना आपल्या देशात येऊन स्थायिक होण्यास प्रोत्साहन देणे. त्यामुळे देशातील वास्तव वेतनदर वाढणार नाही व

उत्पादकांचा नफा घटणार नाही.

२) ज्या देशात अमर्याद श्रमपुरवठा आहे आणि तो निर्वाह वेतनदरावर उपलब्ध होऊ शकतो. अशा देशांमध्ये भांडवलाची निर्यात करून गुंतवणूक करणे.

परंतु आजच्या परिस्थितीत पहिला मार्ग अंमलबजावणीत आणणे अशक्य आहे. कारण इतर देशातून श्रमाची आयात झाल्यामुळे देशामध्ये प्रचलित असलेला वास्तव वेतनदर खाली येण्याची भीती असल्यामुळे देशातील श्रमिक संघटना विदेशी श्रमिक आयातीस तीव्र विरोध करतील. दुसरा मार्ग त्यापेक्षा अधिक व्यवहार्य वाटतो. कारण यामध्ये देशातून भांडवल निर्यात करून उत्पादकांना अधिक नफा मिळविता येईल.

**मूल्यामापन :**

लेविस यांच्या आर्थिक विकासाच्या प्रारूपाने अर्धविकसित राष्ट्रांचे लक्ष वेधून घेतले. कारण द्विदल अर्थव्यवस्थेतील विकास प्रक्रियेचे विवेचन या देशांना उपयुक्त ठरणार होते. तरी परंतु या प्रारूपावर अनेक अर्थतज्ज्ञांनी सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून टीका केली आहे.

१) लेविस यांचे प्रारूप अमर्याद श्रमपुरवठ्याच्या गृहितावर आधारित आहे. परंतु सर्वच अर्धविकसित देशांमध्ये अमर्याद श्रमपुरवठा उपलब्ध असतो असे गृहीत धरणे बरोबर नाही. कारण आफ्रिका, लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये श्रमपुरवठा मर्यादित असल्याचे दिसून येते. तेव्हा सर्वच अर्धविकसित देशामध्ये प्रच्छन्न बेकारीची स्थिती नसते अशी टीका केली गेली परंतु लेविस यांच्या विवेचनामध्ये केवळ प्रच्छन्न बेकारीचाच विचार केलेला नाही तर निर्वाह क्षेत्रातील उत्पादकता तुलनेने कमी असल्यास किंवा भांडवली क्षेत्राच्या मागणीच्या तुलनेत श्रमाचा पुरवठा अधिक असल्याससुद्धा श्रमपुरवठा अधिक लवचिक असू शकतो.

२) लेविस यांनी अमर्यादित श्रमपुरवठा असेपर्यंत वास्तव वेतनदर स्थिर राहतो व त्यामुळे भांडवल गुंतवणुकीतून सीमांत उत्पादकता वाढून उत्पादकांना नफा मिळतो. तसेच उत्पादक नफ्याची तोपर्यंत पुनर्गुंतवणूक करतील जोपर्यंत निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमपुरवठा भांडवली क्षेत्राला कार्यान्वित होत नाही असे विवेचन केले आहे. परंतु अर्धविकसित देशामध्ये शासनाद्वारे किमान वेतन कायदे करण्यात आले आहेत. तसेच उद्योग क्षेत्रात कामगार संघटनांची सौदा शक्ती वाढल्यामुळे वेतनदर सारखा वाढतो आहे. त्यामुळे अमर्याद श्रम पुरवठा असताना सुद्धा वास्तव वेतनदरात वाढ होऊ शकते. अशा परिस्थितीमध्ये लेविस यांच्या प्रारूपातील विवेचनास मर्यादा पडतात.

३) लेविस यांनी या देशातून भांडवली क्षेत्राचा विस्तार करताना श्रमप्रधान

तंत्राचा अंगीकार केला जातो असे गृहीत धरले. परंतु प्रत्यक्षात बहुतेक अर्धविकसित देशांमध्ये भांडवलप्रधान तंत्राचा अवलंब केला आहे. त्यामुळे या देशामध्ये उत्पादकतेत वाढ झाली आहे. परंतु रोजगार पातळी मात्र अपेक्षित प्रमाणात वाढली नाही. तसेच या देशांमधून शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी अद्ययावत तंत्राचा वापर केला आहे. त्यामुळे निर्वाहक्षेत्र व भांडवली क्षेत्रातील अकुशल श्रमिकांना वाढत्या भांडवल गुंतवणुकीमुळे बरोबर रोजगार मिळण्याऐवजी बेकारीच्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे.

४) अर्धविकसित राष्ट्रांमध्ये अकुशल श्रमाचा पुरवठा जरीही अमर्यादित असला तरी कुशल श्रमिकंचा पुरवठा मात्र अपुरा असतो. लेविस यांच्या मते श्रमिकांना प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देऊन हा प्रश्न सोडविता येतो. परंतु प्रत्यक्षात अनेक विकसनशील राष्ट्रांचा अनुभव विचारात घेता श्रमिकांमध्ये कुशलता निर्माण करणे व त्यातून विविध क्षेत्रातील कुशल श्रमिकांची गरज पूर्ण करणे हे काम सोपे नाही आणि अल्पकाळात ते शक्यही नाही. त्यामुळे या श्रमिकांचा पुरवठ्याचा वक्र संपूर्ण लवचिक असणार नाही.

५) या प्रारूपामध्ये लेविस यांनी भांडवली क्षेत्रामध्ये उद्योजक पुरेशा प्रमाणात असून ते सतत पुनर्गुंतवणूक करतात असे गृहीत धरले आहे. परंतु प्रत्यक्षात या देशामध्ये धोका पत्करून भांडवल गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांची उणीव असते. अनेक भांडवलदार उद्योग स्थापन करण्याऐवजी साठेबाजी किंवा सट्टेबाजीच्या व्यवहारात बचत गुंतवून जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. अशा परिस्थितीमध्ये भांडवल गुंतवणूक सतत वाढून भांडवली क्षेत्राचा विस्तार होईल असे गृहित धरणे वास्तवतेला धरून होणार नाही.

६) लेविस यांनी पैशाच्या पुरवठ्यात निव्वळ वाढ करून भांडवल उभारणी केल्यामुळे अर्थव्यवस्थेत जी चलनवाढ होते तिचे परिणाम आपोआपच नाहीसे होतील. कारण लगेचच उपभोग्य वस्तुंचे उत्पादन करून या वस्तूंचा बाजारात पुरवठा केला जाईल त्यामुळे किंमत पातळी वाढणार नाही असे प्रतिपादन केले आहे. परंतु प्रत्यक्षात अनेक विकसनशील देशांमध्ये उत्पादन क्षेत्रातील रचनात्मक दृढतेमुळे उपभोग्य वस्तूंचा पुरवठा पुरेशा प्रमाणात आणि योग्य वेळी होत नाही असे दिसून येते. त्यामुळे या देशामध्ये या वस्तूंच्या किंमती वेगाने वाढत आहेत. बहुतेक देशामध्ये मुद्रा स्फीतीच्या समस्येवर गंभीर स्वरूप धारण केले आहे.

७) मेयर यांच्या मते निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रामध्ये कार्यान्वित करणे सहज शक्य आहे, असे लेविन यांनी गृहीत धरले आहे. ते तितके सोपे नाही. कारण एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात श्रमिकाचे स्थलांतरण

होताना अनेक प्रकारची सामाजिक-सांस्कृतिक बंधने आहेत की ज्यामुळे श्रमिकांच्या व्यावसायिक आणि भौगोलिक गतिशीलतेवर मर्यादा पडतात. जर ही गतीशिलता वाढवायची असेल तर, त्यासाठी समाजातील विविध संघटनांची पुनर्रचना करणे, तांत्रिक सुधारणा करणे आणि संस्थात्मक परिवर्तन घडवून आणणे आवश्यक असते.

८) ए. एम. खुसरो यांनी लेविस यांच्या प्रारूपामधील आणखी एक दोष निदर्शनास आणून दिला आहे. त्यांच्या मते, या प्रारूपामध्ये अर्धविकसित राष्ट्रातील कृषिक्षेत्रात जे श्रमिक प्रच्छन्न बेकार आहेत. त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त बचत क्षमतेचा उपयोग करून औद्योगिकरणाची प्रक्रिया गतिमान करता येईल, असे गृहीत धरले आहे. परंतु प्रत्यक्षात या देशातील शेतकऱ्यांमध्ये किंमत संवेदनाचा अभाव दिसून येतो. कृषिक्षेत्रातील पुरवठ्याची किंमत लवचिकता ताठर असते. शिवाय जेव्हा व्यापरशर्ती कृषिक्षेत्राच्या दृष्टीने अनुकूल होतात. तेव्हा विक्रीत वाढवा घटतो. (कृषि उत्पादनाचा वक्र मागे वळणारा असतो) तसेच शेतकरी, किरकोळ व्यापारी किंवा घाऊक व्यापारी यांची साठेबाजीची प्रवृत्ती वाढत असल्यामुळे कृषिक्षेत्राबाहेरील होणारा पुरवठा वाढण्याची शक्यता नसते. इत्यादी गळत्या विचारात घेता या क्षेत्रातील बचत क्षमतेचा वापर करता येणे सहज शक्य नसते.

९) कुझनेटस यांच्या मते हे प्रारूप स्वीकारण्यात आल्यानंतर अर्धविकसित देशांमध्ये उत्पन्न विषमता अधिक वाढेल.

१०) लेविस यांच्या मते अर्धविकसित देशामध्ये फक्त भांडवलदारवर्गच बचत करतो इतर वर्गाकडे बचत क्षमता नसते. परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेच्या १९६५ च्या अभ्यासावरून १९५१-५२ ते १९६२-६३ या काळातील भारतातील एकूण बचतीतील विविध क्षेत्राचे प्रमाण पाहिले तर एकूण बचतीमध्ये घरगुती क्षेत्राचा वाटा ७४.६ टक्के होता तर सार्वजनिक क्षेत्राचा वाटा १९.५ टक्के आणि निगम क्षेत्राचा वाटा (Corporate Sector) केवळ ५.९ टक्के इतका होता. या शिवाय नॅशनल कौंसिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER) च्या वतीनेसुद्धा भारतातील बचतीच्या संदर्भात केलेल्या अभ्यासामध्ये असे निदर्शनास आले आहे की निगम क्षेत्रापेक्षा घरगुती क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्रातील बचतीचे प्रमाण अधिक आहे.

यावरून लेविस यांनी बचत उभारणीमध्ये केवळ निगम क्षेत्राला अवास्तव महत्त्व दिले आहे अशी टीका केली जाते.

वरील प्रमाणे लेविस यांच्या प्रारूपावर टीका करण्यात आली असली तरी लेविस यांनी त्यांच्या प्रारूपातून अर्धविकसित देशात असलेली प्रच्छन्न बेकारी

नाहीशी करणे ही एक महत्त्वाची समस्या आहे आणि या देशातील समाजाच्या इच्छाशक्तीद्वारे आणि योग्य नियोजनातून हा प्रश्न सोडविता येईलच. परंतु त्याचबरोबर अमर्याद श्रमपुरवठ्याचा या देशाच्या विकासात योग्य प्रकारे उपयोगसुद्धा करता येईल. हे विवेचन मौलिक स्वरूपाचे आहे, हे मान्य केले पाहिजे.

## रोस्टो यांच्या आर्थिक विकासाच्या अवस्था
## (Rostow's Stages of Economic Growth)

आर्थिक विकासाच्या अवस्थांच्या सिद्धांतामधून विविध अर्थशास्त्रज्ञांनी, अर्थव्यवस्था आर्थिक विकासाच्या विविध अवस्थांमधून गेल्यानंतर त्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास होतो असे मत मांडले आहे. मात्र विकासाच्या अवस्था किती याबद्दल अर्थशास्त्रज्ञामध्ये मतभिन्नता आढळून येते. लिस्ट यांच्यामते आर्थिक विकासाच्या चार अवस्था आहेत. तर हिंडल ब्रांड व बूकर यांनी तीन अवस्थांचा उल्लेख आहे. जर्मन अर्थशास्त्रज्ञांचा आर्थिक विकास विविध अवस्थांमधून होतो यावर अधिक विश्वास असल्याचे दिसून येतो. यातूनच विकासाच्या अवस्थांचे विवेचन करणारे अनेक सिद्धांत विकसित झाले आहेत.

जे. ए. शुम्पीटर यांच्या मते विकासाचा 'अवस्थाविषयक दृष्टिकोन' अती प्राचीन आहे. परंतु रोस्टो यांच्या सिद्धांताबद्दल असे म्हणता येणार नाही. कारण रोस्टोचा हा अभिनव सिद्धांत असून त्यांनी अनेक देशांचा अभ्यास करून या सिद्धांताची मांडणी केली आहे. कुझनेटस् यांनीसुद्धा अशा प्रकारचा सिद्धांत मांडला आहे. परंतु त्यांनी आपल्या सिद्धांतामध्ये कारणीमीमांसेवर भर दिला. तर रोस्टो यांनी आपल्या सिद्धांतामध्ये आर्थिक विकास विविध अवस्थांमधून कशाप्रकारे होतो याचे विवेचन केले आहे.

रोस्टोंनी आपला विकासाच्या अवस्थांचा सिद्धांत मार्क्स यांच्या 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो'ला प्रत्युत्तर म्हणून मांडला आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या सिद्धांताचा उल्लेख 'नॉन कम्युनिस्ट मेनिफोस्टो' असा केला आहे.

मार्क्स यांच्या मते भांडवलशाहीनंतर समाजवाद येईल आणि कालांतराने वर्गविहीन समाजरचना अस्तित्वात येईल. परंतु रोस्टोंच्या मते असे घडेलच असे नाही. त्यामुळे त्यांनी आपला वेगळा सिद्धांत मांडला. तसेच मार्क्स यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील विकासाची मूळ प्रेरणा व्यक्तिगत लाभ किंवा नफा होय असे प्रतिपादन केले. मात्र रोस्टोंनी केवळ नफा ही एकच प्रेरणा नसून त्यासाठी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशाप्रकारे अनेक घटक प्रेरक ठरतात असे मत व्यक्त केले. रोस्टोंच्या मते मार्क्स यांनी केवळ इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेच्या निरीक्षणावरून विकासाच्या अवस्थांचे विवेचन केले आहे. या उलट त्यांचे स्वतःचे

विवेचन अनेक देशांच्या अभ्यासावर आधारित आहे आणि म्हणून ते अधिक वास्तववादी स्वरूपाचे आहे.

**आर्थिक विकासाच्या अवस्था :**

डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो यांनी आपला आर्थिक विकासाच्या अवस्थांचा सिद्धांत त्यांच्या `The Process of Econimic Growth' या ग्रंथात मांडला. त्यांनी काही देशांचा जवळजवळ तीनशे वर्षांचा आर्थिक इतिहास अभ्यासून आर्थिक विकासाबाबत काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या मते कोणतीही अर्थव्यवस्था विकासाच्या पाच अवस्थांमधून जाते. या अवस्था कोणत्या, त्या का व कशा येतात, तसेच त्यांच्या कालखंड किती वर्षांचा असतो इत्यादी विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

रोस्टोंनी कालानुक्रमे विकासाच्या पाच अवस्था पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

१) परंपरागत समाज (The Traditional Society)

२) उड्डाणपूर्ण अवस्था (The Pre-condition to Take off)

३) उड्डाणावस्था (Take of stage)

४) परिपक्वावस्थेकडे वाटचाल (The Drive to Maturity)

५) उच्च उपभोग अवस्था (The age of High Massconsumption)

अशा प्रकारे वरील पाच अवस्थांमधून अर्थव्यवस्था जेव्हा जाते तेव्हा ती प्रगत अवस्थेला पोहोचते. अर्थात प्रत्येक नंतरची अवस्था ही अर्थव्यवस्थेच्या विकासाचा पुढचा टप्पा होय.

**I) परंपरागत समाज :**

रोस्टोंच्या मते अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक अवस्थेतील समाज पारंपरिक पद्धतीने जीवन जगत असतो. या अवस्थेत समाजाचा मुख्य व्यवसाय शेती असून ती परंपरागत पद्धतीने केली जाते. रोस्टोंनी या अवस्थेचे वर्णन 'न्यूटनपूर्व' अवस्था म्हणजे न्यूटनच्या पूर्वीचा कालखंड असे केले आहे. या कालखंडामध्ये उत्पादनाच्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे आमूलाग्र बदल होतील असे संशोधन झाले नव्हते. न्यूटनच्या शोधानंतर नवनवीन शोधामुळे उत्पादन क्षेत्रातसुद्धा क्रांतिकारक बदल झाले.

परंपरागत समाज अवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**(१) स्थितीशील अर्थव्यवस्था :**

या ठिकाणी स्थितीशील (Static) चा अर्थ अर्थव्यवस्थेत कोणत्याही स्वरूपाचे फार मोठे बदल होत नाहीत असा होतो. या अर्थव्यवस्थेत परंपरागत उत्पादनाच्या साहाय्याने व उपलब्ध साधनाद्वारे उत्पादन केले जाते. उदा. शेती

क्षेत्रामध्ये अधिक क्षेत्र लागवडीखाली आणून परंपरागत लागवड पद्धतीने उत्पादन वाढविले जाते. म्हणजे या अवस्थेत उत्पादन वाढते. परंतु या वाढीला एक विशिष्ट मर्यादा असते. उत्पादन तंत्रातसुद्धा थोडेफार बदल होतात. परंतु ते आमूलाग्र स्वरूपाचे नसतात.

**(२) ऊर्ध्व गतिशीलतेला मर्यादा :**

या अवस्थेमध्ये समाज रूढीप्रिय असल्यामुळे परिवर्तनाला फारसा वाव नसतो. लोक दैववादी असल्यामुळे प्रगत अवस्थेकडे जाण्याकरिता आवश्यक जिद्द, जिज्ञासू वृत्ती, वैज्ञानिक दृष्टी यांचा अभाव असतो. यामुळे या अवस्थेत आर्थिक विकासाची ऊर्ध्व गतिशीलता अत्यंत मर्यादित असते.

**(३) प्रभावी केंद्रीय सत्तेचा अभाव :**

या अवस्थेत केंद्रीय सत्ता असते परंतु तिचे प्रभावी नियंत्रण नसते. अर्थव्यवस्थेमध्ये भौगोलिक श्रमविभागणी झालेली नसते. त्यामुळे प्रत्येक देश हा स्वावलंबी असतो. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे या व्यवसायातील लोकांचे केंद्रीय सत्तेवर प्रभुत्व असते.

**(४) लोकसंख्या नियंत्रणाविषयी उदासीनता :**

या अवस्थेत लोकसंख्या वाढली असता युद्ध, रोगराई, नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे लोकसंख्या नियंत्रित होते अशी धारणा असते. लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी विशेष उपाय योजले जात नाही. थोडक्यात माल्थस् यांनी विशद केल्याप्रमाणे लोकसंख्या नियंत्रण होते.

अशा प्रकारे परंपरागत समाज अवस्थेची वैशिष्ट्ये सांगता येतील. एखादे राष्ट्र या अवस्थेत किती काळ राहील हे निश्चित सांगता येत नाही. विकसित देशामधील प्रगतीची जाणीव होऊन त्या दृष्टीने स्वतःच्या विकासाकरिता प्रयत्न करण्याची जेव्हा प्रबळ इच्छा निर्माण होईल तेव्हा या अवस्थेतील अर्थव्यवस्थेत विकास प्रक्रियेस आरंभ होतो.

**II) उड्डाणपूर्व अवस्था :**

परंपरागत समाज अवस्थेचा पुढचा टप्पा म्हणजे उड्डाणपूर्व अवस्था होय. जेव्हा एखाद्या देशातील लोकांमध्ये परंपरागत किंवा प्राथमिक अवस्थेतून बाहेर येऊन् स्वतःची प्रगती साधण्याची भावना तीव्र बनते तेव्हा तो देश उड्डाणपूर्व अवस्थेत प्रवेश करतो. या अवस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. यालाच परंपरागत समाजाचे उड्डाणपूर्व अवस्थेमध्ये स्थित्यंतर होण्यासाठी आवश्यक परिस्थिती असेही म्हणता येईल.

(१) उड्डाणपूर्व अवस्थेतील समाज दैववादी न राहता आर्थिक विकास घडवून

आणण्याच्या दृष्टीने प्रयत्नवादी बनतो.

(२) अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत किंवा बाहेरून मिळणाऱ्या विकासाच्या प्रबळ प्रेरणांवर या अवस्थेची गती अवलंबून असतो. या पूर्वीच्या अवस्थेत शेती क्षेत्रातील लोकांचे सत्तेवर प्रभुत्व राहिल्यामुळे दुर्लक्षिल्या गेलेल्या समाजातील उच्च स्तरातील वर्ग (Elite class of the society) या अवस्थेत प्रेरित होतो. हा वर्ग नफा मिळविण्याच्या हेतूने उत्पादन तंत्रात सुधारणा करण्याचे प्रयत्न करतो. तसेच स्वत:ची सामाजिक प्रतिष्ठा वाढावी, जीवनमान सुधारावे, आर्थिक आणि राजकीय सत्तेवर प्रभुत्व मिळवावे या उद्देशानेसुद्धा हा वर्ग प्रेरित होतो. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.

(३) उड्डाणपूर्व अवस्थेमध्ये शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. या अवस्थेत वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविणे, उद्योगक्षेत्रात निर्माण होणाऱ्या शेतीसाठी साहाय्यक, विविध यंत्रे, अवजारे, खते, इत्यादी वस्तूंच्या उत्पादनाची मागणी करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे, शेतीक्षेत्रात निर्माण होणाऱ्या आधिक्यातून भांडवल गुंतवणूक करणे या सर्व दृष्टीने शेतीक्षेत्राला एक वेगळे स्थान प्राप्त होते.

(४) उद्योग क्षेत्र आणि सेवाक्षेत्रात भांडवल गुंतवणूक करून या क्षेत्राचा विस्तार केला जातो आणि शेती क्षेत्रावरील श्रमाचा भार कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

(५) सामाजिक दर्जाच्या पारंपरिक कल्पना बदलून वैयक्तिक कार्यक्षमतेला प्राधान्य दिले जाते.

(६) उत्पन्नाचे वाटप अशा पद्धतीने होते की, ज्यामुळे विविध प्रकारची सामाजिक गुंतवणूक शक्य होईल.

(७) लोकसंख्या वाढीपेक्षा भांडवल गुंतवणुकीचा दर अधिक होण्याची प्रवृत्ती असते.

(८) ज्या लोकांमध्ये उपक्रमशीलता आहे आणि विकासासाठी अभिनव प्रयोग करण्याची इच्छा व क्षमता आहे, अशा व्यक्तींना अर्थ साहाय्य करणे व प्रोत्साहन देणे अशा प्रकारचे सामाजिक वातावरण निर्माण होते.

(९) परंपरागत किंवा प्राथमिक अवस्थेमध्ये जमीनदारवर्गाचे सत्तेवर असलेले प्रभुत्व या अवस्थेत नष्ट होऊन नवीन नेतृत्वाचा उदय होतो. या नेतृत्वाकडून देशामध्ये रस्ते, रेल्वे, दळणवळणाची व संदेशवहनाची साधने अशा प्रकारच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक मूलभूत सेवांची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक क्षेत्रातून गुंतवणूक केली जाते.

(१०) अशा देशामध्ये कर्जाच्या स्वरूपात किंवा मदतीच्या रूपाने विदेशी भांडवलाची आयात करण्यासाठी भरपूर वाव असतो. विदेशी भांडवलाच्या आयातीतून तांत्रिक प्रगतीचे प्रयत्न केले जातात. उत्पादनासाठी आवश्यक यंत्रसामग्रीच्या निर्मितीवर भर दिला जातो. म्हणजेच या देशातील विकासाला गती देण्याचे महत्त्वाचे कार्य विदेशी भांडवलाद्वारे केले जाते. रशिया, अमेरिका, कॅनडा इत्यादी विकसित राष्ट्रांमध्ये विदेशी भांडवलाने उड्डाणवस्थेकडे वाटचाल करण्याकरिता महत्त्वाची भूमिका पार पाडली आहेच. या अवस्थेमध्ये अर्थव्यवस्थेतील अंतर्गत बचती पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी आणि भविष्यात समाजामध्ये वाढत्या प्रमाणावर बचत क्षमता निर्माण करण्यासाठी विदेशी भांडवलाचे साहाय्य घेतले जाते.

(११) विदेशी व्यापारातील प्रतिकूलता कमी करण्यासाठी आयात कमी करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून आयात पर्यायीकरणाचे धोरण स्वीकारले जाते.

(१२) या अवस्थेत देशामध्ये आरोग्यविषयक सेवा उपलब्ध केल्यामुळे मृत्युदरात घट होते. सरासरी आयुर्मान वाढते. मात्र दुसऱ्या बाजूने जन्मदर जवळजवळ पूर्वीइतकाच राहतो. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा दर अधिक असतो. ज्या देशामध्ये अगोदरच लोकसंख्या अधिक आहे अशा देशांच्या अर्थव्यवस्थेवर वाढत्या लोकसंख्येचा भार पडतो. तर ज्या देशामध्ये लोकसंख्या मर्यादित असते अशा देशांमध्ये वाढती लोकसंख्या आर्थिक विकासास साहाय्यक ठरते.

अशा रीतीने उड्डाणपूर्व अवस्थेची वैशिष्ट्ये सांगता येतील. या अवस्थेचा काळ निश्चित सांगता येणार नाही. देशातील लोकांची विकासाची इच्छा, विविध क्षेत्रातील प्रेरणा आणि देशाचे नेतृत्व इत्यादी घटकांवर या अवस्थेचा काळ किती वर्षाचा असेल हे अवलंबून असते. काही देशांच्या बाबतीत हा काळ शंभर वर्षांचाही असू शकतो.

**III) उड्डाणावस्था :**

आर्थिक विकासाची ही तिसरी अवस्था होय. उड्डाणावस्थेची तुलना विमानाच्या उड्डाणाच्या प्रक्रियेशी केली जाते. ज्याप्रमाणे विमानास आकाशामध्ये उड्डाण करण्यापूर्वी धावपट्टीवर एक विशिष्ट गती घ्यावी लागते त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेला प्रत्यक्ष आर्थिक विकासाची झेप घेण्यापूर्वी काही किमानगती मिळणे आवश्यक असते.

उड्डाणावस्थेची व्याख्या रोस्टो यांनी पुढीलप्रमाणे केली आहे, "उड्डाणावस्था म्हणजे असा कालखंड की ज्यामध्ये भांडवल गुंतवणुकीच्या दरात वृद्धी होऊन वास्तव दरडोई उत्पादनात वाढ होते. तसेच उत्पादन तंत्रामध्ये

आणि वितरणामध्ये सुद्धा आमूलाग्र बदल घडून येतो. या बदलामुळे अर्थव्यवस्थेत परत भांडवल गुंतवणूक वाढून दरडोई उत्पादन वाढण्याची प्रवृत्ती आढळून येते.''

`` The take off is defined as the interval during which the rate of investment increases in such a way that the real out put percapita rise and this initial increase carries with it radical changes in production techniques and the despotion of income flows which perpetuate the new scale of investment and containing there by rising trend in percapita out put."

उड्डाणावस्थेचा कालखंड साधारणपणे २० ते ३० वर्षांचा असतो. या अवस्थेत अर्थव्यवस्थेत अशाप्रकारचे बदल घडून येतात की, ज्यामुळे आर्थिक विकास हा या अर्थव्यवस्थेचा स्थायिभाव बनतो. मात्र अशा प्रकारची गती मिळण्यासाठी अर्थव्यवस्थेला प्रबळ प्रेरणा मिळणे आवश्यक असते. अशा प्रकारची प्रबळ प्रेरणा देणारे घटक प्रत्येक अर्थव्यवस्थेत भिन्न असू शकतात. जसे अमेरिकेमध्ये १८४० आणि कॅनडा व रशियामध्ये १८६० मध्ये विदेशी भांडवलाच्या आयातीतून उड्डाणावस्था प्राप्त झाली. तर स्वीडिश टिंबरला १८६० मध्येच ब्रिटन आणि फ्रान्सची बाजारपेठ मिळाल्यामुळे या उद्योगाची भरभराट होऊन या देशाच्या अर्थव्यवस्थेला उड्डाणावस्था प्राप्त झाली. या शिवाय राजकीय क्रांती, आर्थिक संस्थांच्या रचनेतील बदल, तांत्रिक शोध, राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप हे घटक सुद्धा अर्थव्यवस्थेला प्रबळ प्रेरणा देतात.

रोस्टो यांनी उड्डाणावस्थेची प्रमुख तीन लक्षणे दिली आहेत.

**१. गुंतवणुकीचा दर अधिक :**

या काळात देशातील भांडवल गुंतवणुकीचा दर राष्ट्रीय उत्पन्नाच्या दहा टक्के पर्यंत वाढतो. या पूर्वीच्या अवस्थेत हा केवळ पाच टक्के असतो. गुंतवणुकीचा दर वाढल्याने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. ही वाढ लोकसंख्येतील वाढीपेक्षा अधिक असते. गुंतवणूक जितकी जास्त होईल तितका विकासाचा वेग अधिक असतो.

**२. अग्रणी क्षेत्र :**

यालाच प्रधानक्षेत्रसुद्धा म्हणतात. देशामध्ये काही उद्योग असे असतात की ज्यांचा विकासाचा दर इतर उद्योगांच्या तुलनेत अधिक असतो. अशा उद्योगांना प्राधान्य देऊन त्यांच्या विकासावर आणि विस्तारावर भर दिला जातो. यातून काही उद्योग हे एकूण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे नेतृत्व

करतील. या उद्योगांनाच 'अग्रणी क्षेत्र (Leading sector)' असे म्हणतात. उदा. ब्रिटनमध्ये वस्त्रोद्योग आणि रशिया व जर्मनीमध्ये रेल्वे या उद्योगांच्या विकासातून आर्थिक विकासास गती मिळाली.

**३. संस्थात्मक रचनेत परिवर्तन :**

उड्डाणावस्थेमध्ये विकासाच्या प्रबळ प्रेरणा निर्माण झाल्यास त्यांनी योग्य प्रतिसाद देणारी, त्यांचा योग्य तो उपयोग करून आर्थिक विकासास चालना देणारी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संस्थांची रचना असणे आवश्यक असते. अशा प्रकारचे परिवर्तन या संस्थांच्या रचनेमध्ये होणे अपरिहार्य असते. या परिवर्तनामुळेच देशामध्ये भांडवल उभारणी होण्यासाठी आणि भांडवलाची विविध उद्योगात गुंतवणूक होण्यासाठी जपानने अशाच प्रकारे संस्थात्मक रचनेत परिवर्तन घडवून आर्थिक उड्डाणाची अवस्था प्राप्त केली.

थोडक्यात या अवस्थेमध्ये शेती, उद्योग आणि सेवा या सर्व क्षेत्रात विकासास गती मिळते. शेतीक्षेत्रातील निर्वाहासाठी शेती या दृष्टिकोनाऐवजी व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण होतो. आधुनिक तंत्राचा वापर करण्यास आरंभ होतो.

उद्योग क्षेत्रामध्ये भांडवल गुंतवणूक वाढते. झपाट्याने औद्योगिकरणास सुरुवात होते. रोजगार पातळीत वाढ होते. तसेच सेवाक्षेत्रामध्येसुद्धा वाहतूक दळणवळणाच्या सोयी निर्माण करण्यावर भर दिला जातो. अशा प्रकारे या अवस्थेत राष्ट्र आर्थिक विकासासाठी स्वयंपूर्ण बनते.

**उड्डाणावस्थेतील भांडवल उभारणीचे मार्ग :**

१. काही देशांमध्ये समाजातील बचत क्षमता असणाऱ्या वर्गाने भांडवल पुरविलेले दिसून येते. उदा. इंग्लंडमध्ये सरंजामवर्गाने उद्योगांच्या विकासासाठी भांडवल पुरवठा केला.

२. अर्थव्यवस्थेत चलनवाढ करूनसुद्धा भांडवल उभारणी केली जाते. अमेरिका, जपान या देशांमध्ये या मार्गाचा अवलंब करून भांडवल उभारणी केली गेली.

३. बँकाद्वारे पतनिर्मिती करून अर्थव्यवस्थेमध्ये विविध क्षेत्रांना भांडवल पुरवठा केला जातो.

४. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना मिळालेल्या नफ्यातून पुन्हा गुंतवणूक करून भांडवलाची गरज पूर्ण करता येते.

५. निर्यात वाढ आणि आयात कपात करूनसुद्धा परकीय चलन

प्राप्तीद्वारे भांडवल उपलब्ध होऊ शकते.

६. विदेशी भांडवल, कर्ज किंवा मदतीद्वारे भांडवल उभारले जाते.

रोस्टोंनी साधारणपणे विविध देशामधील उड्डाणावस्थेचा कालखंड पुढील तक्त्यांमध्ये दिला आहे.

**देश आणि उड्डाणावस्थेचा कालखंड :**

| देश | उड्डाणावस्थेचा कालखंड | देश | उड्डाणावस्थेचा कालखंड |
|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | १७८३-१८०२ | रशिया | १८९०-१९१४ |
| फ्रान्स | १८३०-१८६० | कॅनडा | १८९६-१९१४ |
| बेल्जियम | १८३३-१८६० | अर्जेन्टिना | १९३५ |
| अमेरिका | १८४३-१८६० | तुर्कस्थान | १९३७ |
| जर्मनी | १८५०-१८७३ | भारत | १९५२ |
| स्वीडन | १८६८-१८९० | चीन | १९५२ |
| जपान | १८७८-१९०० | | |

*Source : W. W. Rostow, The stage of Economic Growth P. 38*

भारतामध्ये उड्डाणावस्थेला १९५२ पासून सुरुवात झाली असे रोस्टोंनी सांगितले आहे. तसेच तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर भारतीय अर्थव्यवस्था उड्डाणावस्था पूर्ण करील अशी अपेक्षा होती. परंतु अजूनही उड्डाणपूर्व अवस्थेची काही लक्षणे भारतामध्ये दिसून येतात. मात्र काही उद्योगांनी उड्डाणावस्था प्राप्त केली आहे असेही दिसून येते.

**IV. परिपक्वावस्थेकडे वाटचाल :**

उड्डाणावस्थेमध्ये आर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी आवश्यक उद्योगांच्या विकासावर अधिक भर दिला जातो. जेव्हा या मूलभूत उद्योगांच्यापुढे जाऊन औद्योगिक प्रगती साधण्याची क्षमता अर्थव्यवस्थेत निर्माण होते तेव्हा त्या अर्थव्यवस्थेची परिपक्वावस्थेकडे वाटचाल सुरू झाली असे म्हणता येईल. या अवस्थेमध्ये भांडवल गुंतवणूक दर दहा ते वीस टक्के इतका असतो. उद्योग क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच संशोधनाची क्षमतासुद्धा निर्माण होते, उत्पादनवाढीचा वेग लोकसंख्यावाढीपेक्षा खूपच अधिक असतो. उत्पादन वाढल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये वस्तूंची निर्यात वाढते. आयात पर्यायीकरणाद्वारे देशातच विविध

आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंचे उत्पादन केल्या जाते. देशातील लोकांना औद्योगिकरण आणि आधुनिकीकरण यापासून होणारे फायदे लक्षात आल्यामुळे लोकांमध्ये नवीन बदल स्वीकारण्याची प्रवृत्ती निर्माण होते.

उड्डाणावस्था सुरू झाल्यापासून ते परिपक्वावस्था पूर्ण होईपर्यंतचा एकूण कालखंड साधारणपणे ६० वर्षांचा असतो. असे रोस्टोंचे मत आहे.

रोस्टोंनी काही देशांची परिपक्वावस्थेची वर्ष पुढीलप्रमाणे दिली आहेत.

| **देश** | **परिपक्वावस्थेचे वर्ष** | **देश** | **परिपक्वावस्थेचे वर्ष** |
|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | १८५० | स्विडन | १९३० |
| अमेरिका | १९०० | जपान | १९४० |
| जर्मनी | १९१० | रशिया | १९५० |
| फ्रान्स | १९१० | कॅनडा | १९५० |

*Source : W. W. Rostow, The stage of Economic Growth P. 59*

**V. उच्च उपभोग अवस्था : या अवस्थेची वैशिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील.**

१. लोकांचे दरडोई उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढते. त्यामुळे लोकांची आवश्यक वस्तू बरोबरच चैनीच्या वस्तू, टिकाऊ वस्तू थोडक्यात राहणीमान वाढविणाऱ्या वस्तूंची मागणी वाढते.

२. उत्पादनाच्या क्षेत्रात भांडवली वस्तू उत्पादनाच्या तुलनेत उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर जास्त भर दिला जातो.

३. औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्येचा रोजगारासाठी शहराकडे ओघ वाहात जातो. त्याचबरोबर शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे पूर्वी जो निरक्षर व अकुशल श्रमिकांचा पुरवठा अधिक होता त्याऐवजी आता सुशिक्षित व कुशल श्रमिकांचे आणि तज्ज्ञ लोकांचे प्रमाण वाढते.

४. अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होतो.

५. या अर्थव्यवस्थेत उत्पादन तंत्रात सुधारणा करणे, आधुनिकीकरण करणे यास वाव असला तरी उत्पादक वर्ग याबाबतीत फारसा उत्सुक नसतो.

६. कल्याणकारी राज्याची कल्पना प्रभावी ठरते आणि सामाजिक कल्याण व सुरक्षिततेला जास्त महत्त्व दिले जाते.

सर्वप्रथम अमेरिकेत १९२० मध्ये उच्चउपभोग अवस्थेला प्रारंभ झाला. त्यानंतर इंग्लंडमध्ये १९३० तर जपान व पश्चिम युरोपमध्ये १९५० च्या दशकात या अवस्थेला प्रारंभ झाला असे मानले जाते.

मूल्यमापन : रोस्टो यांनी आर्थिक विकासाच्या ज्या अवस्थांचे विश्लेषण केले आहे त्यावर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आक्षेप घेतलेले दिसून येतात. प्रमुख आक्षेप पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. हिगिन्स यांच्या मते, रोस्टोंनी सांगितल्याप्रमाणे आर्थिक विकास हा पाच अवस्थातून होतो. याला कोणत्याही देशाच्या आर्थिक इतिहासामध्ये आधार नाही. अशाप्रकारचे विकासाचे चाकोरीबद्ध विश्लेषण हे काल्पनिक विश्लेषण होय.

२. मेयर यांच्या मते, रोस्टोंनी ज्या पाच अवस्था दिल्या आहेत त्याप्रमाणे एखाद्या देशाचा विकास झाला असे क्षणभर मान्य केले तरी अशा अपवादात्मक स्थितीला नियम ठरविणे म्हणजे या अवस्थांना अवाजवी महत्त्व देणे होय. मेयरच्या मते रोस्टोंनी दिलेल्या अवस्थांचा क्रमसुद्धा तोच राहील असे नाही (...... A country may attain a later stage of developement without first having passed through an earliar stage may be skipped......)

Meier, Leading Issuses in Economic Developement, ed II P. 93-94 I.

३. रोस्टोंनी दिलेल्या पाच अवस्थांच्या वैशिष्ट्यांमध्ये साम्य दिसून येते. उदा. भांडवल गुंतवणूक दरात वाढ, किमान एका उद्योगाचा विकास अधिक वेगाने होऊन त्याचा विकासदर अधिक असणे किंवा राजकीय व सामाजिक स्थितीमध्ये आवश्यक बदलांची आवश्यकता इत्यादी वैशिष्ट्ये उड्डाणपूर्व अवस्था, उड्डाणावस्था किंवा त्यानंतरच्या अवस्थेतसुद्धा कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. अशावेळी कोणती अवस्था कुठे सुरू झाली आणि कुठे संपली हे निश्चितपणे सांगता येत नाही.

४. रोस्टोंनी आर्थिक विकास होताना प्रारंभी प्राथमिक क्षेत्राचा विकास होतो असे मत मांडले आहे. परंतु अनेक अर्ध-विकसित देशांमधून कृषि व उद्योग क्षेत्राचा विकास एकाच वेळी घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. तर काही देशांनी उद्योगक्षेत्राच्या विकास व विस्तारातूनसुद्धा विकासास आरंभ केल्याचे दिसून येते.

५. प्रा. केर्नक्रॉसच्या मते, अग्रणी क्षेत्राची निर्मिती आणि पुढील व्यवस्था यातील संबंधच कळत नाही. तसेच अग्रणी क्षेत्र उद्योगातूनच असले पाहिजे म्हणणे बरोबर होणार नाही. ते शेती क्षेत्रातूनसुद्धा असू शकेल.

रोस्टोंच्या विकासाच्या अवस्थांच्या विवेचनावर वरीलप्रमाणे टीका करण्यात आली असली तरी विकसनशील अर्थव्यवस्थांच्या विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास करताना उड्डाणवस्थेची कल्पना उपयुक्त ठरते. विशेषत: भांडवल उभारणीचा

विशिष्ट वेग आणि प्रधान किंवा अग्रणी क्षेत्राची भूमिका हे घटक विचारात घ्यावेच लागतात.

अग्रणी क्षेत्र म्हणून कोणते क्षेत्र असले पाहिजे याविषयी जरी वाद असला तरी आर्थिक विकासाला गती देण्यासाठी अशा प्रकारच्या क्षेत्राची आवश्यकता असतेच. शिवाय अर्थव्यवस्थेला परिपक्वावस्थेकडे वाटचाल करण्याकरिता सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात संस्थात्मक परिवर्तनाची आवश्यकता असते. हे रोस्टोंचे विचार संबंधित देशांना मार्गदर्शक ठरतात.

**संतुलित विकास विरूद्ध असंतुलित विकास**

(Balance Versus Unbalanced Growth)

विकसित देशांचे प्रमुख उद्दिष्ट स्थैर्य राखून विकास करणे हे असते. अर्ध-विकसित देशांच्या बाबतीत आर्थिक विकासामध्ये प्रारंभी दारिद्र्य निर्मूलन या उद्दिष्टावर भर दिला जातो. अशा प्रकारे या दोन अर्थव्यवस्थांची भिन्न उद्दिष्टे असल्यामुळे त्यांची विकासाची व्यूहरचनासुद्धा भिन्न असते. त्यामुळे अर्ध-विकसित देशांच्या संदर्भात आर्थिक विकासाच्या सिद्धांताची मांडणी स्वतंत्रपणे करण्यात आली आहे. या विकासाच्या सिद्धांतातून अर्ध-विकसित देशांच्या विकासाविषयी संतुलित विकास आणि असंतुलित विकास तसेच धीम्या गतीने विकास आणि जोराच्या धक्क्याने विकास. अशा प्रकारे विविध विचारप्रवाह मांडण्यात आले आहेत.

रोझेन्स्टीन रोडान, हार्वे लायबेन्स्टाईन, रॅग्नर नर्क्स, लेविस व ॲलिन यंग या अर्थशास्त्रज्ञांनी अविकसित देशासाठी संतुलित विकासाच्या तत्त्वाची शिफारस केली आहे. तर पॉल स्ट्रीटेन, हर्षमन, ए. डब्ल्यू. सिंगर आणि डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकास लवकर व्हावयाचा असेल तर या देशांना असंतुलित विकासाचे तत्त्व फायदेशीर आहे असे मत मांडले आहे.

**संतुलित विकास** (Balance Growth) :

विकसनशील देशाचा विकास साधण्यासाठी काही अर्थशास्त्रज्ञांनी 'संतुलित विकासाच्या व्यूहरचने'ची शिफारस केली आहे. 'संतुलित विकास' या संकल्पेनेच्या अर्थाविषयी विविध अर्थतज्ज्ञांमध्ये मतभिन्नता दिसून येते. सॅम्युअलसनच्या मते, "संतुलित विकास म्हणजे सर्व तऱ्हेच्या भांडवली साठ्यात निश्चित दराने वाढ होणे होय."

तर काहींच्या मते, अर्थव्यवस्थेमध्ये काही विशिष्ट क्षेत्रांना प्राधान्य न देता एकाच वेळी विविध क्षेत्रातील उद्योगांमध्ये भांडवल गुंतवणूक करून हे उद्योग परस्परांच्या विकासाकरिता सहायक ठरतील व एकूण अर्थव्यवस्थेच्या विकासास

## प्रकरण २

# विकास प्रक्रियेतील घटक

(Factors in the Development Process)

प्रकरण चौथे

---

**नैसर्गिक साधनसंपत्ती** (Natural Resources)

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये विविध घटक सहाय्यक ठरत असतात. ढोबळमानाने या घटकांचे नैसर्गिक साधने आणि मानवनिर्मित साधने असे वर्गीकरण करता येईल.

नैसर्गिक साधनसंपत्ती म्हणजे निसर्गाने दिलेली देणगी होय. नैसर्गिक साधनांमध्ये शेतजमीन, हवामान, पाण्याची उपलब्धता, खनिज संपत्ती, जंगले, समुद्र संपत्ती आणि देशाचे नैसर्गिक स्थान इत्यादींचा समावेश होतो. मानवनिर्मित घटकांमध्ये भांडवल, तंत्रज्ञान, वाहतुक दळणवळणाची साधने, विविध उपऱ्या सोयी इत्यादी घटकांचा समावेश होतो.

ज्या देशामध्ये वरील घटकांची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर असते त्या देशाचा आर्थिक विकास जलदगतीने होतो.

नैसर्गिक साधनसंपत्तीचे नवीकरण साधने आणि अनवीकरण साधने असे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

**१. नवीकरण साधने** (Renewable Resources) : काही नैसर्गिक साधने अशा प्रकारची असतात की जी पुन्हा पुन्हा निर्माण होऊ शकतात. नवीकरण साधनांची व्याख्या पुढीलप्रमाणे देता येईल.

``The term Renewable Resources used for any resource which is capable of being replenished, in part or whole, by natural means" (Dictonary of Economics - C.S. Nagpal)

"नवीकरण साधने म्हणजे अशा प्रकारची साधने की ज्यांची नैसर्गिक प्रक्रियेतून अंशतः किंवा पूर्णतः पुनःपूर्ती होते." उदाहरणार्थ -समुद्रातील मासे, जंगले, पशुधन इत्यादी.

**२. अनवीकरण साधने** (Non-Renewable Resources) : काही नैसर्गिक साधने अनवीकरण स्वरूपाची असतात. यांची व्याख्या पुढीलप्रमाणे देता येईल.

``The term Non-Renewable resources is used for any resource

which exists in a limited stock and cannot be replenished other than by recycling."

"अनवीकरण साधने ही साठ्याच्या स्वरूपात मर्यादित प्रमाणात उपलब्ध असतात. या साधनांची पुनश्चक्रणाशिवाय पुन:पूर्ती होत नाही.

ही साधने निश्चित प्रमाणात उपलब्ध असतात. त्यांचा जसजसा उपयोग केला जातो तसतसे त्यांचे प्रमाण कमी होत जाते. उदा. खनिज तेलाचे साठे, कोळसा, नैसर्गिक वायू, इतर खनिजे, धातू इत्यादी.

एखाद्या देशाचा आर्थिक विकास त्या देशात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो. अर्थातच नैसर्गिक संपत्तीची उपलब्धता दोन पद्धतीने विचारात घ्यावी लागेल. एक म्हणजे एका विशिष्ट वेळी त्या देशात नैसर्गिक साधनसंपत्तीचे उपलब्ध असलेले प्रमाण. त्या विशिष्ट काळात देशामध्ये नैसर्गिक साधनांचा शोध घेण्यासाठीचे प्रयत्न किती घेतले आहेत यावर आणि त्या साधनांचा उपयोग करण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानावर अवलंबून असते.

दुसरे म्हणजे भविष्यात या देशामध्ये नैसर्गिक साधनांची उपलब्धता किती प्रमाणात होऊ शकते याचासुद्धा विचार करावा लागेल. कारण देशात जर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संदर्भात सतत संशोधन करणे चालू असेल आणि त्या साधनांचा जास्तीत जास्त चांगला उपयोग कसा करता येईल. या विषयीचे ज्ञान संपादन करण्याचे प्रयत्न चालू असतील तर येणाऱ्या काळात आजच्यापेक्षा आहे त्या नैसर्गिक साधनांच्या उपलब्धतेच्या प्रमाणात वाढ होऊ शकते किंवा नवीन साधनांची भर पडू शकते. उदा. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संदर्भात जर आपण स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वीची स्थिती आणि आजची परिस्थिती यामध्ये तुलना केली तर आपणास निश्चितपणे असे आढळून येते की, त्या काळापेक्षा आज भारतामध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये कितीतरी भर पडली आहे.

अशा प्रकारे आपण एका विशिष्ट काळात एखाद्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेचा विचार केला असता ही संकल्पना स्थित स्वरूपाची आहे असे दिसून येते. मात्र दीर्घ काळाचा विचार केल्यास ही संकल्पना गतिमान असलेली आढळून येते.

नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये दीर्घकाळात गतिमानता असली तरी कोणत्याही देशात ही साधने अमर्याद स्वरूपात उपलब्ध असतात असे मात्र नाही. भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात जरी काही नैसर्गिक साधनांच्या

संदर्भात पुरवठ्याचा वक्र उर्ध्वगामी दिसत असला तरी ती कायम उर्ध्वगामीच राहील असे म्हणता येणार नाही आणि म्हणूनच आपल्याला आर्थिक विकासाकरिता सुप्त साधन संपत्तीचा शोध घेऊन जास्तीत जास्त साधन संपत्ती उपलब्ध करणे हे जसे महत्त्वाचे आहे तसेच उपलब्ध संपत्तीचा योग्य वापर करणे आणि अधिक कार्यक्षमतेने वापर करणे हे त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे हे समजून घेतले पाहिजे. तरच आपल्याला या साधनाद्वारे योग्य प्रकारे आर्थिक विकास साधता येईल.

## लोकसंख्या (Population)

**लोकसंख्या आणि आर्थिक विकास :** लोकसंख्या आणि आर्थिक विकास यामधील संबंध कोणत्या प्रकारचा असतो हे जाणून घ्यावयाचे असेल तर संबंधित देशातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय इत्यादी परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल. पाश्चात्य देशामध्ये १९ व्या शतकाच्या सुरुवातीला लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे त्या देशांच्या आर्थिक विकासाला बरीच मदत झाल्याचे दिसून येते. कारण त्या देशात भांडवल पुरवठ्याच्या मानाने श्रमाचा पुरवठा अल्प होता. अशा परिस्थितीमध्ये लोकसंख्येतील वाढीमुळे श्रम पुरवठा झाल्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढला. विकसित देशांच्या संदर्भात अशा प्रकारची परिस्थिती आढळत असली तरी अर्धविकसित देशांच्या बाबतीत लोकसंख्या व आर्थिक विकास यातील संबंध थोडे वेगळ्या स्वरूपाचे असलेले अनुभवास येते. एखाद्या देशातील लोकसंख्या ही आर्थिक विकासास अनुकूल असेल की प्रतिकूल असेल हे या लोकसंख्येची संख्यात्मक व गुणात्मक स्थिती यावर विसंबून असते. शिवाय लोकसंख्या आणि आर्थिक विकास यातील संबंधांचा विचार करून चालणार नाही तर आर्थिक विकासामुळे लोकसंख्येच्या रचनेवरसुद्धा संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने परिणाम होत असतो हेही लक्षात घेतले पाहिजे.

एखाद्या देशाचा आर्थिक विकास त्या देशातील लोकसंख्या आणि नैसर्गिक साधनसंपत्ती या दोन घटकांवर प्रामुख्याने अवलंबून असतो. काही वर्षांपूर्वी अर्थशास्त्रज्ञ नैसर्गिक साधनसामुग्रीच्या उपलब्धतेला विशेष महत्त्व देत असत. तुलनेने लोकसंख्येचे महत्त्व कमी मानण्याची तेव्हा प्रवृत्ती होती. परंतु जेव्हा नैसर्गिक साधनसामुग्री विपुल असूनही अनेक देशांमध्ये भीषण दारिद्र्य व मागासलेपणा असल्याचे अनुभवास आले तेव्हा लोकसंख्या हा घटकसुद्धा महत्त्वाचा असल्याचे मानण्यात येऊ लागले. कारण नैसर्गिक साधनसामुग्रीचा योग्य उपयोग बऱ्याच प्रमाणात लोकसंख्येचा आकार, रचना

तसेच लोकांची उपक्रमशीलता, कार्यक्षमता तसेच लोकांमधील तांत्रिक ज्ञानाची पातळी इत्यादींवर अवलंबून असते हे स्पष्ट झाले. म्हणूनच अलीकडील काळात भूमी, भांडवल या घटकांबरोबरच श्रम, संघटन आणि उपक्रमशीलता या घटकांनाही अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ही तिन्ही उत्पादक साधने व देशातील लोकसंख्येचा आकार आणि गुणात्मक दर्जा यांच्यात घनिष्ठ संबंध आहे.

**लोकसंख्या आणि श्रमपुरवठा :** श्रम हा उत्पादनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. श्रमाचा पुरवठा हा त्या देशातील लोकसंख्येवर अवलंबून असतो. श्रमाशिवाय उत्पादन अशक्य असते. त्यामुळे श्रमाचा पुरवठा जसजसा वाढेल तसतसे त्या देशातील एकूण उत्पादन वाढते. विकसित देशामध्ये लोकसंख्येतील वाढीमुळे आर्थिक विकासास चालना मिळाली असे अनुभवास आले आहे. श्रम पुरवठ्यातील वाढीच्या विकसित अर्थव्यवस्थेत जसा विकासाच्या संदर्भात अनुकूल परिणाम झाल्याचे दिसते तसा भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये दिसून येत नाही.

लोकसंख्या आणि श्रमपुरवठा यामध्ये कशा प्रकारचा संबंध आहे हे पाहिले असता असे दिसून येते की, ज्या देशांमध्ये जन्मदर अधिक असतो त्या ठिकाणी लहान मुलांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. उदा. भारतामध्ये १९८१ च्या जनगणनेप्रमाणे १४ वर्षांखालील मुलांचे प्रमाण ४० टक्के आहे. त्यामुळे भारताला बालवयाचा देश असेही म्हणतात. याचा अर्थ जन्मदर अधिक असताना लोकसंख्या वाढते यात शंका नाही मात्र ज्या प्रमाणात लोकसंख्येत वाढ होते त्या प्रमाणात श्रमपुरवठ्यात मात्र वाढत होत नाही. याउलट अनुत्पादक किंवा कर्त्या लोकसंख्येवर विसंबून असणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होते व उपलब्ध श्रमशक्तीवरच त्याचा भार पडतो. यामुळे उद्योग संस्था, श्रमिकांची कार्यक्षमता, बचत क्षमता आणि भांडवल उभारणीचा वेग इत्यादी घटकांवर प्रतिकूल परिणाम होतो. शिवाय जन्मदर अधिक असल्यामुळे या देशातील स्त्रियांना बालसंगोपनाकडेच अधिक लक्ष देणे आवश्यक असते. त्यामुळे स्त्रियांची कार्यक्षमता उत्पादन क्षेत्रासाठी उपलब्ध होत नाही. अशा प्रकारे लोकसंख्या वाढली म्हणजे श्रमपुरवठ्यातही वाढ होते असे नाही. शिवाय लोकसंख्या वाढीमुळे श्रमपुरवठ्यात वाढ झाली तरी केवळ श्रमिकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे अर्धविकसित देशात अमर्याद श्रमपुरवठ्याची स्थिती निर्माण होऊन प्रच्छन्न बेकारीचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे जोपर्यंत उद्योग क्षेत्राचा व सेवा क्षेत्राचा विकास

व विस्तार होत नाही तोपर्यंत प्राथमिक क्षेत्रावरील अतिरिक्त श्रमपुरवठ्याचा भार कमी होणार नाही. आर्थर लेविस यांनी अमर्याद श्रमपुरवठ्याद्वारे अर्धविकसित देशामध्ये भांडवल निर्मिती करून आर्थिक विकास साध्य करता येईल आणि अमर्याद श्रमपुरवठ्याची आपत्ती ही इष्टापत्ती मध्ये रूपांतरित करता येईल असे दाखवून दिले आहे.

**पर्याप्त लोकसंख्येचा सिद्धांत** (Theory of optimum population) :

**पूर्वेतिहास :** लोकसंख्येविषयी अनेक विचारवंतांनी विचार मांडले आहेत. प्लेटो यांनी लोकसंख्येच्या नियोजनाची आवश्यकता आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथात प्रतिपादन केली होती. त्यानंतर १७ व्या शतकामध्ये व्यापारवादी अर्थशास्त्रज्ञांनी लोकसंख्या वाढली म्हणजे श्रमिकांचा पुरवठा वाढतो व त्यामुळे वेतनदर कमी होऊन उत्पादन खर्च कमी होतो. त्यामुळे वस्तूंच्या किमती कमी होऊन वस्तूंची निर्यात वाढते आणि राष्ट्र आर्थिकदृष्ट्या संपन्न होते असे विचार मांडलेले दिसून येतात. थोडक्यात, लोकसंख्या हा आर्थिक विकासातील अडसर आहे किंवा लोकसंख्या वाढीतून अर्थव्यवस्थेत विविध समस्या निर्माण होऊ शकतात याचा फारसा विचार रॉबर्ट माल्थसपर्यंत केलेला दिसून येत नाही.

१७९३ मध्ये गॉडविनने राज्यसंस्था हीच लोकांच्या दु:खाला व दारिद्र्याला कारणीभूत असते असे प्रतिपादन केले होते. त्या काळी इंग्लंडमध्ये अन्नधान्याच्या किमती वाढत होत्या, बेकारी, दारिद्र्य इत्यादी समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले होते. याचे खरे कारण वाढती लोकसंख्या आहे हे माल्थस यांना जाणवत होते. त्यामुळे १७९८ मध्ये माल्थस यांनी ``An essay on the Principles of Population" या ग्रंथामध्ये आपला सिद्धांत मांडला. त्यामुळे लोकसंख्येच्या समस्येचे शास्त्रीय विश्लेषण करण्याचे श्रेय माल्थस यांना दिले जाते. या सिद्धांतामधून त्यांनी लोकसंख्या वाढीमुळे अर्थव्यवस्थेवर अनेक आपत्ती ओढवण्याची शक्यता प्रतिपादन केली. परंतु माल्थस यांनी त्यांच्या सिद्धांतातून लोकसंख्येच्या प्रश्नाचा एका बाजूनेच विचार केला असून त्यांच्या सिद्धांतावर निराशावादाची छाया पडलेली दिसून येते अशा प्रकारे टीका करण्यात आली.

**सिद्धांताचे स्पष्टीकरण :** माल्थसने आपल्या लोकसंख्येच्या सिद्धांतातून लोकसंख्येतील वाढ ही नेहमीच वाईट असते असे प्रतिपादन केले. तसेच लोकसंख्या वाढीचा वेग आणि अन्नधान्य उत्पादन वाढीचा वेग या दोन घटकांचाच केवळ विचार केला होता व इतर उत्पादन क्षेत्राकडे दुर्लक्ष

केले. अशा प्रकारे माल्थस यांच्या सिद्धांतावर नंतरच्या काळात अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आक्षेप घेतलेले दिसून येतात. थोडक्यात, लोकसंख्येतील वाढ सर्वच परिस्थितीमध्ये अहितकारक सिद्ध होत नसून बहुतेक वेळा ती हितावह ठरते. ज्या देशामध्ये श्रमपुरवठा आवश्यकतेपेक्षा कमी आहे अशा देशामध्ये लोकसंख्या वाढणे हितावह असते. कारण लोकसंख्या वाढीमुळे अशा देशातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा पुरेपूर आणि अधिक चांगल्या प्रकारे वापर शक्य होतो. त्यामुळे उत्पादनात वाढ होते तसेच बाजारपेठ विस्तृत होते आणि आर्थिक विकासास चालना मिळते.

माल्थस यांचा लोकसंख्येचा सिद्धांत चुकीचा निश्चितच नाही, परंतु त्यामध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेतील विशिष्ट स्थितीचाच केवळ विचार केलेला दिसून येतो. त्यामुळे देशाची भिन्न भिन्न आर्थिक स्थिती विचारात घेऊन नवीन सिद्धांत मांडण्याची आवश्यकता वाटू लागली. या गरजेतूनच पर्याप्त लोकसंख्येचा सिद्धांत मांडण्यात आला.

सर्वप्रथम सर एडवर्ड यांनी १८१५ मध्ये ``Essay on the Application of Capital to Land" या पुस्तकात "लोकसंख्या वाढीमुळे श्रमाचे विशेषीकरण शक्य होते व त्यामुळे उत्पादकता वाढते" असा विचार मांडला. तसेच सिजविकने ``Principles of Political Economy" या ग्रंथात या सिद्धांतातील मूलभूत कल्पना सूचित केली. परंतु शास्त्रीय पद्धतीने सिद्धांत मांडण्याचे श्रेय एडविन कॅनन यांना दिले जाते. त्यानंतर प्रा. रॉबिन्स, डॉ. डाल्टन व कार-साऊन्डर्स यांनी या सिद्धांताला अधिक लोकप्रियता मिळवून दिली.

पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांतातील 'पर्याप्त' या शब्दाला उचित, वाजवी, योग्य किंवा युक्ततम अशा प्रकारे अनेक पर्यायी शब्द वापरले जातात. या सिद्धांतातील मूलतत्त्व असे आहे की, एखाद्या देशातील लोकसंख्या त्या देशातील उत्पादन तंत्र, साधनसामुग्री, कच्चा माल इत्यादी परिस्थिती विचारात घेता दरडोई जास्तीत जास्त उत्पादन किंवा उत्पन्न मिळवून देत असेल तर ती पर्याप्त लोकसंख्या होय. या पर्याप्त लोकसंख्येपेक्षा प्रत्यक्ष लोकसंख्या जर जास्त असेल तर ती अतिरिक्त लोकसंख्या होईल आणि पर्याप्त लोकसंख्येपेक्षा कमी असेल तर न्यून लोकसंख्या होईल.

कॅनन यांनी पर्याप्त लोकसंख्येची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

"विशिष्ट काळात किंवा विशिष्ट परिस्थिती असताना किंवा इतर परिस्थिती आहे तशीच राहिली तर उत्पादनाचा असा एक अत्युच्च बिंदू गाठला जातो की, त्यावेळी असलेली लोकसंख्या त्यापेक्षा जास्त अगर कमी असेल

तर उत्पादन कमी होईल, अशा लोकसंख्येला पर्याप्त लोकसंख्या म्हणतात.''

थोडक्यात, उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्री, तंत्रज्ञान आणि भांडवल यांच्या मदतीने ज्या लोकसंख्येमुळे देशातील उत्पन्न जास्तीत जास्त असते त्या लोकसंख्येच्या प्रमाणाला पर्याप्त लोकसंख्या म्हणता येईल.

कार साऊन्डर्सच्या मते, ''ज्या लोकसंख्येमुळे महत्तम आर्थिक कल्याण साधले जाते ती लोकसंख्या म्हणजे पर्याप्त लोकसंख्या होय.''

सिद्धांताची गृहिते - हा सिद्धांत प्रामुख्याने पुढील दोन गृहितांवर आधारित आहे.

१. देशातील लोकसंख्या वाढत असताना श्रमिकांचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण कायम राहते.

२. देशातील नैसर्गिक साधनसामुग्री, भांडवलाचा पुरवठा, उत्पादन तंत्र हे सर्व घटक स्थिर राहतात.

कॅनन यांनी पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांतामध्ये विशिष्ट देशातील लोकसंख्येच्या न्यून लोकसंख्या, पर्याप्त लोकसंख्या आणि अतिरिक्त लोकसंख्या अशा तीन अवस्थांचे विश्लेषण केले आहे.

**१. पर्याप्त लोकसंख्या** (Optimum Population) : सर्वाधिक दरडोई वास्तव उत्पन्न मिळवून देणारी लोकसंख्या म्हणजे पर्याप्त लोकसंख्या होय. यालाच युक्त किंवा आदर्श लोकसंख्येचे प्रमाण असेही म्हणतात. या ठिकाणी दरडोई वास्तव उत्पन्न सर्वाधिक असल्यामुळे देशातील लोकांचे महत्तम आर्थिक कल्याण साधले जाते.

**२. न्यून लोकसंख्या** (Under Population) : देशातील प्रत्यक्ष लोकसंख्या पर्याप्त किंवा युक्त लोकसंख्येपेक्षा कमी असेल तर त्या लोकसंख्येला न्यून लोकसंख्या असे म्हणतात. न्यून लोकसंख्या असताना देशातील नैसर्गिक साधने, भांडवल, तांत्रिक ज्ञान इत्यादींचा पूर्ण उपयोग होत नाही त्यामुळे दरडोई उत्पन्न सर्वाधिक न राहता कमी असते.

**३. अतिरिक्त लोकसंख्या** (Over Population) : देशातील प्रत्यक्षातील लोकसंख्या पर्याप्त किंवा युक्त लोकसंख्येपेक्षा अधिक असेल तर त्या लोकसंख्येस अतिरिक्त लोकसंख्या असे म्हणतात. अतिरिक्त लोकसंख्या असताना देशातील नैसर्गिक साधने, भांडवल, तांत्रिक ज्ञान इत्यादींची कमतरता भासते. म्हणजे देशातील लोकसंख्येचा (श्रमशक्तीचा) योग्य उपयोग होत नाही. अर्थात, बेकारीची समस्या निर्माण होते. त्यामुळे याही ठिकाणी दरडोई उत्पन्न सर्वाधिक न राहता त्यापेक्षा कमी असते.

वरील अवस्थांचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.


**लोकसंख्या आणि उत्पन्न**

| अ.क्र. | लोकसंख्या (कोटीमध्ये) | एकूण उत्पन्न (कोटी रुपये) | दरडोई उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १० | १०,००० | १,००० |
| २ | ११ | १२,१०० | १,१०० |
| ३ | १२ | १४,४०० | १,२०० |
| ४ | १३ | १६,९०० | १,३०० |
| ५ | १४ | १६,८०० | १,२०० |
| ६ | १५ | १६,५०० | १,१०० |
| ७ | १६ | १६,००० | १,००० |

वरील उदाहरणामध्ये सुरुवातीस लोकसंख्या वाढत असताना दरडोई उत्पन्न वाढत जाते. जेव्हा लोकसंख्या १३ कोटी होते तेव्हा त्या देशातील दरडोई उत्पन्न सर्वाधिक म्हणजे १, ३०० रु. इतके असते आणि त्यापेक्षाही लोकसंख्या वाढत गेली असता परत दरडोई उत्पन्नही कमी होते.

म्हणजेच वरील उदाहरणावरून असे लक्षात येते की, १३ कोटी लोकसंख्या ही पर्याप्त लोकसंख्या आहे व त्यापेक्षा कमी असलेली लोकसंख्या न्यून लोकसंख्या असून १३ कोटीपेक्षा अधिक असलेली लोकसंख्या ही अतिरिक्त लोकसंख्या होय.

पर्याप्त लोकसंख्येची कल्पना आकृतीद्वारे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.



वरील आकृतीमध्ये 'अ क्ष' अक्षावर लोकसंख्या आणि 'अय' अक्षावर दरडोई उत्पन्न दर्शविले आहे. 'ल र' हा वक्र लोकसंख्येत वाढ होत असताना देशातील दरडोई उत्पन्नात कशा प्रकारे बदल होतो हे दर्शवितो. आकृतीत दर्शविल्याप्रमाणे लोकसंख्या 'अप' पर्यंत वाढत असताना देशातील दरडोई उत्पन्न 'लस' असे वाढत जाते. जेव्हा लोकसंख्या 'अप' इतकी असते तेव्हा दरडोई उत्पन्न 'सप' म्हणजे सर्वाधिक असते. लोकसंख्या 'अप' पेक्षा अधिक होऊ लागल्यास दरडोई उत्पन्न 'सर' असे घटत जाते. यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, 'अप' पेक्षा कमी असणारी लोकसंख्या ही न्यून लोकसंख्या होय. 'अप' पेक्षा अधिक असणारी लोकसंख्या अतिरिक्त लोकसंख्या होय आणि 'अप' इतकी लोकसंख्या ही 'पर्याप्त लोकसंख्या' होय.

**डाल्टन यांचे विसंगतीबाबतचे सूत्र :** एखाद्या देशातील लोकसंख्या नेहमीच पर्याप्त असेल असे नाही. बहुतेक वेळा नसतेच. प्रत्यक्ष लोकसंख्या आणि पर्याप्त लोकसंख्या यातील तफावत म्हणजेच विसंगती होय. ही विसंगती दोन प्रकारची असते. डाल्टन यांनी विसंगतीचे मापन करण्यासाठी पुढीलप्रमाणे सूत्र दिले आहे.

$$M = \frac{A - O}{O}$$

या ठिकाणी M = विसंगती (Maladjustment)

A = प्रत्यक्ष लोकसंख्या (Actual Population)

आणि O = पर्याप्त लोकसंख्या (Optimum Population) म्हणजेच

$$\text{विसंगती} = \frac{\text{प्रत्यक्ष लोकसंख्या - पर्याप्त लोकसंख्या}}{\text{पर्याप्त लोकसख्या}}$$

जेव्हा विसंगतीचे मूल्य शून्य असते तेव्हा लोकसंख्या पर्याप्त असते. विसंगतीचे मूल्य उणे किंरा ऋण स्वरूपाचे असल्यास लोकसंख्या न्यून आहे असे समजावे आणि विसंगतीचे मूल्य अधिक किंवा धन स्वरूपाचे असल्यास लोकसंख्या अतिरिक्त आहे असे समजावे.

डाल्टन यांनी पर्याप्त लोकसंख्येचा विचार करताना दरडोई वास्तव उत्पन्न आधार म्हणून घेतले तर रॉबिन्स यांनी एकूण उत्पन्न आधार म्हणून घेतले.

**पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांतावरील टीका -**

१. पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांताची गृहिते वस्तुस्थितीशी विसंगत आहेत

अशी या सिद्धांतावर टीका केली जाते. कर्त्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण कायम असते असे या सिद्धांतामध्ये गृहीत धरले आहे. परंतु प्रत्यक्षात गतिमान अर्थव्यवस्थेमध्ये हे प्रमाण कायम नसल्याचे आढळते. शिवाय या सिद्धांतामध्ये देशातील साधनसामुग्री, भांडवल पुरवठा आणि उत्पादन तंत्र हे सर्व घटक कायम असतात असे गृहीत धरले आहे. प्रत्यक्षात या घटकामध्ये सुद्धा परिवर्तन होत असते. अशा परिस्थितीमध्ये एखाद्या देशाच्या पर्याप्त लोकसंख्येचा निश्चित आकार सांगणे कठीण असते. विशिष्ट काळात पर्याप्त ठरणारी लोकसंख्या भविष्यकाळात नैसर्गिक साधनसामुग्रीत व उत्पादन तंत्रात वेगाने सुधारणा झाल्यास न्यून ठरण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे या सिंद्धांताचे व्यावहारिक मूल्य कमी होते.

**२.** देशातील राष्ट्रीय उत्पन्न आणि लोकसंख्येची अचूक गणना करणे जवळजवळ अशक्य असते. अशा वेळी एखाद्या देशाची पर्याप्त लोकसंख्या ठरविणे कठीण होऊन बसते.

**३.** पर्याप्त लोकसंख्या निश्चित करताना या सिद्धांतामध्ये 'केवळ दरडोई' उत्पन्नाचा विचार केला आहे. दरडोई उत्पन्नाबरोबरच इतर सामाजिक, राजकीय घटक विचारात घेणे आवश्यक असते. तथापि या सिद्धांताने इतर घटकांकडे दुर्लक्ष केले आहे असा या सिद्धांतावर आक्षेप घेण्यात येतो.

**४.** कार साऊंडर्सने पर्याप्त लोकसंख्या असताना महत्तम आर्थिक कल्याणाची प्राप्ती होते असे म्हटले आहे. परंतु विशिष्ट लोकसंख्या असताना दरडोई उत्पन्न सर्वाधिक असले तरी देशातील उत्पन्नाचे जर समान वितरण होत नसेल तर दरडोई उत्पन्न वाढूनही सामाजिक कल्याणात भर पडणार नाही म्हणून या सिद्धांताने राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटपाकडे किंवा विभाजनाकडे दुर्लक्ष केले आहे अशीही टीका केली जाते.

**सिद्धांताचे श्रेष्ठत्व :** पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांतावर जरी वरीलप्रमाणे टीका करण्यात आली असली तरी माल्थस यांच्या सिद्धांतापेक्षा हा सिद्धांत अधिक सरस ठरतो हे मान्य केले पाहिजे.

**१.** माल्थस यांनी आपल्या सिद्धांतामध्ये अन्नधान्यांच्या संदर्भातच लोकसंख्येचा विचार केला. याउलट पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांतामध्ये सर्वच प्रकारच्या उत्पादनाच्या संदर्भात लोकसंख्येचा अभ्यास केला. त्यामुळे पर्याप्त लोकसंख्येचा सिद्धांत व्यापक दृष्टिकोनावर आधारित आहे असे दिसून येते.

**२.** माल्थस यांनी शेती व्यवसायामध्ये घटते फल मिळते असे गृहीत धरून लोकसंख्येच्या सिद्धांताचे विवेचन केले. याउलट पर्याप्त लोकसंख्येच्या

सिद्धांताने वाढत्या फलाच्या नियमांची शक्यतासुद्धा विचारात घेतली आणि वाढती लोकसंख्या विकासास सहायक ठरू शकते असा आशावादी विचार मांडला.

**३.** पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांताने न्यून लोकसंख्या, पर्याप्त लोकसंख्या आणि अतिरिक्त लोकसंख्या या तीनही अवस्थांचा विचार केला. त्यामुळे या सिद्धांताने लोकसंख्येच्या प्रश्नाचा सम्यक दृष्टीने विचार केला ही या सिद्धांताची जमेची बाजू होय.

**४.** माल्थस यांचा सिद्धांत केवळ अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशांसाठी उपयुक्त ठरतो. याउलट पर्याप्त लोकसंख्येचा सिद्धांत न्यून, पर्याप्त आणि अतिरिक्त लोकसंख्या असणाऱ्या विविध देशांना मार्गदर्शक ठरतो.

अशा प्रकारे पर्याप्त लोकसंख्येच्या सिद्धांताचे श्रेष्ठत्व सांगता येईल.

## भांडवल संचय वृद्धी

(Capital Accumulation)

सर्वसाधारणपणे 'भांडवल' या शब्दाचा अर्थ पैसा असा घेतला जातो. परंतु अर्थशास्त्रामध्ये 'भांडवल' म्हणजे उत्पादन प्रक्रियेत साहाय्यभूत ठरणारी मनुष्यनिर्मित साधने असा भांडवल या शब्दाचा अर्थ होतो. देशातील उपलब्ध यंत्रसामुग्री, उपकरणे, सयंत्र, उत्पादन-संस्थांच्या इमारती, कच्चा माल आणि वाहतुकीची साधने इत्यादी बाबींचा मर्यादित अर्थाने भांडवलात समावेश होतो. या सर्व साधनांच्या उपलब्धतेवर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.

विशिष्ट काळामध्ये देशातील भांडवलाच्या साठ्यात जी भर पडते त्याला भांडवल निर्मिती असे म्हणतात. रॅग्नर नर्क्स यांच्या मते, 'समाज वर्तमानकाळातील आपल्या सर्वच उत्पादनशक्ती, तात्कालिक इच्छा व गरजांची पूर्तता करण्यासाठी वापरत नाही. या उत्पादनशक्तीपैकी काही भाग अवजारे, यंत्रे, वाहतुकीची साधने, संयंत्र इत्यादी भांडवली वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी वापरला जातो. अशा प्रकारच्या वास्तव भांडवलाद्वारे उत्पादक प्रयत्नांची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणावर वाढते. भविष्यकाळात लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी समाजाकडे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीपैकी जो भाग भांडवली वस्तूंचा साठा वाढविण्याच्या उद्देशाने वापरला जातो त्यास भांडवलनिर्मिती असे म्हणतात.''

नर्क्स यांनी त्यांच्या व्याख्येमध्ये केवळ भौतिक भांडवल संचयावर भर दिला आहे. मानवी भांडवलाचा त्यांनी विचार केला नाही.

डॉ. सिंगर यांच्या मते, ''भांडवल निर्मितीमध्ये यंत्र, संयंत्र व अवजारे

Dr. Shivaji Pate
Asso. Professor and Head Dept. Of Economics
Sant Tukaram College of Arts and Science, Parbhani

प्रकरण ३.

# बचत आणि गुंतवणूक
## (Savings and Investment)

**बचतीचा अर्थ :**

"विशिष्ट काळातील उत्पन्नाचा असा भाग जो उपभोगावर खर्च केला जात नाही किंवा चालू उत्पन्नाचा असा भाग जो उपभोग खर्च पूर्ण केल्यानंतर शिल्लक राहतो."

थोडक्यात, पैशाच्या स्वरूपातील एकूण उत्पन्नातून उपभोग खर्च वजा जाता जे शिल्लक राहते ती बचत होय. सूत्ररूपाने बचत म्हणजे काय हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

बचत = उत्पन्न - उपभोग खर्च

$$S = I - C$$

बचत ही प्रवाही संकल्पना (Flow Concept) आहे. बचती ही (Savings) अप्रवाही (Stock) संकल्पना आहे. बचत म्हणजे चालू वर्षातील शिल्लक होय. तर मागील अनेक वर्षांची केलेली एकूण बचत म्हणजे बचती होय.

जेव्हा उत्पादन पातळीत वाढ होऊन उत्पन्नात वाढ होते तेव्हा बचत वाढते. उत्पन्नातील वाढीचा दर उपभोग खर्चातील वाढीच्या दरापेक्षा अधिक असेल तर बचत दरात वाढ निश्चित होईल.

**बचतीचे स्रोत :**

ढोबळमानाने बचतीचे तीन प्रमुख स्रोत आहेत. १) सरकार. २) खाजगी उद्योग व व्यापार क्षेत्र. ३) कुटुंब.

**१. सरकार :** यामध्ये केंद्र व राज्य सरकारे, नगरपालिका तसेच युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया व जीवन विमा निगम यासारखे सार्वजनिक उपक्रम आदींचा समावेश होतो. रेल्वे, पोस्ट व तार खाते या क्षेत्राचाही समावेश या स्रोतामध्ये होतो.

**२) खाजगी उद्योग व व्यापार क्षेत्र :** बचतीचा दुसरा स्रोत म्हणून या क्षेत्राचा उल्लेख करावा लागेल. यामध्ये खाजगी मर्यादित कंपन्या, सहकारी क्षेत्रातील सर्व वित्तसंस्था, खाजगी व्यापारी बँका व इतर वित्तीय संस्था यांचा

समावेश होतो. या क्षेत्रातील बचतीसाठी उद्योग विस्तार आधुनिकीकरण व वाजवीकरण, खेळत्या भांडवलाची उभारणी इत्यादी प्रेरणा कारणीभूत ठरतात.

**३) कुटुंबाद्वारे बचत :** कुटुंबाच्या उत्पन्नातून उपभोग खर्च वजा करता जी शिल्लक राहते ती बचत होय. अर्थात, जी कुटुंब कमी उत्पन्न गटात आहेत ती त्यांच्या उत्पन्नात केवळ आपला उदरनिर्वाह करू शकतात त्यामुळे या कुटुंबांची बचत शून्य किंवा ऋण असते. अधिक उत्पन्न गटातील कुटुंबाद्वारा मात्र बचत केली जाते. कुटुंबाचे उत्पन्न जेवढे अधिक तेवढी त्या कुटंबाची बचत क्षमता अधिक असते. कुटुंबाद्वारे जी बचत केली जाते तिच्या मुळात भविष्याकरिता तरतूद, दूरदृष्टी, सुरक्षा निधीची उभारणी, महत्त्वाकांक्षा, प्रतिष्ठा, व्याजदराचा लाभ मिळविणे या प्रेरणा असतात.

बचतीच्या साधनांची प्रामुख्याने दोन वर्गात उभारणी केली जाते.

१. अंतर्गत साधने. २. बहिर्गत साधने.

अंतर्गत साधनामध्ये कर आकारणी, कर्ज उभारणी, उपभोगावर मर्यादा, शासकीय बचत, अनिवार्य बचत, संस्थाद्वारे बचत, तुटीचा अर्थभरणा इत्यादी साधनांचा उल्लेख करता येईल. बहिर्गत साधन म्हणजे देशाच्या बाहेरून मदतीच्या रूपाने, कर्जाच्या रूपाने अथवा गुंतवणुकीच्या स्वरूपात येणारा पैसा होय. हा पैसा खाजगी भांडवलदार, आंतरराष्ट्रीय संस्था व परकीय सरकार इत्यादी माध्यमातून देशात येतो.

**बचतीवर परिणाम करणारे घटक :**

राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यांचे प्रमाण यावर बचत पातळी अवलंबून असते हे खरे, परंतु याशिवाय अन्य काही घटकसुद्धा बचत ठरवीत असतात. या घटकांचाही विचार करावा लागेल.

**१. समाजाची उपभोग खर्च करण्याची सवय :** ज्या समाजामध्ये बहुसंख्य लोकांमध्ये चंगळवाद, भोगवाद रुजला असेल आणि ज्या समाजात चैनीच्या वस्तू, विलासी जीवनासाठी आवश्यक वस्तू आदींवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची सवय असते अशा समाजामध्ये बचतीचे प्रमाण कमी राहील. याउलट ज्या समाजातील बहुसंख्य लोकांमध्ये काटकसर, साधी राहणी याला अधिक महत्त्व दिले जाते त्या समाजात बचतीचे प्रमाण अधिक असते.

**२) सामाजिक रूढी :** काही समाजामध्ये अशा प्रकारच्या चालीरीती व रूढी असतात की, ज्यामुळे कुटुंबाला किंवा व्यक्तीला अधिक खर्च करावाच लागतो. उदाहरणार्थ भारतामध्ये विशेषत: ग्रामीण भागामध्ये अनेक सण, उत्सव व विधी संपन्न करण्याच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. त्यामुळे

कुटुंबाच्या उत्पन्नातील जास्तीत-जास्त हिस्सा खर्च होऊन बचत अल्प प्रमाणात केली जाते.

**३. अन्य स्वरूपात संपत्ती संचय :** आपल्या उत्पन्नातून झालेली बचत केवळ पैशाच्या स्वरूपातच केली जाते असे होत नाही अनेक लोक झालेल्या बचतीचा सोने, प्लॉटस्, घर इत्यादीमध्ये गुंतवणूक करण्याकरिता उपयोग करतात. अशा वेळी बचत रोख स्वरूपात कमी प्रमाणात होते.

**४. वित्तीय सेवांची उपलब्धता :** ज्या देशात बँका, शेअर बाजार विकसित असतो अशा ठिकाणी ठेवी किंवा शेअर्समध्ये गुंतवणूक केली जाते व त्यामुळे बचतीचे प्रमाण अधिक असते. प्रामुख्याने भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये बँका व शेअर बाजार अविकसित असल्यामुळे आणि लोकांना या वित्तीय संस्थांमधील सेवांचा उपयोग करण्याची सवय कमी प्रमाणात असल्यामुळे बचतीचा दर अल्प असल्याचे आढळून येते. १९६९ मध्ये भारतातील व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले तेव्हापासून बँकांच्या शाखा ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्या. त्यामुळे लोकांना बचत करण्यास उत्तेजन मिळाले आहे आणि बचत दर वाढला आहे असे दिसून येते.

**५. व्याजदर :** व्याजदर हे एक उत्पन्नाचे साधन आहे बचत करणाऱ्या व्यक्तीने जर व्याजाच्या अपेक्षेने बचत केली तर अधिक व्याजदर असताना तो अधिक बचत करण्यासाठी प्रेरित होईल आणि व्याजदर कमी असेल तर बचत कमी करेल. अशा प्रकारे व्याजाचा दर किती होईल याचा बचतीवर प्रभाव पडतो.

**६. किंमत पातळी :** एखाद्या देशात सामान्य किंमत पातळी वेगाने वाढत असेल तर वास्तव उत्पन्न घटते. अर्थात, याचा बचतक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. पूर्वीचे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी अगोदर व्यक्ती जेवढे उत्पन्न खर्च करीत होती त्यापेक्षा अधिक उत्पन्न खर्च करावे लागते. त्यामुळे त्याची बचत क्षमता घटते. अशा रीतीने भाववाढीमुळे बचत कमी होते. भाववाढ होत असताना आणखी एक परिणाम होतो. बचत ही भविष्यातील तरतूद म्हणून केली जाते, परंतु भविष्यात किमतीत वाढ होऊन मुद्रेच्या मूल्यात घट होणार असेल तर व्यक्तीला पैशाच्या रूपात बचत करणे फायद्याचे राहणार नाही. त्यामुळे किंमत वाढत असताना बचत प्रवृत्ती कमी होते व वस्तूरूपात गुंतवणूक केली जाते.

**७. राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन :** देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढत असताना त्याचे विभाजन कसे झाले आहे यावरसुद्धा बचत ठरते. जर उत्पन्नाचे विभाजन असमान होऊन काही मूठभर लोकांच्या उत्पन्नात अधिक वाढ झाली तर ते अधिक बचत करतील. या ठिकाणी एंजल आणि केन्सने व्यक्त केलेले मत लागू

पडते. ते म्हणजे व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ होते व त्यापेक्षा कमी प्रमाणात उपभोग खर्चात वाढ होते. म्हणजे श्रीमंत व्यक्तीच्या उत्पन्नापैकी शिल्लक अधिक राहते. त्यामुळे या व्यक्ती बचत अधिक करतील.

**८. लोकसंख्या :** राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच देशातील लोकसंख्येचे प्रमाण याचाही बचतीवर परिणाम होतो. लोकसंख्या जितकी जास्त तितके दरडोई उत्पन्न कमी होऊन बचत कमी होते.

**९. शासकीय धोरण :** एखाद्या देशातील शासकीय धोरण बचत वाढीसाठी उत्तेजन देणारे आहे किंवा नाही यावरही बचत ठरते. जसे भारतामध्ये बचतवाढीला प्रोत्साहन देण्याकरिता उत्पन्न करात सूट, नफ्यावरील करात सूट इ. सवलती दिल्या जातात. विमा, राष्ट्रीय बचत योजना, भविष्य निर्वाह निधी व अन्य योजनांद्वारे बचतीला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे भारतामध्ये अलीकडील काळात बचतदर मोठ्या प्रमाणावर वाढला.

**१०. इतर घटक :** बचतीवर परिणाम करणाऱ्या वरील घटकांशिवाय अन्य घटकांचाही उल्लेख करता येईल. उदाहरणार्थ, कुटुंबपद्धती, राजकीय परिस्थिती, लोकांच्या सवयी, रोजगाराचे प्रमाण, आयुर्मान इत्यादी.

## आर्थिक विकासात बचतीचे स्थान

## (Role of Savings in Economic Development)

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासात बचतीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण बचत जेवढी अधिक तेवढी गुंतवणूक अधिक आणि गुंतवणूक जेवढी अधिक तेवढा रोजगार व उत्पन्न अधिक. विकसित देशांमध्ये बचत व त्याद्वारे गुंतवणूक अधिक असल्यामुळे या देशातील आर्थिक विकासाचा दर अधिक असतो. याउलट अल्पविकसित देशांमध्ये बचत कमी असल्यामुळे भांडवलनिर्मिती कमी प्रमाणात होते व पर्यायाने उत्पादन पातळी व उत्पन्नपातळी कमी असते. रॅग्नर नर्क्स यांनी अल्पविकसित देशांमध्ये उपलब्ध साधनसामुग्रीचा पुरपूर वापर करण्यासाठी पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध नसते त्यामुळे या देशातील उत्पादन पातळी कमी असते. थोडक्यात, या देशात बचत वाढवून गुंतवणुकीचे प्रमाण वाढल्यास या देशाचा आर्थिक विकास गतीने होऊ शकतो असे त्यांचे मत असलेले आढळून येते. प्रा. जे. एम. केन्स यांनीसुद्धा पूर्ण रोजगाराची स्थिती निर्माण करण्यासाठी संपूर्ण बचत ही गुंतवणुकीकडे वळविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे. थोडक्यात, मोठ्या प्रमाणात भांडवलनिर्मिती करून उत्पादन व उत्पन्न पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी बचत हाच आधार आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

आर्थर लुईस यांनी आर्थिक विकासातील बचतीचे महत्त्व त्यांच्या पुढील विधानातून ध्वनित केले आहे. "विकास प्रक्रियेचा अर्थ अल्पबचत अर्थव्यवस्थेचे, उच्च बचत अर्थव्यवस्थेत रूपांतर करणे हा आहे." डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टो यांनी दिलेल्या आर्थिक विकासाच्या टप्प्यांच्या विश्लेषणामध्ये तसेच इतर आर्थिक विकासाच्या प्रतिमानामध्ये बचतीचे महत्त्व विशद केलेले आहे.

**विकसनशील राष्ट्रातील बचत कमी असण्याची कारणे :**

अल्पविकसित किंवा विकसनशील राष्ट्रांमध्ये विकसित राष्ट्रांच्या तुलनेत बचत दर खूपच कमी असतो. या राष्ट्रांतील बचत कमी असण्याची पुढील कारणे देता येतील.

**१. उत्पन्न कमी :** विकसनशील राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग मंद गतीने वाढतो. दुसऱ्या बाजूने या देशातील लोकसंख्या वाढीचा दर अधिक असतो. त्यामुळे दरडोई उत्पन्न खूपच कमी दराने वाढते. यालाच दर माणसी उत्पन्न असेही आपण म्हणतो. दरमाणसी उत्पन्न कमी असेल तर दरमाणसी बचतसुद्धा कमी राहते व परिणामी या राष्ट्रातील एकूण बचत कमी असते.

**२. अल्प उत्पादकता :** विकसनशील देशातील उत्पादकतेची पातळी कमी असल्याने एकूण उत्पादन कमी, उत्पन्न कमी व त्यामुळे बचत कमी राहते. या देशातील शेती, उद्योग आणि सेवाक्षेत्राची कार्यक्षमता, अपुरे भांडवल व अप्रगत तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी कारणामुळे कमी असते. कमी कार्यक्षमतेमुळे नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर होऊ शकत नाही. परिणामी उत्पादन कमी - उत्पन्न कमी - बचत कमी अशी स्थिती निर्माण होते.

**३. संयोजन कौशल्याचा अभाव :** विकसनशील राष्ट्रांमध्ये औद्योगिक विकास मंदगतीने होण्याचे एक कारण म्हणजे या राष्ट्रात संघटन कौशल्याचा अभाव असतो. उद्यमशीलतेचा अभाव असतो. त्यामुळे मोठे उद्योग व कमी व मोठ्या प्रमाणावर उत्पादन कमी, अविकसित बाजारपेठांचे अस्तित्व आदींमुळे उत्पादन कमी - उत्पन्न कमी आणि म्हणून बचत कमी असते.

**४. अनुकरणप्रियता :** विकसनशील देशांमध्ये जो वर्ग श्रीमंत अथवा अधिक श्रीमंत असतो तो आपले राहणीमान उच्च दर्जाचे असावे यासाठी प्रयत्न करतो. अशावेळी त्याचे लक्ष प्रगत राष्ट्रातील लोकांच्या राहणीमानाकडे जाते. हा श्रीमंत वर्ग आपल्या राहणीमानाची तुलना प्रगत राष्ट्रातील लोकांच्या राहणीमानाशी करतो आणि राहणीमान उंचविण्यासाठी त्याचे अनुकरण करतो. त्यामुळे या वर्गाची वास्तविक बचत करण्याची क्षमता असतानाही त्यांच्या उत्पन्नातील फार मोठा वाटा विलासी जीवन जगण्यावर खर्च झाल्यामुळे प्रत्यक्षात बचत कमी प्रमाणात होते.

**५. तुटीचा अर्थभरणा :** विकसनशील राष्ट्रांमध्ये शासनाला संरक्षण,

अंतर्गत कायदा व सुव्यवस्था याबरोबरच विकास कार्यक्रमावर आणि कल्याणकारी योजनावर मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. मात्र या राष्ट्रातील जनतेची करदेय क्षमता कमी असल्यामुळे सरकारला कराद्वारे उत्पन्न मिळविण्यावर मर्यादा पडतात. सार्वजनिक कर्जाचा स्रोतसुद्धा कमी पडतो. अशावेळी सरकार अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करते. हा तुटीचा अर्थभरणा जास्त केल्याने अर्थव्यवस्थेत चलनवाढ होऊन भाववाढ होते. परिणामी लोकांचे वास्तव उत्पन्न घटते आणि बचतक्षमताही घटते.

**६. वित्तीय सेवांची कमतरता :** या राष्ट्रामध्ये बँका व इतर वित्तसंस्थांचे प्रमाण तुलनेन कमी असते. शिवाय भांडवली बाजारसुद्धा अविकसित असतो. त्यामुळे लोकांच्या बचतीची व गुंतवणूकीच्या सवयीवर मर्यादा पडतात वरील कारणांमुळे विकसनशील राष्ट्रांमध्ये बचत कमी असते.

## गुंतवणुकीचे निकष

(Investment Criteria)

या प्रकरणामध्ये आपण गुंतवणुकीच्या निकषांविषयी चर्चा करणार आहोत. यापूर्वी गुंतवणुकीची संकल्पना व गुंतवणुकीचे प्रकार आणि गुंतवणूक निश्चित करणारे घटक याविषयी थोडक्यात माहिती घेणे संयुक्तिक ठरेल.

गुंतवणूक म्हणजे भांडवलनिर्मितीसाठी पैशाच्या स्वरूपात केलेला विनियोग होय. व्यक्तीने त्याच्या उत्पन्नातील काही भाग बचत केल्यानंतर ही बचत जेव्हा उत्पादन कार्यासाठी वळविली जाते तेव्हा त्यास गुंतवणूक म्हणतात. जेव्हा व्यक्तीद्वारे अथवा वित्तीय संस्थांद्वारे अस्तित्वात असलेल्या प्रमंडळाचे, उद्योगांचे भाग खरेदी केले जातात तेव्हा अशा गुंतवणुकीमुळे उत्पादनाच्या भौतिक साधनांमध्ये वाढ होत नसते. उदाहरणार्थ, जेव्हा व्यक्ती आपली बचत भाग खरेदीत गुंतवते तेव्हा असलेलेच भाग खरेदी केले जातात अशा गुंतवणुकीस वित्तीय गुंतवणूक म्हणता येईल. परंतु एखाद्या कंपनीच्या किंवा उद्योगाचा विस्तार करण्यासाठी भांडवलातसुद्धा वाढ करावी लागते. अशावेळी भागभांडवलाची उभारणी केली जाते. जेव्हा व्यक्ती त्या कंपनीचे भाग खरेदी करते तेव्हा त्या कंपनीच्या उत्पादनाच्या साधनांमध्ये वाढ होते. म्हणून या गुंतवणुकीस वास्तव गुंतवणूक म्हणतात. यामुळे भांडवली वस्तूंचे प्रमाण वाढते.

गुंतवणुकीचे आणखी दोन प्रकार सांगता येतील. पहिला प्रकार म्हणजे स्वायत्त गुंतवणूक (अटॉनॉमस इनव्हेस्टमेंट) आणि दुसरा प्रकार म्हणजे अभिप्रेरित किंवा उत्प्रेरित गुंतवणूक (इन्ड्यूसड् इनव्हेस्टमेंट). स्वायत्त गुंतवणूक ही उपभोग किंवा उत्पन्न पातळी या घटकांनी प्रभावीत झालेली नसते. ही गुंतवणूक स्वतंत्ररीत्या केलेली असते. अभिप्रेरित गुंतवणूक उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त वापर करून उत्पादनात वाढ व्हावी या हेतुने केली जाते.